म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय का.को
दा. क्र. ११३८८

IRBK-0111399

IRBK-0111399
IRBK-0111399

3185

# प्रस्तावना

'टारझन' सारख्या पुस्तकाला प्रस्तावना लिहीणं म्हणजे अजाणपणा. पण कौतुकाच्या पोटीं तो खपून जाईल असें वाटते.

टारझन ऑफ दी एपची कथा म्हणजे एका साहसी, धाडसी, कल्पक, बुद्धिमान् पण रानावनांत हिंस्र पशूंत वाढलेल्या, पण ज्याला आपलं जन्मवृत्त अज्ञात आहे अशा एका इंग्रज तरुणाची कथा आहे. इडगार राईस बरोज सारख्या प्रसिद्ध लेखकाच्या लेखणींतून ती उतरली आहे; मग अधिक वर्णन कशाला ?

या दहा पुस्तकांत त्यानें अनेक कौतुकास्पद मूल्यांचा त्यानें उल्लेख केला आहे.

माणसाचे रक्तांतील किंवा जन्मजात संस्कार किती प्रभावी असतात याचें हें एक अद्वितीय उदाहरण आहे. रानावनांत आडमुठ्या करचाक वानरांत वाढलेला टारझन उदार, बुद्धिमान्, काव्यसृष्टींत व विज्ञानांत रमणारा, न्यायनिष्ठूर पण दिलदार असा आहे. त्याची विवेचक बुद्धी तर पराकोटीला पोहोंचलेली दिसते. आणि त्याचें मन ! तें तर विलक्षण संवेदनाक्षम आहे आणि त्याबरोबरच त्याचें तें असीम सौंदर्य ! मूळ लेखकानें त्याचें वर्णन वेळोवेळीं 'सौंदर्य-संपन्न व पिळदार शरीराचा' असें केलें आहे.

ही कथा टारझनच्या साहसांची - धाडसांची आहे. आफ्रिकेच्या वेगवेगळ्या— जगाला अज्ञात असलेल्या— विभागांत त्याच्यावर अनेक संकटें कोसळली; पण या संकटांच्या अनुषंगानें तो अनेक गोष्टी शिकला. या संकटग्रस्त प्रदेशांत त्याला उत्तमोत्तम शिल्पकला व चित्रकला आढळली. रानटी नाचांत, शास्त्रीय गायनकलेंतील ताल व लयबद्धता दिसली; आणि विचारांतीं त्याला पटलें कीं आधुनिक कलांचा जन्म हा त्या रानटी जीवनाचा वारसा आहे.

अमेरिकेंत, पॅरिसमध्यें व इंग्लंडमध्यें तो लग्नापूर्वी वर्ष दीड वर्षे राहिला. आपल्या दुर्दम्य ज्ञानलालसेमुळें अनेक विषयांवरील नवी-जुनीं पुस्तकें इंग्लंड व पॅरीसच्या वाचनालयांत त्यानें अहोरात्र वाचली व कला-भुवनाला भेट दिली.

आधुनिक जगांत क्वचितच पहावयास सांपडतील अशीं अमुल्य पैलू पाडलेलीं रत्नें त्यानें ओपारच्या अज्ञात प्रदेशांत पाहिली. तिथली समाजस्थिति पाहिली व त्या रानटी समाजाची व सुधारणेच्या शिखरावर बसलेल्या समाजाची त्यानें तुलना करतांच त्याला आठवलें कीं जगाचें बाह्यांग सुधारलें असलें तरी अंतरंग तसेंच स्वार्थी, क्रूर आणि रानटी राहिलें आहे. कित्येक वेळां त्याला वाटे मानवापेक्षां पशूच बरे. भरल्यापोटीं ते दुसऱ्यांचा घात तरी करीत नाहींत. अगदीं वाघ, सिंह सुद्धां ! पण माणूस ! सुधारणेचा टेंभा मिरविणारा माणूस क्षुल्लक स्वार्थाकरितां वाटेल तें भयंकर कृत्य बेधडक करतो.

एका अज्ञात प्रदेशांत– जेथें टारझनचें विमान कोसळलें तेथें– त्याला सुव्यवस्थित व सुसंघटित समाजरचना व राज्यव्यवस्था आहे असें, आकारानें लहान, लोक ( बुटके ) असलेले पण बुद्धीनें मोटे असलेलें एक लोकविलक्षण राज्य दिसलें. आणि त्यांची विज्ञानांतील प्रगति पाहून तो थक्क झाला.

आणखी दोन गोष्टी त्याला आढळल्या. सुदृढ, सशक्त, रुबाबदार प्रजा निर्माण व्हायला जोडप्यांतील पुरुष सशक्त हवा. त्यांचं शिस्तबद्ध सैन्य अर्ध्या रात्रीला देखील युद्धास तयार असायचें.

असो. झालं तें गेलं. पण आधुनिक भारताच्या नवपिढीला देखील इच्छा असेल तर 'टारझन' पासून बरंच शिकतां येईल व देशाचा उद्धार करतां येईल.

—— कृष्णाकुमारी शेरतुके

# ए क

## थोडे आधी

१८८८ सालची म्हणजे फार फार जुनी गोष्ट आहे ही. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांची एक नवी वसाहत होती. इंग्रज जेते तर निग्रोज जित होते. अर्थात् जित आणि जेते यांच्यात नेहमीच कलहाचे, वैमनस्याचे वातावरण निर्माण होत असे.

या काळ्या निग्रोंना ते गोरे इंग्रज--काही अपवाद सोडले तर--नेहमीच वाईट तऱ्हेने वागवीत. त्याना छळीत, अत्याचार करीत. त्यांच्या नोकरीचा काळ संपला तरी तो संपण्यास अजून बरीच वर्षे आहेत असे त्याना भासवीत. त्याना अधिक राबवून घेत, आणि ते अडाणी अज्ञानी लोक फसत.

पण हे काळेही काही कमी वस्ताद नसत. फार चिडले तर ते या गोऱ्या तरुणांना पळवीत. हे तरुण रबर व हस्तिदंताच्या मागे असत. या निमित्ताने काळे त्याना फसवून मनूष्य-भक्षक रानटी वसाहतीत सोडीत. मग तिथेच ते नाहीसे होत.

इतर युरोपियनही यावेळी येथे आले होते. ते पण रबर व हस्तिदंताच्या शोधांत असत. या दोन वस्तू मिळाव्या म्हणून ते पण काळ्याना आपल्या नोकरीत गुंतवीत.

ही व अशाच प्रकारची गाऱ्हाणी इंग्लंडात पोहोचताच वसाहती-वरील अधिकाऱ्याने या गोष्टीची चौकशी करून स्थिरस्थावर करण्या-करिता एक नवी अधिकाराची जागा निर्माण केली व त्या जागी जॉन क्लेटन–लार्ड ग्रेस्टॉक याची नेमणूक केली, कारण लार्ड ग्रेस्टॉक हा सैन्यांतील एक मोठा अधिकारी होता. तो काटक व सुदृढ होता. चतुर साहसी व सात्विक वृत्तीचा होता. आणि तो महत्वाकांक्षी असल्यामुळें ही महत्वाची व धोक्याची नोकरी त्याने आपल्या प्रेमळ नातलगांच्या विरोधाची पर्वा न करता स्वीकारली होती.

यावेळी लॉर्ड ग्रेस्टॉक–जॉन क्लेटन सुमारे चाळीशीचा होता व सहा महिन्यापूर्वींच त्याने ॲलिस रूधर्कोर्ट नांवाच्या पंचवीस वर्षांच्या अत्यंत सुंदर तरुणीशी लग्न केले होते. सध्या ती चार महिन्यांची गरोदर होती; पण तिने आपल्या नवऱ्याला बजावले, ‘तुम्ही तिथें मी!’ तेव्हा क्लेटनला ते मान्य करावे लागले. नंतर आपल्या जन्म घेणाऱ्या बाळाची, आपणा दोघांची वस्त्रं, अंथरूण-पांघरूणें, पुस्तकें वगैरे साहित्य घेऊन ते लॉर्ड, घराण्यांतील दांपत्य एक महिन्याने आफ्रिकेस जावयास निघाले.

## फुवालडा बोटीवर बंड

१८८८ तील मे महिन्यांतील ती डोव्हरची सुंदर सकाळ होती. त्याच दिवशी लार्ड आणि लेडी ग्रेस्टॉकने येऊन एका प्रवासी बोटीने इंग्लंडचा किनारा सोडला आणि एक महिन्याने ते फ्रिटाऊन नांवाच्या एका सागरी शहरांत येऊन पोहोचले. आणि तेथेंच त्यानी आफ्रिकेला जाणारी ‘फुवालडा’ नांवाची बोट पकडली. या बोटीवर लॉर्ड व लेडी ग्रेस्टॉक शिवाय इतर प्रवासी नव्हते; पण सरळ ही बोट आफ्रिकेला जाणारी असल्यामुळे ग्रेस्टॉक याच बोटीने निघाले पण

पधराच दिवसात त्याना कळले कीं सभ्य लोकानी प्रवास करावा अशी ही बोट नाही. बोटीवरील कप्तान, त्यांचे अधिकारी आणि खलाशी सारे सारे गुन्हेगार वृत्तीचे होते. सार खुनशी. ते व अधिकारी यांच्यात दुही निर्माण झाली. खलाशी क्रूर व कामचुकार तर अधिकारी उद्धट व अत्याचारी. ते खलाशाना छळीत. वेळ पडली तर त्याना मारीत. तेव्हां त्या खलाशानी कंटाळून अधिकाऱ्याला धडा शिकविण्याचा बेत केला.

दुसऱ्याच दिवशी कप्तानाने थोड्याशा चुकीवरून एका खलाशाच्या पायांत दाभण खुपसला. दुसऱ्या वेळी एका खलाशाच्या छातीवर पिस्तूल रोखले. तो ठारच मरायचा पण जॉन क्लेटनने (लॉर्ड ग्रेस्टॉक) आयत्या वेळी कॅप्टनच्या हातावर फटका मारल्यामुळे सुटलेली गोळी त्याच्या छातीत न शिरतां पायात शिरली. तो खलाशी क्लेटनमुळे वाचला; म्हणून चिडलेल्या इतर खलाशानी त्यावेळी मन आवरले व त्या जखमी खलाशाला—ब्लॅक—मायकलला बोटीच्या तळघरांत नेले. मग काहीं दिवस तो खलाशी कुठेंच दिसला नाही.

पण त्याच दिवशी क्लेटनने कप्तानाला बजावले होते, 'तू गाढवा सारखा वागतोस हे बरे नाही.' कप्तानाने क्लेटनला बजावले होते, 'आमच्या भानगडीत तूं पडू नकोस. तुला पश्चात्ताप करावा लागेल.' क्लेटन तेथून निघून गेला.

बोटीवरील वातावरण तंग होते, पण पंधरा दिवस साधारण शांत-गेले आणि एक दिवस ब्लॅक मायकेल क्लेटन जवळ येऊन म्हणाला,

'आम्ही कप्तान व अधिकाऱ्यांना धडा शिकविणार आहोत. उद्या तुम्ही आपली केबिन सोडूं नका. तुम्ही माझा जीव वाचवलात म्हणून तुम्हाला ही सुचना मी देत आहे. मध्ये पडलांत तर परिणाम वाईट होईल.'

ब्लॅक मायकेल व इतर खलाशी यांनी बंड केले. दारूगोळा त्यानी पूर्वीच लपवला होता. क्लेटनची पिस्तुलं पण चोरली होती. ते वीस पंचवीस होते. त्याच दिवशी संध्याकाळी कुणाला काही कल्पना नसता त्यानी कप्तान व इतर अधिकाऱ्याना गोळया घालून जहाज ताब्यात घेतले. क्लेटनला पण मारावे असे त्यानी ठरविले होते. कारण तो जिवंत राहिला तर आपण पकडले जाऊ असे त्याना भय वाटले; पण मायकेलने क्लेटन वाचवले. त्याने सांगितले, ' क्लेटनने एकदां माझा जीव वाचविला आहे. आपण त्याला आफ्रिकेच्या जंगलाजवळील किनाऱ्यावर सोडू मग तो आणि त्याचं नशीब. '

सर्वांनीं ते मान्य केले व मायकेलने ही गोष्ट क्लेटनला सांगितली. तेव्हा क्लेटन म्हणाला. ' असं करूं नका वस्तीजवळच मला सोडा. ' पण त्या निर्दय लोकानीं ही त्याची विनंती मान्य केली नाही. कारण त्याना आपल्या जिवाची भीति होतीच. क्लेटनने कुणाला ही हकीगत सांगितली तर आपण पकडले जाऊ असे त्यांना वाटले.

दुसऱ्या दिवशी त्याना एक बंदरासारखी जागा दिसली. मायकल तेथे उतरला त्यानें जागेची पाहणी केली. गोड्या पाण्याची सोय पाहिली आणि तो बोटीवर परतला आणि क्लेटन दंपतीला त्याने त्या भागात उतरविले कारण ती जागा त्याच्या दृष्टीने वस्तीला योग्य अशी होती. नंतर त्याने थोडा विचार करून क्लेटनला एक दारूगोळयाची पेटी, दोन रायफलस्, त्याची चोरलेली पिस्तुले परत केली आणि आपल्या खलाशांना हुकुम केला—

' जा, केकस्, बिस्किटे, कॉफी कोकोचे डबे, कंडेन्स मिल्कचे डबे, बटाटी, डबल बी, खारे मासे, खारे मांस वगैरे साहित्य आणा—

' भांडी, तेलाचा डबा, दिवे, मॅचबॉक्स. हेही आणा, नंतर त्याला आठवण होताच त्याने दुसऱ्या खलाशाना सांगितले.

‘काही सुतारकामाची हत्यारे, खिळे पावडे, कुऱ्हाड, कुदळ, मोटा सुरा, शिडाची कापडं, दोऱ्या अन् फळ्या पण आणा.’ नाखुषीनेच का होईना, पण ते सगळे सामान आणले गेले. नंतर मायकेल क्लेटनला म्हणाला, ‘इंग्लंडात कुणाला तरी निरोप पाठवून मी तुमच्या सुटकेची यवस्था करीन.’ त्याने असे क्लेटनला वचन दिले खरे, पण ते वचन एका गुन्हेगाराचे होते.

ज्या किनाऱ्यावर त्यांनी क्लेटन जॉनला सोडले होते तिथे एक गोड्या पाण्याचा झरा होता. पाठीमागे शंभर दिडशे फुटावर जंगल होते. त्यात अनेक फळझाडे, फुलझाडे होती. काही मोठमोठे वृक्ष होते. आसपास उंच गवत होते. अनेक सुंदर रंगाचे पक्षी इकडे तिकडे उडत होते. मंजूळ आवाज करीत होते. ॲलिसला वाटले निसर्गाचा वरद-हस्त ह्या स्थानावर आहे हे खरे. पण....पण हा एकांत, हे निर्मनुष्य रान अर्थात् जंगल म्हणजे हिंस्र प्राणी आलेच ! तिचे मन थरारले ! पण याला उपाय ? केवळ देवावर भार घालणे एवढाच एक उपाय होता.

•••

ग्रंथालय,
अनुक्रम
विभाग
क्रमांक ३१९४
नों. दि. २८.५.८५
वाचनालय



एका बंदरासारख्या जागीं मायकेलनें क्लेटन कंपनीला उतरवलं व त्यांचे करितां थोडेसे जीवनोपयोगी साहित्यही उतरून ठेवण्यास खलाशांना हुकूम केला.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# दोन

**सामान** तसेच रेतीत पडले होते. क्लेटन दांपत्य एका पेटीवर विचार करीत बसले होते. एका सरदार घराण्यातला माणूस दुर्दैवाने आफ्रिकेसारख्या प्रदेशाच्या ओसाड किनाऱ्यावर फेकला गेला होता.

'ॲलिस, आता असा विचार करून चालणार नाही. हे जंगल आहे. रात्रीची सोय पाहिली पाहिजे. उठ आपण आधी न्याहरी करूं.'

न्याहारी होताच क्लेटन रात्रीचा निवारा करण्याकरिता उंच जागा शोधूं लागला. जवळच त्याला चार मोठी उंच झाडे आढळली. त्यांचा एक चौकोन बनत होता. त्यावर त्याने बारा फूट उंचीवर एक बनविला. त्यावर वाशासारख्या जाड जाड फांद्या टाकून त्या दोरीने बांधून घेतल्या. त्यावर त्याने लहान फांद्या, गवत आणि तिथे मिळणारी लांबरुंद केसाळ पानें टाकली. या पानाना हत्तीचे कान म्हणतात. हा माच तयार होताच त्याच्यावर पाच सहा फुटावर दुसरा माच तयार केला. त्यावरही फांद्या, गवत, शिडाचे कापड टाकले. दोन माचा मधल्या चार उघड्या बाजू शिडाच्या कापडाने आच्छादून घेऊन रात्रीकरिता त्याने छान निवारा केला. तो पर्यंत संध्याकाळ झाली. संध्याकाळचे जेवण त्यानी आटोपून घेतले आणि माचावर चढण्याकरितां

एक मजबूत शिडी तयार केली. नंतर त्याने काही कपडे, पांघरुणे, ब्लँकेटस् व खाण्याच्या सामानाचे काही डबे व पाणी वर नेले. काही हलके सामानही वर नेले. बाकीचे सामान झाडाच्या बुंध्याशी खाली आणून ठेवले आणि रायफल व सुरा घेऊन ॲलिससह तो आपल्या निवाऱ्यात चढला. तो सुंदर निवारा – माच – पाहून ॲलिसला आपल्या पतीच्या चातुर्याचे नवल वाटले. तिने त्याचे अभिनंदन केले.

त्यांच्या मनाप्रमाणे निवारा तर उत्तम झाला होता. ती चांदणी रात्र होती. थोड्याच वेळांत चंद्र वर आला. समुद्राचे पाणी लकाकू लागले. मग थोडावेळ गप्पागोष्टी करून श्रमाने थकल्यामुळे ते लौकरच झोपी गेले.

पण मध्यरात्री कसल्याशा आवाजाने ॲलिस जागी झाली. रात-किड्यांचा आवाज पक्षांचे फडफडणे, पशूंचे ओरडणे यानीच ती जागी झाली होती. झोपताना जॉनने एका बाजूचे कापड खाली पाडले नव्हते. त्यातून ॲलिसला किनाऱ्यावर मनुष्याकृतिसारखे काही तरी दिसले. तिने जॉनला उठविले. ‘ जॉन ! जॉन ! ते पहा. माणसा-सारखे काही दिसतय ’ त्याने पाहिले. पण त्याला काहीच दिसले नाही. तेव्हा तो म्हणाला ‘ झोप झोप रानात असं असायचंच. घाबरू नकोस ’ आणि त्याने तिला अगदी आपल्या कुशीत घेतले आणि ती पण त्याला अगदी बिलगून झोपली.

सकाळी तांबडे फुटताच त्याना जाग आली. पहाटवारा आणि पक्षांचे मंजूळ आवाज मनाला रंजवीत होते. समुद्र शांत होता. पण चांगले उजाडेपर्यंत ते खाली उतरले नाहींत. पण खाली उतरताच ती समुद्र किनाऱ्यावर गेली. जवळच्या झऱ्यावर त्यानी तोंड धुतलीं व ते परतले. नंतर त्यानी कॉफी तयार केली. कंडेन्समिल्क त्यांत

मिसळले आणि केकस् बिस्किटाबरोबर त्या गरमागरम कॉफीचा आस्वाद घेतला.

' जॉन ! तुला आतां बरं वाटतय ना ? काल तुला फार श्रम झाले आणि गरमागरम असं काहीच मिळालं नव्हतं. '

' ॲलिस श्रमाचं मला काहीच वाटत नाही. मी चांगला धट्टाकट्टा आहे. सैनिकी जीवनांत कष्ट करण्याची मला सवय होती. पण मला जे काही वाटतं ते तुझ्याबद्दल. मुळातचं तूं नाजूक आणि आजची तुझी नाजूक परिस्थिती. उगाच तूं माझ्या बरोबर आलीस. बाळंतपणानंतर आली असतीस तर हा वनवास तुझ्या कपाळी आला नसता. ' अस्स ! पण तुला मी कसं एकटं सोडणार ! पण जाऊ दे आता पुढे ?

' पुढे ! आता मी आपणासाठी एक अगदी छान मजबूत घरकूल बांधणार ! बोटीवर केबिन असते ना ! तसा प्लॅन माझ्या डोक्यात आहे. आजच सुरूवात करणार; पण तू आता माचावर चढ व वाचीत बस नवू.

## जॉनची केबिन

अजून वातावरणात थंडावा होता. जॉनने कामाला सुरुवात केली. वेगवेगळया झाडांच्या तीन चार इंच जाड, दहा बारा फूट लांब अशा अनेक फांद्या त्याने तोडून आणल्या. नतर खांबासारखे जाडजूड सरळ असे आठ खोड आणले आणि जमिनींत खड्डे खणावयास सुरुवात केली. काम फार कठीण होते. पण सकाळ संध्याकाळी थंड वेळी काम करावयाचें असे त्याने ठरविले होते. नाहीतर आफ्रिकेतली उन्हं ! त्या कडक उन्हात कोण काम करणार ? आठ दिवसांत झाडाचे उभे सोट पुरून झाले. त्याच्यांत त्याने खाचे पाडले आणि आडवे सोट घट्ट बसविले. बाहेरून उभे सोट पुन्हा जवळ जवळ पुरले व चार भिंती उभ्या केल्या. खिडकी करायला पण तो विसरला नाही;

तिला पण त्याने जाड जाड उभ्या आडव्या पट्ट्या मारल्या. हवा तर आत यावी पण पशूना आत शिरकाव करता येऊ नये. नंतर त्या भिंती झऱ्याजवळच्या ओल्या चिकण मातीने आतून बाहेरून त्याने लिंपून घेतल्या व तशाच प्रकाराने आकाराच्या, फांद्या फांद्या जोडून त्याने छप्पर तयार केले. ते पण वरून मातीनें लिंपून घेतले. तशाच प्रकारे आतील जमीन त्याने ठोकून ठाकून घट्ट केली. आणि चिकण मातीने सारवून घेतली. पण आता प्रश्न राहिला तो दाराचा. दार कसे करायचे ? केले तर ते कसे जोडायचे ? पण शेवटी त्याला एक युक्ती सुचली. सामानाच्या काही पेट्यांच्या फळ्या त्यानें काढल्या आणि त्या एकावर एक खिळ्यानी ठोकून तीन चार इंच जाडीचे साधारण उंचीचे एक दार तयार केले. पण ते जोडणार कसे ! मग त्याने पेट्यांची बिजागरे काढली. त्यांचा उपयोग करून त्याने दार उभे केले. त्याला पुन्हां उभ्या आडव्या पट्या बाहेरून मारल्या आणि आतून एक आडती केली. दार इतके मजबूत झाले की कल्पने बाहेर. नंतर त्याने कोपऱ्यात चूल तयार केली छपरातून धूर बाहेर जायला एक चिमणी केली आणि उजेडासाठी मध्यावर एक झरोका ठेवला आणि नंतर ॲलिसला हसत म्हटले ' हे तुझं स्वयंपाकघर !'

छान दहा बाय बाराच घरकूल झालं ना ?'

' किती हुशार आहात तुम्ही जॉन ! उगाच नाही तुमची नेमणूक त्या महत्वाच्या पदावर झाली ! '

जॉनने एक सुस्कारा टाकला व तो एका पेटीवर बसला नंतर हळूच म्हणाला, ' तुझ्यामुळेच मला हे सारं सुचतं. करता येतं. तू ह्या संकटात माझ्याजवळ आहेस हीच कल्पना मोठी उत्तेजक आहे. मनाला उत्साह देणारी आहे; पण मला ही आपली केबीन आता लौकरच

तयार केली पाहिजे किती दिवस तू आता ह्या शिडीवरून चढणार? मला फार भय वाटत. घसरलीस तर!'

संध्याकाळपर्यंत सर्व जमीन सुकली तेव्हा जॉनने हळुहळु सर्व पेट्या आत आणून ठेवल्या आणि रात्रीच्या निवाऱ्याकरिता ते आपल्या माचावर गेले.

केबिनमध्ये राहायला येऊन आता त्याना दोन दिवस झाले होते. एवढ्या अवधीत जॉनने एक मजबूत लाकडी खाट तयार केली. मायकेलने दिलेल्या फळ्या होत्याच. त्यामुळे खाट छान लांब रुंद झाली होती. दोघांना अगदी पुरेशी. ह्या खाटेवरच रात्री त्यांनी आपले अंथरूण घातले. खाटेवर झोपताना ॲलिसला फार समाधान वाटले.

रात्रीची बाराची वेळ असेल, कसल्या तरी आवाजाने ती जागी झाली. भिंतीवर पंजांचा आवाज येत होता. भीतीने तिने जॉनला उठविले. त्याला पण पंजांचा आवाज ऐकूं आला. 'हं! असेल एखादा हिंस्र पशु! पण आपणाला कसले भय!' मग तिला आपल्या कुशीत घेऊन, तिच्या मस्तकावर थोपटीत तो म्हणाला, 'ॲलिस! लाडके मी असताना इतकं घाबरण्याचं कारण काय? झोप, झोप!' मग ती त्याला बिलगून समाधानाने झोपली.

असेच दिवस जात होते. रात्री वाघाचे, सिंहाचे गुरगुरणे ऐकू येई. कधी कधी भिंतीवर ओरखडल्यासारखे वाटे. मग सारे शांत होई. दिवसा मात्र विशेष भय नसे. लहान लहान माकडे, छोटे मोठे पक्षी निर्भयपणे त्यांच्या आसपास फिरकत आणि जॉनच्या कामाकडे नवलाने पहात. दुपारची वेळ ते गप्पा गोष्टीत किंवा वाचनात घालवीत आणि जॉन घरकुलाचे काम करीत असताना ॲलीस काही विणीत किंवा आपल्या जन्माला येणाऱ्या बाळाकरिता कपडे शिवीत बसे. ते एकाकी जीवन

आता त्यांच्या अंगवळणी पडले होते. एकच होते की त्यांना कोठे मोकळेपणाने फिरता येत नव्हते.

जॉन क्रेटनला शिकारी करिता, मासे पकडण्याकरिता कधी कधी बाहेर जावे लागे. तेव्हा त्याला वाटले आता एक लाकडी कुलूप करावे. आणि खरोखरच त्याने एक कुलूप तयार केले आणि बाहेर जाताना तो ते केबिनच्या दाराला लावून जाऊं लागला. आज त्याच्या मनांत आले की एक खुर्ची व टेबल करावे. त्याकरिता त्याने एक झाड पाडून ठेवलें होते. ते त्याने तोडायला घेतले. इतक्यात काही छोटी छोटी माकडे चित्कार करीत पुढे येत येत मागे पाहू लागली. कसला घबराट उडाला म्हणून जॉनने वर पाहिले. एक गोरीला त्याच्या दिशेने येत होता. जणू मूर्तिमंत मृत्यूचे प्रतीक! आज जॉनने पिस्तुल किंवा रायफल कोणतेच शस्त्र बरोबर आणले नव्हते. कारण तो केबिनच्या जवळच काम करीत होता. हातात फक्त एक कुऱ्हाड होती. त्याने केबिनकडे पाहिले आणि मोठ्याने ओरडून ॲलिसला सांगितले, 'आंत जा, दार लावून घे.' पण ॲलिस तिथून गेली नाही. नवऱ्याच्या समोर मूर्तिमंत मृत्यु उभा असता ती आंत कशी जाणार? ती बावरली. जॉनने आता आपल्या कुऱ्हाडीकडे पाहिले. गोरीलयाला मारण्याचे सामर्थ्य त्या कुऱ्हाडीत नव्हते. याच वेळी तो गोरीला चार फुटावर आला. जॉनने कुऱ्हाड त्याच्या अंगावर उगारली. पण गोरिल्याने ती त्याच्या हातातून हिसकून दूर फेकली. आणि आता तो आपल्या सुळ्यांनी जॉनचे नरडं फोडणार तोच ॲलिसने पिस्तुल झाडले. गोळी गोरिल्याच्या दोन खांद्यांच्या मध्ये लागली आणि तिरमिरीने तो मागे फिरला. आणि ॲलिसच्या अंगावर धावला. ॲलिसला दुसरी गोळी काही झाडता आली नाही. भीतीने ती खाली कोसळली आणि आता तो तिचा गळा पकडणार तोच

पडता पडता त्याचा प्राण गेला. तो ॲलिसच्या अंगावर कोसळलाच.

जॉनला वाटले ती मेली. त्याने ते गोरील्याचे धूड ॲलिसच्या अंगावरून ओढून काढले आणि धापा टाकीत तो तिच्याजवळ वसला. तिला चाचपून पाहिले तेव्हां त्याला समजले ती मेली नव्हती. तिला कोणतीच इजा झाली नव्हती. ती फक्त बेशुद्ध पडली होती. शुद्धीवर यायलाच तिला दोन तास लागले. जॉनला आनंद झाला. आज तिने त्याचा जीव वाचविला होता.

त्याच रात्री ॲलिसने आपल्या मुलाला जन्म दिला. हे नवजात बालक फार सुंदर, सतेज आणि बळकट होते. पण ॲलिस फार अशक्त झाली होती. त्या शॉकमुळे तिची प्रकृति बिघडत गेली. केबिनच्या बाहेर तर ती कधीच पडली नाही. जॉन तिची फार काळजी घेई. तिचे ते लाडके बाळ तिच्याजवळ होतेच. त्या मुलाचे कौतुक करण्यात ती बराच वेळ घालवी. काही वेळा जॉन तिला वेगवेगळी पुस्तके वाचून दाखवी. पण कधी कधीं, तिला तो जो भयंकर शॉक बसला होता त्यामुळे ती असंबद्ध बडबड करी. ती इंग्लंडांतील घरादाराविषयी असे. तिला वाटे आपण इंग्लंडातच आहोत आणि हेच क्षण तिच्या आनंदाचे आहेत, असे जॉनला वाटे. आणि खरोखर तिच्या आयुष्यातील हेच वर्ष तिचे अत्यंत सुखाचे होते.

बाळ आता तेरा महिन्याचा झाला होता. आणि एक दिवस रात्री तिला मृत्यूनें गाठले. पहाटेस ती झोपली ती उठलीच नाही. ती मेली आहे हे जॉनला कितीतरी वेळ कळलेच नाही.

या सर्व काळात जॉनने आपली डायरी लिहिली होती आणि आज त्यानें शेवटचे शब्द लिहिले.

‘ माझा मुलगा दुधाकरितां रडत आहे. ॲलिस मी आता काय करू ? ’

हे शब्द उच्चारून त्याने आपणच केलेल्या टेबलावर मान टाकली.

● ● ●

# ती न

**करचाक** नावाचा माकड आज फारच संतापला होता. तो का संतापला होता हे त्याच्या जातभाईंपैकी कुणालाच कळत नव्हते. दोन तीन माकडीणीची पोरे त्याने आपटून मारली. दोन तीन माकडीणींना त्याने भुईसपाट केले. एका म्हाताऱ्या माकडाला मारले. बाकीचे तरुण माकड–माकडीणी झाडाझुडातून पळून गेल्या आणि त्याच वेळी काला नावाची माकडीण आपले भक्ष्य शोधून, खाऊन परत येत होती. ती तावडीत सापडताच तो तिचा पाठलाग करूँ लागला. ती जीव वाचविण्याकरिता पळू लागली. त्याने तिचा पाठलाग सुरू केला. झाडाझाडावरून उड्या घेत खांद्यावरच्या पोराला सांभाळीत ती बरीच दूर गेली. पण मध्ये एक झाड आड आले. त्याच्या फांद्या आडव्या तिडव्या होत्या. तिने जीवाच्या आकसाने उडी घेतली आणि तिचा हात निसटून तिचे पोर तीस फुटावरून खाली पडले व मेले. त्याला पोटाशी धरून दु:खी 'काला' झाडाखाली बसली.

आता तिला करचाकचे भय वाटत नव्हते. जिवाची पर्वा नव्हती. कारण पशूतहि अपत्य प्रेमाला बरेच स्थान असते.

आता करचाकचा राग पण शांत झाला होता. तो त्या वानरांचा राजा होता. माणसांच्या राजापेक्षा पशूंच्या राजाला जास्त हक्क अस-

तात. त्यांच्यात जो अधिक बलवान, अधिक क्रूर असतो तोच राजा होतो. करचाक तसाच होता. त्याचे वजन तिनशें पौंडापेक्षा अधिक होते. त्याचे दात म्हणजे मोठे मोठे फाळ होते. आणि त्यावरच त्याचे राजेपण अवलंबून होते. त्यामुळेंच त्याला राज्यपद मिळाले होते. काला त्याच्या सारखीच बलवान होती. फार सुंदर होती आणि इतर वानरीणींपेक्षा प्रेमळ दिसत होती. आणि कालाचे पहिलेच मूल आज मेले होते.

करचाक आपल्या वसाहतीत परत आला आणि त्याने आपल्या प्रजाजनांना हुकुम सोडला 'चला! माझ्या मागून या.'

आतापर्यंत पळून गेलेले सारेच वानर परतले होते. सर्व जण करचाकच्या मागून निघाले. वाटेत त्यांना काला भेटली. ती पण त्यांच्या मागून ते मेलेले मूल घेऊन निघाली. अलिकडे प्राण भयाने ते त्या केबिनकडे जात नसत. गेले तर जॉन क्लेटनच्या बंदुकीच्या गोळीला बळी पडत. त्याची बंदुक म्हणजे विस्तव ओकणारी एक भयंकर काठी वाटे. त्यांना जणू तो मृत्युदंड होता.

पण ते तेथे करचाकच्या हुकुमाप्रमाणे आले आणि त्यांना केबिनचा दरवाजा उघडा दिसला. सारे चकित झाले. पण शूरवीर करचाक आत शिरला. कारण त्या गोऱ्या माकडाचा, जॉन क्लेटनचा तो फार द्वेष करीत असे. त्यालाही कारण होते. त्याने त्याची बरीच प्रजा मारली होती. एक दोनदां त्यालाहि जीव घेऊन पळावे लागले होते. पण आज त्याला संधि मिळाली होती.

पत्नीच्या मृत्यूनें हताश झालेला जॉन टेबलावर डोके टेकून बसला होता. करचाक तो दुष्ट वानर आत आला हे त्याला कळले नाही, पण चाहूल लागताच तो धडपडत उठला आणि मृत्युरूपी तीन कराल राक्षस त्याला त्याच्याजवळ दिसले. आणि त्याला भयाने धडकी भरली. दुसरे वानर दारात गर्दी करून उभे होते. जॉन निशस्त्र होता.

त्याच्या बंदुका वानरांच्या मागे भिंतीवर टांगलेल्या होत्या. तिथे त्याची नजर गेली. आणि त्याच क्षणी करचाकने त्याचा गळा दाबला व त्याला खाली लोळवले. क्षणात त्याचा प्राण गेला.

इतक्यांत जॉनच्या बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकताच करचाक तिकडे वळला. पण त्याच्या आधीच कालाने झडप घालून ते मूल उचलले. आणि दूर एका उंच झाडावर ती जाऊन बसली. मूल रडत होते. कालाने मातृभावनेने, आईच्या जन्मजात अंतर्बुद्धीने त्याला आपल्या छातीशी धरले आणि ते मूल शांत झाले. त्याच वेळीं कालाचे मृत मूल त्या मानवी बाळाच्या पाळण्यांत पडले होते. आपलेच मूल समजून ती त्या मानवी बाळाला घेऊन गेली होती.

काला दूर जाताच करचाक लेडी ॲलिसच्या खाटेकडे वळला. खाटेवरचे वस्त्र त्याने आपल्या अडदांड हाताने ओढले. आणि एक लुसलुशीत मासाचे काहीतरी त्याला दिसताच त्याने आपली नखे तिच्या गळ्यांत खुपसली. पण लौकरच त्याला कळले की ते मृत शरीर आहे. मग त्याने त्या प्रेताचा नाद सोडला. सर्व केबीन उसकटली पण त्या बंदूकीना हात लावण्यास तो धजला नाही. त्या बंदूका, ते मृत्युदंड पाहून तो दचकलाच. आणि तो केबिनच्या बाहेर पडला. त्याचे प्रजाजन पण त्याच्या मागोमाग गेले. पण काला त्या झाडावरच बसली होती. ते मूल ती पाजीत होती. आता मानवी मूल आणि वानर मूल यांच्यातले अंतर लोपले होते. आता एका इंग्लिश सरदाराचे व सरदारणीचे लेडी ग्रेस्टॉकचे मूल एका वानरीचे दूध पीत होते.

करचाक जाता जाता थांबला आणि काला बसली होती त्या झाडाखाली येऊन म्हणाला, म्हणाला कसला त्याने हुकूम केला ' चल.'

आणि तिला ते मूल घेऊन जावे लागले.

करचाकच्या बरोबर आणखी तीन वानर होते. त्यांच्यापैकी एक करचाक इतकाच बलवान होता, पण करचाक राजा होता. त्याच्या समोर कोणी काहीच करू शकत नसे. पण करचाक जाताच त्या वानराने बंदुकीजवळ आपली बैठक मारून तो तसाच बसून राहिला आणि मग त्याने हळूच धैर्य करून एका बंदुकीला हात लावला. पण बंदुकीतून विस्तव बाहेर पडला नाही. आता त्याला समजले नुसता हात लावण्याने तो मृत्युदंड विस्तव ओकत नाही. मग त्याने अधिक धैर्य करून एक बंदुक उचलली व तो केबिनबाहेर पडला. केबिनपासून थोडे दूर येताच तो, तो मृत्युदंड, ती बंदूक तपासून पाहू लागला. आणि काय झाले कोण जाणे बंदूकीच्या घोड्यावर त्याच्या बोटाचा दाब पडला आणि ती बंदूक उडाली. बापरे! केवढा आवाज ! तो बंदूक टाकून पळत सुटला आणि उरले सुरले वानर पण पळाले.

सर्वांच्याबरोबर काला चालली होती. करचाक शांत झाल्यामुळे तिला आता त्याचे भय वाटत नव्हते. पण आता हे मानवी मूल सांभाळून नेण्यास तिला त्रास पडत होता. वानरीचे मूल वानरी धावत असता किंवा झाडावरून उड्या घेत असता आपल्या आईच्या काखेत हात घालून तिला घट्ट बिलगून बसते. पण लार्ड ग्रेस्टॉक व लेडी ग्रेस्टॉकचा हा मुलगा तसे कसे करणार ? तेव्हा कालाला एका हाताने त्याला पोटाशी धरून सर्वांच्या मागून जावे लागत होते. आणि तसे म्हटले तर तिला पण ते मूल छातीपासून सोडायची इच्छा नव्हती. कारण तिचे एक मूल धावताना पाठीवरून पडून मेले होते.

वानरांच्या वस्तीत पोहोचताच सर्व वानर काला-भोवती गोळा झाले. त्यांना त्या मुलाला स्पर्श करावासा वाटत होता. त्या पांढऱ्या मुलाच्या

अंगावर केस नव्हते. पण कालाला वाटत होते यांचे राकट हिडिस हात माझ्या बाळाला लागायला नकोत. ती आपले सुळे बाहेर काढून त्यांचा प्रतिकार करू पहात होती. आणि जेव्हा त्यांनी सांगितले तुझ्या बाळाला आम्ही हात लावणार नाही तेव्हांच तिने त्याला त्यांना पाहू दिले.

●●●

# चा र

सुधारक वाचनालय
अनुक्रम ..........
विभाग ..........
आवि ..........
नों. दि. ........

## –श्वेत वानर टारझन–

काला आपले तन मन धन अर्पण करून टाइझनला वाढवीत होती. पण एका गोष्टीचे नवल तिला वाटत होते, की आपल्या जातीची वानरे या वयात स्वतंत्र होतात. झाडावर उड्या मारतात. आपले थोडे फार भक्ष्य मिळवतात. पण हा आपला गोळाच काही करत नाही. स्वतंत्रपणे खेळत नाही. एक वर्षाची झाली की ती मुले दूर जातात आणि याला काहीच येत नाही हे कसे? मग तिने आपल्या जातीतील काही वृद्ध स्त्रियांना त्याबद्दल विचारले; पण त्या तरी काय सांगणार? अजून त्याच्या अंगावर इतर वानरांप्रमाणे केस नव्हते. त्याला नाजूकसे दात होते. काही खाण्याची अक्कल नव्हती आणि ठाऊक नव्हते. तरी आज तो दोन वर्षाचा होता. कालाने त्याला आणले तेव्हा तो तेरा महिन्यांचा होता. म्हणजे वानराच्या हिशोबी तेरा चंद्र उलटून गेले होते. टुबलाट, कालाचा नवरा पण घाबरला होता; पण घाबरला होता म्हणण्यापेक्षा त्रासला होता असे म्हटले तरी चालेल.

एक दिवस तो कालाला म्हणाला, 'हा तुझा मुलगा मोठा वानर कधीच होणार नाही. आपल्या वंशाचे पांग फेडणार नाही तेव्हा तू

त्याला त्या लांब लांब गवतात सोडून दे. आणि तुला दुसरे मूल होऊ दे. विन केसाच्या मुलाचा आपणाला काय उपयोग ?'

तेव्हा संतापलेली काला त्याला म्हणाली, 'मला हेच मूल पाहिजे. तुला काय करायच ?'

'अग पण आमच्या म्हातारपणी आम्हाला मदत करायला कुणी तरी पाहिजे ना ?'

'बरं ! बरं ! तुझे तू पहा मला काही सागू नकोस.'

मग टुबलाट करचाककडे गेला आणि त्याने त्याला सांगितले, 'तू तरी कालाला काही सांग ते निरोपयोगी मूल आम्हाला काय करायचे ?' तेव्हा करचाकने कालाला बोलाविले व म्हटले,

'ऐक काला ! टुबलाट म्हणतो तसे कर. हे काय तुझे पोर की पोराचे सोंग ?' 'माझे पोर ते कसेही असले तरी मला पाहिजे. तुम्हाला त्याचा कसला त्रास वाटतो ? पुन्हा पुन्हा मला त्रास द्याल तर मी आपली जात सोडून जाईन !' ती संतापाने म्हणाली. आणि खरोखरच काही वानरं तशी वागत व निघून जात. तिने, त्या सुंदर तरूण वानरीणीने जात सोडून जावे असे कुणालाच वाटत नव्हते.

आता टारझन (म्हणजेच गोऱ्या कातडीचा वानर) दहा वर्षांचा झाला होता. दहा वर्षांचा मानवपुत्र म्हणजे लहानच. पण या वयात वानराची पूर्ण वाढ होते. त्याची उंची जवळ जवळ सहा फूट होते. त्या मानाने टारझनची उंची कितीतरी कमी होती. पण त्याचे बळ आता वाढले होते. झाडाच्या फांद्यावर झेपा घ्यायला, उड्या मारायला तो शिकला होता. आणि त्याचा मेंदू म्हणजे माणसाचा मेंदू होता. वानरांच्या दसपट त्याची अक्कल होती. अगदी वेळेवर त्याला अचूक युक्ति सुचे. आता त्याच्याबद्दल तक्रार करायला कोणाला जागा नव्हती.

एक दिवस तो आपल्या सवंगड्याबरोबर तळ्याच्या बाजूला गेला

होता. म्हणजे खेळता खेळता तो व त्याचे मित्र तेथे कधी आले हे त्याला कळलेच नाही. आणि मग तळे पाहून तो दचकला. त्याच्या आईने—कालाने त्याला—सांगितले होते की पाण्याजवळ कधी जाऊ नकोस. त्याला पण पाण्याचे भय वाटे. ते थंड थंड पाणी आणि ते आकाशातून धबधब्याप्रमाणें पडणारे, विजा चमकून पडणारे, मोठा वारा सुटेल तेव्हा पडणारे म्हणून पाण्याचे त्याला मोठे भय वाटे. पण आता ते नदीवर आले होते आणि पाणी पिता पिता त्याचे व त्याच्या मित्राचे प्रतिबिंब त्याला पाण्यात दिसले आणि ते मित्राचे प्रतिबिंब पाहून त्याला वाईट वाटले. तो मित्र किती सुंदर होता! त्याचा केसाळ चेहरा, फत्ताडे नाक, लांब लांब सुळे सारे सुंदर होते आणि टारझनचा म्हणजे त्याचा स्वतःचा चेहरा. बिनकेसाचे स्वच्छ तोंड, सरळ नाक, त्याचे ते तपकिरी छोटेसे डोळे, नाजूक दात सारे सारे त्याला कुरूप वाटू लागले. पण करणार काय?

अशा विचारात तो पाणी पीत होता. आणि त्याच्या मागे एक सिंहीण ( सोवार ) त्याच्यावर झडप घालण्यास टपली होती. सकाळ-पासून ती उपाशीच होती; पण या दोघांना त्याची दाद नव्हती. कारण त्याचा मित्र तोंडानें मचमच आवाज करीत पाणी पीत होता. त्यामुळे सिंहिणीची चाहूल त्यांना लागली नाही. आणि दबत दबत येऊन सिंहिणीने त्यांच्यावर उडी घेतली. सिंहिणीची पहिली उडी पडली ती त्या वानरावर.

टारझन घाबरला आणि त्याने प्राणभयाने तळ्यात उडी टाकली. टारझनने पाण्यात उडी टाकताच त्याच्या नाकाडोळ्यात पाणी गेले; पण हातपाय हालवीत तो वर आला. त्याला समजले की हातपाय हलवले की डोके वर राहते. मग त्याने तसेच पाण्यावर हात मारायला

लागताच तो पुढे पुढे जाऊं लागला. असा तो काठाकाठाने पोहत होता आणि त्याचा मित्र विचारा तो वानर मृत्युमुखी पडला होता.

टारझन वाचला. त्याच्या माणसाच्या मेंदूने त्याचा जीव वांचवला. टारझन काठाकाठाने पोहत होता आणि ती सिंहीण काठाकाठाने फिरत त्याचा घास घेण्यास टपली होती; पण पाण्यांत किती वेळ राहणार ? शेवटी टारझनने स्वतःचे संरक्षण व्हावे म्हणून आपल्या जातभाईंना मोठ्याने साद घातली. ती साद त्याच्या वस्तीत पोहोचली, तेव्हां चाळीस पन्नास मोठे वानर जमावाने आले. त्यांच्यात काला पण होती आपल्या लाड-क्याची हाक तिने ऐकली होती. वानरे येताच सिंहीण पळून गेली.

टारझन जेव्हां पाण्यातून बाहेर पडला तेव्हा त्याला फार बरे वाटले. जणू पाण्यानें त्याला नवजीवन दिले. तो ताजातवाना झाला. मग जेव्हा जेव्हा संधि मिळे तेव्हा तेव्हा तो पाण्यात मनसोक्त डुंबे. काला त्याला रागावे.

वानर ज्या प्रदेशात रहात होते तो पंचवीस चौरस मैलांचा प्रदेश होता. करचाक त्यांना नेहमी वेगवेगळ्या भागांत घेऊन फिरे त्यामुळे तिथे त्यांना मुबलक खाद्य मिळे व हवामानाप्रमाणे त्यांना बरेहि वाटे.

टारझन अलिकडे गवताच्या दोऱ्या करावयास शिकला होता. त्या दोऱ्यांनी आपल्या संवगड्यांबरोबर खेळता खेळता त्याला एक नवा खेळ मिळाला. त्याने त्या दिवशी दोरीचा फास एका वानराच्या गळयाभोवती टाकला. दोरीची दुसरे टोक त्याच्या हातांत होते. त्याने ते जरा खेच-ताच त्या वानराच्या गळयाला फास बसला आणि टाइझनला एक नवा खेळ मिळाला. या दोरीच्या फासाने त्याला नुमा ( सिंह ) किंवा सोबर ( सिंहीण ) हिला पण फास घालता आला आसता.

●●●

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# पाँच

## रानातील झाडे

**करचाकबरोबर** वेगवेगळ्या ठिकाणी संचार करताना टारझन नेहमी त्या केबिनच्या जवळ येते असे. अनेक वेळा उत्कंठेने त्याने केबिनच्या खिडक्या उघडण्याचा, दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण कधीच काही त्याला जमले नाही. एकदा तर तो त्या केबिनच्या छपरावर चढला आणि त्याने आत पहाण्याचा प्रयत्न केला पण छपरावर चढून आतले कसे दिसणार? लॉर्ड ग्रेस्टॉकने ती जी केबिन बांधली ती अतिशय मजबूत होती. पावसापासून, अरण्यातील हिंस्त्र पशुपासून संरक्षण व्हावे ही त्याची योजना होती.

टारझन जेव्हा त्या केबिनकडे येत असे तेव्हा अगदी एकटा येत असे. दुसऱ्या वानरांना तीबद्दल काही वाटत नसे. त्यांच्यापैकीं काही-जणांना मात्र इतकेच आठवे की त्या केबिनमध्ये एक पांढरा-श्वेतवर्णीय वानर रहात असे. त्याच्या हाती वानरांना मरण देणारी एक काठी असे. पण आता या आठवणी अगदी अंधुक झाल्या होत्या. कालाने त्याला एकदा त्या श्वेतवर्णीय वानराबद्दल सांगितले होते; पण त्याला काही समजले नव्हते. त्याला इतकेच माहित होते की काला त्याची

आई होती आणि कालासुद्धां नवऱ्याला विरोध करून त्याला प्राण-पणाने जपत होती.

आज त्याने, टारझनने, केबिनचे ते दार उघडण्याचा अगदी निश्चय केला होता. त्या दाराबरोबर बराच झगडा करता करता एकदम त्याची खिटी वाजली आणि करकर करीत ते दार उघडले. दार पूर्ण उघडून टारझन आतां गेला. वाटेत एक सापळा पडला होता. खाटेवर पण सापळा होता. पाळण्यांतहि होता पण टारझनला त्या सापळ्याशी काही करायचे नव्हते. मृत्यूचे देखावे हा तर त्याचा नेहमीचा खेळ होता. मग त्याला त्याचे काय वाटणार ?

टारझन नंतर इतर वस्तुंकडे वळला. आत अनेक वस्तु होत्या. नंतर त्याने कपाटाचे खण उघडले. त्यात अनेक वस्तु होत्या. त्याच ठिकाणी त्याला एक तीक्ष्ण धारेचा सुरा आढळला. ते काय असावे हे त्याल कळेना. पहिल्याने त्याने तो आपल्या बोटावर फिरवून पाहिला तर त्याचे बोट कापले. नंतर टेबलावर, खुर्चीवर आपटून पाहिला तर त्यांचे कपचे निघाले.

'वा ! छान आहे. याचा आपल्याला चांगला उपयोग होईल.' असे म्हणत त्याने तो सुरा आपल्या कंबरेला बांधला.

तिथे एक पुस्तकांचे कपाट होते. टारझनने ते उघडले. त्यात अनेक प्रकारची सुंदर सुंदर पुस्तके होती. त्यातील एक पुस्तक फारच सुंदर होते. इंग्रजी मुळाक्षरांचे ते पुस्तक होते. त्यात अनेक रंगीबेरंगी चित्रे होती. ती पाहून टारझनला फार आनंद झाला. आणखी एक नवा खेळ !

त्यात जी चित्र होती त्या चित्रांखाली काहीतरी लिहिलेलं होतं. टारझनच्या अकलेप्रमाणे हालचाल न करणारे ते जंतू होते. त्यांना पाय

होते. पण डोके व डोळे नव्हते. असे जंतु चित्रांच्या खाली व अधून-मधून पण होते.

पण ते काय होते हे त्याला कळेना. मात्र काही चित्रे पशूची होती. त्यातील बरेच पशु त्याने रानात पाहिले होते. पण त्याला मौज वाटली ती त्या एका जंतुबद्दल. त्यात एक मोठा जंतु होता M. आणि त्याच्या-पुढे अनेक जातीची वानरांची चित्रं होती. लहानमोठ्या वानरांची होती. पण त्यांच्या जातीच्या वानरांची नव्हती. पण ते जे जंतु, ती जी अक्षरे होती, ती मुळाक्षरे होती.

काही वेळाने टारझनला त्या अक्षरांचा कंटाळा आला. त्याने ती पुस्तके कपाटात ठेवली. कपाटाचे दार लावले. आपल्या या खजिन्याला कोणी हात लावू नये, असे त्याला वाटत होते.

तो केबिनच्या बाहेर पडला तेव्हा अंधार पडला होता आणि पुस्तकात पाहिलेली ती त्याची वैरीण सिंहीण, ते वळवळणारे सर्प (हिस्टा) सारे सारे त्याला आठवत होते. आणि इतक्यात अंधारांत त्याला एक आकृति दिसली. प्रथम त्याला वाटले आपलाच कोणीतरी जातभाई असेल! पण त्याला नंतर कळले की तो एक मोठा प्रचंड गोरीला होता.

टारझन यावेळी केवळ दहा वर्षांचा होता. केवळ लहान पोर; पण त्याच्या अंगातले रक्त होतं ते एका इंग्रज सरदाराचे! एका लढावू योद्धयाचे! ह्या गोरील्याने त्याच्यावर हल्ला केला. दोघे एकमेकांना भिडले पण त्या लहान टारझनचे त्या अवजड गोरील्यांपुढे काय चालणार? लहान पोर तो. शेवटी त्याने आपला सुरा काढला व त्याच्या छातीत खुपसला. छातीत सुरा खुपसला म्हणजे प्राणी मरतो हे त्याला ठाऊक नव्हते. केवळ जीव वाचविण्याच्या भरात त्याने तो

सुरा मारला. पण त्याने तो गोरीला मेला. हा एक अपघात! पण या अपघाताने टारझनला शिकविले. छातीत वार बसल्याने प्राणी मरतो!

गोरीला ( बोलगानी ) मेला पण त्या झगड्यात टारझनच्या अंगावर अनेक जखमा झाल्या होत्या. दोनतीन फासळ्या तुटल्या होत्या. मानेच्या मासाचा लचका निघाला होता. त्यामुळे तो गोरील्या शेजारीच गवतावर बेशुद्ध होऊन पडला.

गोरीला व टारझन यांचा झगडा चालू असता, गोरील्याच्या आरोळ्या दूरवर करचाकच्या वस्तीपर्यंत पोहोचल्या होत्या. त्या करचाकने ऐकल्या होत्या. कोणीतरी आपल्यापैकी संकटांत आहे हे त्याला कळले. त्याने आपली सर्व प्रजा एकत्र केली. तेव्हा त्याला कळले की त्यात टारझन नाही. ते कळताच करचाक त्याला मदत करायला निघाला. पण टुबलाटला ते नको होते. आपला वैरी आपोआप मरतोय तर का सोडा!

' त्याला शोधायला जाण्याची आपणाला गरज नाही. ' टुबलाट म्हणाला. करचाकचे तरी टारझनवर कुठे प्रेम होते. तेव्हा करचाकने टुबलाटचा उपदेश मानला. पण कालाला त्या मातेला–ते कसे पटणार! त्या परक्या पोरावर तिने आईच्या भावनेने प्रेम केले होते.

टारझन-तिचा लाडका-संकटांत आहे हे कळताच काला कशी स्वस्थ बसणार? ती अक्षरशः धावत धावत निघाली व टारझन होता तिथे आली. तिथे टारझन व तो गोरीला पडले होते. टारझन रक्त-बंबाळ झाला होता. आणि ते पाहून काला हळहळली. चंद्र आता बराच वर आला होता. टारझन शुद्धीवर येत नव्हता. तेव्हा तिने त्याला उचललं व आपल्या खांद्यावरून वाहून करचाक वस्तीत आणले.

अनेक दिवस टारझन आजारी होता. माशासारखा तळमळत होता. खाणंपिणं तर नाहीच. अंगांत ताप फार असायचा. तो पाणी पाणी

करायची मग काला त्याला आपल्या तोंडांतून पाणी आणून पाजायची. रात्रंदिवस त्याच्याजवळ बसून रहायची. फक्त टारझनच्या जखमा चाटायची. त्याच्या अंगावर बसणाऱ्या माशा उडवायची व त्याला पाणी पाजायची. पशु ती ! ती आणखी काय करणार ? पण निसर्ग ! त्याची करणी अगाध असते. त्या चाटण्यानेंच जखमा स्वच्छ होऊन भरून आल्या. टारझनला बरे वाटू लागले. पण त्याला फार अशक्तपणा आला होता. आता फक्त कालाला एकच काम होते, त्याच्याजवळ बसून रहायचे. रात्रीं त्याला कुशीत घेऊन झोपायचे ! एखादी अक्कलवान् मानवी आई करणार नाही इतके तिने टारझनसाठी केले. त्या दुखण्यातून बरे व्हायला टारझनला दोन महिने लागले.

# स हा

हे दोन महिने टारझनने केवळ झाडाच्या मुळाशी कालाच्य सहवासात काढले होते. तो हिंडू फिरू लागल्यावर स्वत:चे भक्ष्य तो स्वत: शोधून खाऊ लागला. त्यामुळे त्याला भराभर शक्ति येऊ लागली. फासाची दोरी कुठे होती तिचा त्याने ताबा घेतला. आणि पुन्हा तो केबिनच्या जवळ आला. तिथे येताच त्याला तिथे गोरिल्याची हाडे आढळली. ती दिसताच त्याने ती फेकून दिली. नंतर पानात शोधता शोधता त्याला त्याचा सुरा सापडला तेव्हा त्याला फार आनंद झाला. याच सुऱ्यामुळे आता तो मी मी म्हणाऱ्या शत्रुंबरोबर दोन हात करणार होता.

पण तो सुरा आता गंजला होता. त्याच्यावर रक्ताचे डाग होते. तो आतां कसा स्वच्छ होणार हे त्याला कळत नव्हते. तरी देखील तो प्राणरक्षक सुरा घेऊन तो निघाला.

थोड्याच वेळाने तो केबिनजवळ आला. केबिनजवळ येताच त्याने प्रथम ते दार उघडले आणि त्या कुलुपाची काय किमया आहे हे तो तपासून पाहू लागला. बाहेरून दार बंद होते याची त्याला जाणीव होती. पण आंतून ! पण आज ते आतून बंद झाले आणि आता त्याला त्या केबिनमध्ये निर्वेधपणे बसता येणार होते. आपला उद्योग करता येणार होता.

त्याने कपाट उघडले व त्यांतील प्रायमर काढले. तो पुन्हा ती चित्रं, ते जंतु पाहू लागला. पाहता पाहता त्याला एक चित्र आढळले. ते चित्र त्याच्यासारखेच होते. त्याच्या अंगात बंडी होती. खाली चड्डी होती. फक्त अर्धवट हातपाय उघडे होते आणि त्या चित्राखाली लिहिले होते. 'BOY!'

पण या बॉयचा अर्थ त्याला फार प्रयत्नांति कळला. आणि त्याला नंतर हेहि कळले की बॉय म्हणजे तो स्वतः म्हणजे कोण हे कोडे राहिलेच! नंतर ते प्रायमर पहाता पाहता त्याला कळले, काही जंतु जमावाने–एकमेकांना धरून रहातात काही एकटेच असतात. तो वाची. अर्थात. मनातच. पण मग त्याला कळले की हा BOY पुष्कळ वाक्यांत येतो. त्याच्यामागे एकच जंतु असतो. पण असे का हे त्याला कळेना. मग स्वतःच्या स्वतःच तो काही शब्द प्रायमरच्या साहय्याने शिकला; पण त्यांचे रहस्य त्याला कळले नाही.

स्वतःच हे सारे शोधून काढायचे म्हणजे फार श्रमाचे काम होते; पण न कंटाळता, न आळसता, टारझन हे सारे करीत होता. गेली दोन वर्षे करीत होता.

आता तो बारा वर्षांचा झाला होता. एक दिवस टेबलाखाली त्याला एक शिशाच्या पेन्सिलीचे बॉक्स सापडले. ते काय हे त्याला कळेना. पण त्याने एका पेनसिलीच्या टोकाने कागदावर खरचटले आणि एक काळी काळी रेघ कागदावर उमटली. मग त्याने अनेक रेघोट्या मारून पाहिल्या. याच पेनसिलीच्या सहाय्यानें तो लिहावयास शिकला.

मग त्याला ते जंतू गिरवण्याचा चाळाच लागला आणि एक दिवस त्याने लिहिले. A BOY AND A DOG. आता तो पुढील शब्द शिकला.

M-A-N, M-O-N-K-E-Y, LIONESS, SNAKE ELEPHANT.

अशा रीतीने तीन वर्षात तो ते प्रायमर शिकला आणि नंतर त्याला कळले की तो M-A-N मॅन आहे.

आता आपल्या अंगावर केस नाहीत, आपलं नाक सरळ आहे, आपले दात नाजूक आहेत याची त्याला लाज वाटेनाशी झाली. उलट त्याला आनंद वाटू लागला की त्या APE हून तो वेगळा आहे. त्यांच्यांतील तो नव्हेच.

तो आतां टुबलाटला भीत नसे. करचाक पण त्यापासून दूर राही. त्यामुळे तो स्वतंत्र झाला होता. इतर वानर त्याला भीत. काही त्याची परवा करीत नसत. पण काही वृद्ध त्याचा द्वेष करीत असत.

या वानरांत एक डम-डम नावाचा नाच होत असे. अगदी पुरातन असा हा नाच होता. या नाचाबरोबरच काही धार्मिक विधी होत. आणि असा अंदाज बांधता येईल की रोमन कॅथलिक चर्च किंवा पाश्चात्यांच्या काहीं धार्मिक गोष्टी यातूनच ते निर्माण झाला असावेत. हा नाचाला त्या करचाक वस्तीमध्ये काही वैशिष्ट्य होते. कुणी काही विजय मिळविला, शत्रुपैकी कुणी एखादा प्राणी मारून आणला, कुणाचे राज्यारोहण झाले किंवा कोणाचा मृत्यु झाला म्हणजे हा नाच होत असे.

हा नाच करण्याची त्यांची एक वेगळीच जागा होती. ती जागा टेकड्यांच्या मध्यावर गोलाकार सपाट अशी होती. सभोवती झाडांचे जणू कुंपण होते. आणि चंद्रप्रकाशांत ते हा नाच करीत. आज त्यांनी एक शत्रुपक्षाकडला योद्धा मारला होता. दोघा मोठ्या वानरांनी त्याचे प्रेत आणून त्या मातीच्या ढोला शेजारी ठेवले होते. त्या ढोलाच्या ठेक्यावरच त्यांचे नाच होत.

चंद्रोदयाबरोबर हा नाच सुरू होणार होता म्हणून सारे वानर व वानरिणी झाडाच्या सावलीत, अंधारात अगदी चूपचाप बसले होते.

चंद्र मध्यावर आल्याशिवाय नाच सुरू होणार नव्हता. ते एक त्यांचे वैशिष्ट्य होते. नाच करायचा तो चंद्रप्रकाशात.

शेवटी चंद्र उगवला. सर्व अरण्य चंद्राच्या तेजस्वी प्रकाशाने भरून गेले आणि ढोलावर टिपरी पडली. त्या तीन वृद्ध स्त्रिया हळु म्हणता म्हणता जोरजोराने ढोल वाजवू लागल्या. सर्वांनी फेर धरला. प्रथम स्त्रिया व मुले, नंतर तरुण, नंतर सारे वृद्ध अशा तऱ्हेने नाचाला सुरवात झाली. आणि ढोलाच्या टिपरीच्या तालावर सर्वजण नाचू लागले आणि किंचाळू (गाऊ) लागले.

त्यांच्या गाण्यानाचण्याने सारे अरण्य एका भयानक वातावरणाने भरून गेले होते. लहान लहान प्राण्यांची पळापळ सुरू झाली होती. वाघासिंहासारखे; अस्वल हत्तीसारखे प्राणी भांबावले होते आणि मिळेल त्या आश्रयाला दडून बसू लागले होते. ते काय गाणे होते? अनेक आकाळ विकाळ माणसाचा—वानरांचा तो जणू मृत्यूचा नाच होता. आणि खरोखरच तो मृत्यूच्या परिसरांत चाललेला एक भयानक नाच होता. आता नरांच्या आरोळयात माद्यांच्या आरोळयाची भर पडली. अर्ध्या तासानें हा नाच थांबला आणि करचाक त्यांचा राजा—त्याने जमावाच्या मध्यावर भयंकर आरोळी मारीत उडी घेतली. तिकडे जवळच ठेवलेला एक क्लाब घेतला आणि ढोळाजवळ पडलेल्या प्रेतावर दोन तीन आघात केले. किती हिडिस दिसत होता तो त्यावेळी ! सूड आणि भयंकरपणा त्याच्या डोळयात, आवाजात, हाल-चालीत भरला. स्त्रिया व मुले भयाने चळचळा कापत होती.

नंतर त्याचेच अनुकरण सर्व वानर करू लागले. प्रेताजवळ उडी घ्यायची. आरोळी मारायची. क्लावने त्या प्रेतावर आघात करायचे आणि परत जायचे या सर्व आघातांनी ते प्रेत अगदी छिन्नविछिन्न झाले होते. वैऱ्याला मरण म्हणजे आनंदाचा उत्सव !

अर्धा तास हा भयानक प्रकार चालला होता. नंतर दोन क्षण ते स्वस्थ राहिले आणि नंतर अगदी भयंकर प्रकाराला सुरुवात झाली. सर्वांच्या आधी एक भयंकर किंकाळी मारीत करचाक पुढे आला आणि आपल्या तीक्ष्ण सुळ्यांनी त्या प्रेताच्या मांसाचा त्याने लचका तोडला. राजाचा मोठ्यांतला मोठा वाटा. मग एकामागून एक अनेकांची टोळधाड त्या प्रेतावर पडली. प्रत्येक जण येई, एक मोठा मिळेल तसा तुकडा घेई आणि खाण्याकरिता दूर जाई. टुबलाट आता पुन्हां दुसरा तुकडा घेण्याकरितां आला. त्याचवेळीं टारझन आपला भाग घेण्याकरिता आला. करचाकहि होताच. करचाकच्या हाताखालून त्या प्रेताचा हात लोंबकळत होता. टारझनने तो आपल्या सुऱ्याने कापून घेतला. टुबलाटचा त्या हातावर डोळा होता. टारझनने तो हात घेतांच टुबलाट त्याच्या मागे लागला. तोच टारझनने एका झाडावर उडी घेतली. टुबलाट पण त्या झाडावर चढला. टारझन अगदी झाडाच्या टोकाला गेला व तिथे ते मांस खात खात टुबलाटला चिडवू लागला. सुक्या काटक्या फांद्या त्याच्यावर मारू लागला. ते पाहून काला तिथे आली. तिच्या अंगावर तो उलटला. त्याच्या डोळ्यांत सुडाचे थैमान चालले होते. टारझनला वाटले आता तो तिच्यावर हल्ला करणार! तेव्हा टारझन त्या दोघांच्या मध्ये पडला; पण मग टुबलाट दुसरीकडे वळला. त्याने दोन तीन स्त्रियांचे लचके तोडले. चार पांच पोरे आपटून मारली. आतां मात्र टारझनला वाटले हे फार झाले. त्याला त्याचा संताप आवरेनासा झाला. आणि त्याने टुबलाटवर हल्ला चढवला. बराच वेळ त्यांची झोंबी झाली. मग टारझनने आपला सुरा काढला आणि त्याचा छातीत खुपसला. एकदा! दोनदा!! तीनदा!!! आणि टुबलाट जमिनीवर कोसळला. टारझनचा मोठा शत्रु नाहीसा झाला.

त्याच्या प्रेतावर पाय देऊन, चंद्राकडे तोंड करून, मागे मान झुक-

वून टारझनने एक आरोळी मारली आणि इतर वानरांकडे पाहून तो म्हणाला, ' मी टारझन आहे. मोठा बलवान् आहे, हे जाणून सर्वांनी वागावे. '

वानरांच्या नियमाप्रमाणें कोणीच टारझनचा प्रतिकार केला नाही, की त्याला प्रत्युतर दिले नाही. कोणी कुणाचा सूड घेणे हा ज्याचा त्याचा अधिकार होता. नंतर टुबलाटचे प्रेत तिथेच टाकून ते सारे निघून गेले. कारण आपल्या जातभाईचे मांस ते खात नसत.

●●●

संग्रहालय
अनुक्रम ३८३१९
विभाग
क्रमांक
नों. दि. २८.५.६१

# सा त

**डमडम** नाचाच्या दुसऱ्या दिवशीं टारझनचे सारे जातभाई समुद्र किनाऱ्यावर जावयास निघाले. कारण आता त्यांना त्याठिकाणी विपुल खाद्य मिळणार होते. अनेक लहान लहान प्राणी, अनेक जातीची द्राक्षे, सफरचंदासारखी फळे अनेक जातीच्या माशा ! त्यामुळे ते येथे आले होते. त्यांच्यावरोवर टारझनहि आला होता. सारे इकडेतिकडे समुद्र किनारी गेले होते. टारझन एका झाडावर एकटाच बसला होता. इतक्यांत जवळच्या झाडीतून एक सिंहिण बाहेर आली. तिचे लक्ष काही टारझनकडे नव्हते; पण टारझननेच तिची खोडी काढली. आपले तांबुस डोळे रोखून तिने त्याच्याकडे पाहिले. टारझन पण तिच्याकडे दृष्टि रोखून पाहू लागला. मग तो तिच्या अंगावर झाडाच्या काटक्या, सुक्या फांद्या फेकू लागला. ती गुरगुरत शेपटी आपटू लागली. मग दोघांनी एक पवित्रा घेतला. दोघे एकमेकाकडे दृष्टि रोखून पहात असता सिंहिण आल्या मार्गानें झाडींत परत गेली.

पुस्तकांतील चित्र पाहिल्यापासून टारझनला वाटले आपण पण अंगावर कपडा घालावा. आपण मानव मॅन MAN या जातीचे आहो. आपण काही पशु नाही. कपडे घालणाऱ्या प्राण्यांपैकी आहोत. तेव्हा

आपणाला कपडा हवाच. कपड्यामुळे आपण या पशुपेक्षा उच्च दर्जाचे ठरूं. पण तो मिळवावा कसा?

मग त्याला आठवण झाली की काळे वीर झाडांच्या सालीची व कातड्यांची वस्त्रे करतात; पण आपणाला ती कुठे करता येतात? पण कातड्याचा उपयोग आपणाला करता येईल आणि हे कातडे मोठे म्हणजे वाघाचे किंवा सिंहाचे हवे. आणि मग त्याला वाटले आपण त्या सिंहिणीला उगीच जाऊ दिली.

बरेच महिने टारझन आणि त्याचे जातभाई त्या समुद्र किनाऱ्यावरील भागात वस्ती करून होते. एक दिवस टारझन आपली दोरी लोंबकळत ठेवून एका झाडाच्या फांदीवर पडला होता. अस्वल (होर्टा) झाडाखालून जात असता त्याच्या गळ्याला त्या दोरीचा फास बसला आणि टारझन खाली कोसळला. वानराच्या चपळाईने तो उठून उभा राहिला म्हणून बरे, नाहीतर त्या अस्वलाने त्याच्यावर झडप घातली असती. जीवाशी गांठ आहे असे पाहताच टारझनने झाडाच्या एका खालच्या फांदीवर उडी घेतली आणि त्याचा जीव वाचला.

त्या दिवशी टारझन दोन गोष्टी शिकला. दोरीचा वापर सावधपणाने केला पाहिजे. आज जर अस्वलाने हिसका दिला असता व आपण पडलो असतो तर आपली धडगत नव्हती. तेव्हा जी दोरी पाहिजे ती बळकट पाहिजे व ती काळजीपूर्वक वापरली पाहिजे.

आणखी दोन आठवडे गेले. सर्व ठिकाणीं शांतता होती. सर्व वानर आपापले भक्ष्य मिळवून आनंदाने खात होते. अगदी आबादी आबाद होती. आणि एक दिवस त्या अरण्यांत समुद्रकिनाऱ्यावर अशी काही शांतता पसरली की कोणास या शांततेचा अर्थच कळेना. एक प्रकारच्या विव्हळण्याचा आवाज मात्र मध्येच ऐकूं येई. वारा बंद झाला. झाडे हालचाल करीत नव्हती. शांतता, शांतता, भयानक शांतता! या

शांत पण भयानक वातावरणाची जाणीव पशुपक्षांना पण झाली होती. प्रत्येकजण आपापल्या ठिकाणी दबून राहिला होता. इतक्यात आकाशांत काळे ढग जमू लागले. वारा वाहूं लागला. विजा कडकडू लागल्या आणि वाऱ्याच्या झोताने झाडे आपले शेंडे जमिनीवर जणू टेकू लागली. असा हा निसर्ग चमत्कार काही वेळ झाला. आणि मग आपली माथी उंचावून झाडे वाऱ्याबरोबर स्पर्धा करू लागली.

काळाकुट्ट अंधार, वारा, पाऊस, विजांचा कडकडाट आणि झाडांचे पडणे ! सारे पशुपक्षी हवालदिल झाले. आश्रय मिळेल तिथे दडू लागले. तीच अवस्था टारझनच्या जातभाईंची झाली. मोठ्या संकटाने ते आपापला जीव वाचवीत होते. तोच सकाळ झाली. आकाश निरभ्र झाले. पाने फुले हसू खेळू लागली. पशुपक्षाचे संचार सुरू झाले. सारे शांत पण सौम्य वाटू लागले.

टारझनने आपले दोरी विणण्याचे काम सुरू केले. ही दोरी विणायला त्याला बरेच दिवस लागले. कारण त्याला आता एक मजबूत दोरी हवी होती. आणि दुसरी गोष्ट अशी, की जी तो अनुभवाने शिकला– ती म्हणजे ती दोरी वापरण्यास चातुर्य हवे आणि ते एक शस्त्र असले तरी त्याचे सामर्थ्य पण मर्यादित आहे.

शेवटी एक दिवस त्याला पाहिजे होती ती वेळ आली. झाडाच्या मागच्या जाळीतून एक सिंहीण बाहेर आली. ज्या झाडावर टारझन बसला होता त्या झाडाखाली ती आली. टारझन अगदीं हालचाल न करता त्या झाडावर ब्रॉंझच्या पुतळ्याप्रमाणे बसला होता. त्याचे दोरीचे बंडल त्याच्या हाताशीच होते आणि ती सिंहीण झाडाखाली फेऱ्या घालीत होती.

इतक्यांत संधि साधून टारझनने दोरीचा फास तिच्या गळ्यात अडकावला व दोरीचे एक टोक त्याने एका जाड अशा फांदीला बांधले.

गळ्याला फांस बसताच ती तो फास झुगारून देण्याचा प्रयत्न करू लागली पण फास अधिक घट्ट होऊं लागला. अंगाभोवती एक वेढा बसला. टारझनला वाटले तिला वर ओढून घ्यावी; पण टारझन कितीहि बलवान् असला तरी ते त्याला शक्य नव्हते. टारझन वरच बसला. होता आणि सिंहिणीने दोरीला ताण देताच तो खाली पडला. सिंहिणीचे एक दोन पंजे त्याच्या अंगावर पडलेच. एक दोन मोठ्या जखमा झाल्या. तो परत झाडावर चढला.

सिंहिण खाली फिरतच होती. इतक्यात तिच्या लक्षात आले की ती दोरी आपणाला आपल्या तीक्ष्ण दातांनी तोडता येईल आणि तिने तसा प्रयत्न करताच तो फास तुटला आणि ती मोकळी झाली पण कित्येक तास टारझनकडे पहात त्या झाडाखाली फिरत राहिली.

आता टारझन पण कंटाळला. झाडावरून उड्या घेत घेत तो आपल्या वस्तीत आला. आणि आपल्या पराक्रमाचे, आपण केलेल्या गंमतीचे वर्णन करून सांगू लागला. आता त्याला बरेच मित्र व फार थोडे शत्रु होते. त्याचे मित्र त्याच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकून हंसत होते आणि काला– त्याची आई– आनंदाने बेहोप होऊन नाचत बागडत होती आणि करचाक–त्यांचा राजा–रागाने पहात होता.

●●●

# आठ

**जंगलांत** राहून टारझनला आता बरीच वर्षे झाली होती. त्याचे बल व त्याचा आकार वाढला होता. अनेक प्रकारची शिकार तो करीत असे. जेव्हा अनेक हिंस्र पशूंचे हल्ले त्याच्यावर होत तेव्हा त्याला भीतीपेक्षा गंमतच अधिक वाटत असे. हिंस्र पशूंच्या अनेक संवयींचा त्याने अभ्यास केला होता. त्याचा मेंदु माणसाचा आणि त्यातल्या त्यात एका अत्यंत हुषार इंग्रज सरदाराचा होता. जे काही तो पहात असे त्याबद्दल तो अनेक तास विचारात घालवी. त्यावरून अनेक ठोकताळे बसवी.

असा त्याचा जीवनाचा अभ्यास चालला असता एकदा त्याची व एका हत्तीची (टॅनटोरची) मैत्री जमली. पण मैत्री कशी जमली हे कोणालाच माहित नव्हते. मात्र कित्येकांनी त्याला रात्री त्या हत्तीबरोबर फिरताना—त्याच्या पाठीवर बसून फिरताना पाहिलं होतं.

अलिकडे त्याला दुसरा मासे पकडण्याचा नाद लागला होता. किंवा नदीत मासे पकडणे हा त्याचा मोठा आवडीचा खेळ होता. आणि त्याची ती केबिन! तिथे तर तो तासन्तास जाऊन बसे आणि पुस्तके वाची. पुस्तके वाचण्यात आणि लिहिण्यात तो बराच तरबेज झाला होता. त्याने बरेच केले होते. त्यामुळे त्याला त्याच्या जगाची

त्याचे जे कोणी वडील होते त्यांच्या जगाची-बरीच माहिती झाली होती. तो आफ्रिकन जंगली वानर राहिला नव्हता.

एक दिवस तो असाच आपल्या केबिनमध्ये वाचीत बसला होता आणि तिकडे पूर्वेच्या बाजूने एक माणसांची टोळी आली. त्याच्या तीन बाजूंच्या टेकड्यावरून आणि चौथ्या बाजूने समुद्राने वेढलेल्या बंदीस्त प्रदेशांत कोण येणार होते? पण ती टोळी आली खरी.

रबर व हस्तिदंताचा व्यापार करणारे गोरे व्यापारी हा हस्तिदंत किंवा रबर मिळविताना बरेच अत्याचार करीत. बंदुका त्यांच्या हातीं होत्या. त्यांच्या काळ्या नोकरांजवळ धनुष्यबाण होते आणि याच्या जोडीला गोऱ्या व्यापाऱ्यांना गोऱ्या सैनिकाचे साहाय्य होते. त्यांच्या साहाय्याने जंगली टोळ्यापासून जुलमाने रबर व हस्तिदंत मिळवीत. या साऱ्या अत्याचाराला कंटाळून ती शंभर दोनशे माणसांची टोळी या टारझनच्या प्रदेशात आली होती.

त्यांच्यात शंभर काळ्या लाकडी वर्णाचे वीर होते. त्या प्रत्येकाजवळ धनुष्यबाण भाला व ढाल होती. पाठीवर विषारी टोकाच्या बाणांचा भाता होता. छातीवर व कपाळावर पांढऱ्या लाल रंगाचे पट्टे व वर्तुळे होती. डोक्यावर पिसांची टोपी होती. बायकांच्या डोक्यावर भांडी वगैरे संसारोपयोगी सामान होते. त्या प्रदेशात वाघसिंहादि हिंस्रपशु व सर्प व अजगर असल्यामुळे त्यांचा प्रवास फार हळुहळु चालला होता.

शेवटी एका बाजूला त्यांना वस्ती करण्यासारखी जागा सांपडली. त्यांनी जागा सपाट केली. झोपड्या बांधल्या व झोपड्यांभोवती भिंत बांधली. मका पेरला. भाज्या लावल्या. द्राक्षाच्या वेली लावल्या व एका महिन्यांत सुंदर खेडं सजवलं. खेड्याच्या बाजूने एक नदी वाहत होती म्हणून पाण्याचा प्रश्नच नव्हता.

एकदा त्या टोळीचा प्रमुख जो मोंगा त्याचा मुलगा कुलोंगा एक-



त्याने जोराने भाला फेकला तो तिच्या कुशीला जखम करून गेला.

टाच शिकारीला निघाला. त्या रानांत एकट्या दुकट्याने शिकारीला जाणं हे धोक्याचं होतं; पण हा अविचारी तरुण एकटाच निघाला व दुपारपर्यंत तो करचाकच्या वस्तीपर्यंत आला.

त्या दिवशीं काला, टारझनची आई एकटीच आपले भक्ष्य शोधण्यास निघाली होती. भक्ष्य शोधण्याच्या नादांत वस्तीपासून आपण किती दूर गेलो हे तिला समजले नाही आणि कुलोंगाने तिला पाहिलं. मांसाळ, लठ्ठ वानरी त्याच्या तोंडाला पाणी सुटलं.

कालाने पण त्याला पाहिलं. या वानरांची एक पद्धत असते. कलह, प्राणहानी जितकी टाळतां येईल तितकी टाळावी. त्याप्रमाणे काला मागे वळून जाऊ लागली पण कुलोंगा काय तिला जाऊं देणार? याने जोराने भाला फेकला तो तिच्या कुशीला जखम करून गेला.

काला आता संतापली व तिने प्रतिहल्ला केला आणि ती त्याच्या अंगावर धावली. धावता धावता आपल्या जातभाईंना सूचना देण्याकरिता तिने मोठ्याने आरोळी ठोकली सर्व वानर धावून आले पण कुलोंगाने तो विषारी बाण झटपट तिच्यावर सोडला. तो तिच्या छातींत लागला व ती जमिनीवर कोसळली व पाच मिनिटात मेली.

चिडलेले वानर धावून येण्यापूर्वीच काला मरून पडली होती. सूड घेण्याकरिता ते त्याच्या मागे धावले; पण तो हरणाच्या गतीने पळून गेला. आणि मग निरुपाय म्हणून ते परतले आणि कालाच्या प्रेताजवळ जमले.

यावेळी टारझन आपल्या केबिनमध्ये होता. त्याने ती आरोळी ऐकली आणि आपल्यापैकी कुणाचा तरी जीव धोक्यात आहे अस समजून तो धावतच निघाला. आणि काय आढळले त्याला? त्याची प्राणप्रिय आई मरून पडली होती.

इतर वानरांनी त्याला सर्व हकिकत सांगितली. संतापाने तो थरथरू लागला पण त्यानं सध्या मन आवरलं आणि कालाच्या प्रेतावर पडून तो ओक्साबोक्सी रडू लागला. अनेक वेळा त्याने ते प्रेत कवटाळलं. तो याच्या प्रेमाचा, आश्रयाचा एकमेव आधार होता. त्याच्या खऱ्या आईवर लेडी ॲलीसवर जितकं प्रेम त्याने केलं असतं तितकं त्याने या कालावर, या विद्रुप वानरीवर केलं होतं. त्याच्या दृष्टीने ती फार सुंदर होती.

नंतर धावत पळत तो कुलोंगाचा पाठलाग करू लागला. वेळ झाला होता; पण त्याला सोडायचं नाही. असे त्याने ठरवले होते. झाडावरून झेपा घेत किंवा सरळ रस्त्याने चालत तो वायुवेगाने चालला होता आणि इतक्यात एका मैलाच्या अंतरावर त्याला कुलोंगा दिसला.

यावेळी कुलोंगावर एक भयंकर रानडुक्कर हल्ला करीत होता आणि कुलोंगाने धनुष्याला बाण लावला होता.

आणि त्याच वेळीं टारझननं ओळखलं की कालाला मारणारा हाच तरुण वीर असावा. आता रागापेक्षा आश्चर्याने त्याच्या मनाची पकड घेतली. दिसायला तो त्याच्यासारखाच होता. त्याचे नाक, डोळे टारझन इतकेच सुंदर होते. तो निग्रो नव्हता; कारण निग्रोचे चित्र, त्याने पाहिले होते. तो मॅन MAN होता आणि त्याने चित्रात जो धनुर्धारी (Archer) पाहिला होता त्याप्रमाणेच तो होता.

A stands for Archer ए हे अक्षर आरचरकरिता आहे.

आणि मग त्याला आठवलं की हाच कालाची हत्या करणारा. त्याचा संताप उसळून आला पण त्याने धीर धरला; कारण तो काळा वीर एका रानडुकरावर बाण सोडण्यास तयार झाला होता. त्याने रानडुकरावर बाण सोडला त्या वेळचं त्या वीराचं कौशल्य टारझनने टिपून ठेवलं. एका बाणात तो डुक्कर चित होत नाही पण उलट हल्ला करतो आहे हे

पाहून त्या काळ्या वीराने त्याच्या डोक्यावरून उडी घेऊन अत्यंत चपळाईने दुसरा बाण रानडुकरावर टाकला. किती चपळाईने ! शेवटी तो रानडुक्कर मेला.

कुलोंगा—तो काळावीर त्याने डुकराला मारताच त्याच्या शरीराचा उत्तमपैकी भाग कापून घेतला आणि विस्तव पेटवून त्याने त्या विस्तवावर ते मांस भाजले आणि मोठ्या चवीने ते खाल्ले.

पण टारझनला वाटले हा काय वेडेपणा ? चांगले मांस असे त्या घाणेरड्या विस्तवात घालून, नासून खायचे ? त्याच्या मताप्रमाणे विस्तव म्हणजे आरा (ARA) आकाशांत दिसणारा विस्तव ! आणि तो विस्तव विझतांच जमिनीवर अगदी गुळगुळीत पांढरी पावडर उरली होती. लाकडाची पावडर झाली होती. किती विलक्षण ! ह्या गोष्टीचे पण टारझनला नवल वाटले.

भरपूर खाणे होताच त्या काळ्या वीराने एका झाडाच्या सावलीत जाऊन अंग टाकले. खाण्याने त्याला सुस्ती आली होती.

कुलोंगाला झोप लागताच टारझन झाडावरून खाली उतरला. त्या रानडुकराचे मांस त्याने यथेच्छ खाल्ले, उरलेले एका झाडाच्या ढोलीत लपवून ठेवले. रक्ताची बोटे मांडीला पुसली व झाडावर चढून तो काळा वीर कधी जागा होतो याची वाट पहात बसला.

दोन तास झोप होताच काळा वीर जागा झाला आणि दचकला. त्याचा धनुष्यबाण जागेवर नव्हता. तो कोणी नेला हे कळत नव्हते. त्याची घाबरगुंडी उडाली; कारण तो आता निःशस्त्र होता आणि हिंस्त्र पशूंनी भरलेले ते रान. मग ! त्याने बेत केला. आता धावत जाऊन आपले खेडे गाठले पाहिजे.

आणि तो धावत पळत निघाला. टारझनने झाडांच्या फांद्यातून

त्याचा पाठलाग सुरू केला. त्याला त्या काळया वीराचे राहण्याचे ठिकाण पहावयाचे होते.

संध्याकाळचा सुमार झाला. खेडे दुरून दिसू लागले. तेव्हा टारझनने विचार केला, आता थांबण्यात अर्थ नाही. आणि झाडावर लपून त्याने आपल्या दोरीचा फांस कुलोंगावर टाकला. आणि दोरी खेचून त्याला वर ओढून घेतले. कमरेचा सुरा काढला आणि त्याच्या छातीत खुपसला.

अशा तऱ्हेने कालाला मारणाराचा अंत झाला. टारझनला सुडाचे समाधान लाभले आणि तो कांही गोष्टीपण शिकला.

नंतर झाडांत लपवलेले कुलोंगाचे धनुष्यबाण घेऊन टारझन आपल्या वस्तीत गेला.

दुसऱ्या दिवशी तो उठला तेव्हा त्याला इच्छा झाली की त्या काळया वीराचे वसतीस्थान पहावे. ते काय करतात? कसे वागतात हे त्याला पहावयाचे होते. ते त्याच्यासारखे होते. पण मित्र की शत्रु? त्यांच्यात तो गेला तर ते कसे वागतील. त्याला आपणात घेतील की त्याला मारण्याचा प्रयत्न करतील?

●●●

वा. क्र ११३९९ नों दि ........
वि. ........ बा. बा.
अनुक्रम ३८७८६
विभाग बा. बा.
क्रमांक ३१९८
नों. दि. २०१५

न ऊ

## भयानक पिशाच्च !

**टारझन** एका मोठ्या दाट पानांच्या झाडावर चढला. या झाडावर फुलांचे अनेक गुच्छ होते. अनेक वेलींनी ते झाड वेढले होते म्हणून त्या झाडांत लपून टारझन त्या लोकांचे सारे व्यवहार पाहात होता.

कुणालाहि ठार मारण्यात टारझनला आनंद वाटे आणि तो हसत हसत जेंव्हा एखादा प्राणी मारीत असे,तेंव्हा त्याच्या त्या सुंदर चेहऱ्यावर एक मिष्किल हास्य चमकून जाई. आपले खाणे मिळविण्याकरिता तो रोजच पशुपक्षी मारीत असे; पण कधी गमतीकरिताहि मारीत असे. जंगली प्राणी गमतीकरिता इतर प्राण्यांना मारीत नाहीत; पण मनुष्य शिकार करतो. अगदी अविचाराने. हत्या करू नये इतके ज्ञान त्याला असते पण प्राणी मारणे, शिकार करणे हा त्याचा जन्मजात गुण आहे.

बायका स्वयंपाक करीत होत्या. मुले सांभाळीत होत्या. भांडी स्वच्छ करीत होत्या. शेतीची, भाजीच्या मळ्यातली कामे पण करीत होत्या. पण पुरुषांचे एकच काम. ते म्हणजे वसाहतीचे संरक्षण करायचे आणि उरल्या वेळात चकाट्या पिटायच्या.

टारझनने सर्व वसाहतीवर आपली नजर फिरवीली. त्याच्यापासून

जवळच एक वृद्धा बरेचसे बाण घेऊन बसली होती. आणि चुलीवरच्या भांड्यात कसला तरी तांबुस द्रव पदार्थ रटरटत होता. ती स्त्री त्यांपैकी एक एक बाण उचली, त्याचे टोक त्या भांड्यात बुडवी आणि तो बाण वाळण्याकरिता उन्हात ठेवी. हे काम ती फार काळजीपूर्वक करीत होती. आपल्या हाताला त्या द्रव पदार्थाचा स्पर्श होणार नाही अशी काळजी घेत होती. एकदा त्या द्रव पदार्थाचा थेंब तिच्या बोटावर पडला, तेव्हां किती पण ती घाबरली! ती आपला हात पाण्याच्या भांड्यात सारखा बुडवीत होती. तो जमिनीवर घासून पुसत होती. यावरून टारझनने ठरवले की हा पदार्थ प्राणघातक असावा आणि म्हणूनच एवढ्याशा ह्या काठीने मोठमोठ्या प्राण्यांचे जीव जातात तेव्हा टारझनने ठरवले की हे बाण जाताना पळवून न्यावयाचे.

इतक्यांत वेशीबाहेरच्या एका माणसाने भयाची आरोळी दिली. खेड्यातील सारे लोक-पुरुष, स्त्रिया, मुले वगैरे त्या दिशेने पाहू लागली. काही चटकन वेशीच्या बाहेर पडली आणि त्या माणसाजवळ जाऊन पहातात तर त्यांच्या राजपुत्राचे ते प्रेत! सारे हलकल्लोळ करून रडू लागले.

टारझन समजला की आपण मारलेल्या कुलोंगाकरिताच हा शोक असावा. सारे बाहेर जाताच तो एका झोपडीजवळ आला. ती झोपडी लहानच होती. आत थोडा अंधार होता. झोपडीच्या एका बाजूवर अनेक शस्त्रे टांगून ठेवली होती. त्यांत लहानमोठे भाले, दोन तीन सुरे व एक दोन ढाली टांगलेल्या होत्या. ही शस्त्रे पाहून टारझनला फार आनंद झाला. त्यातला एक भाला त्याने काढून घेतला. एका बाजूला कुलोंगाच्या वस्त्रासारख काहीतरी होते. टारझनने ते काढून ते त्या शस्त्रावर लटकावून दिले. हेतु हा की कोणीतरी येथे येऊन गेले आहे असे समजावे.

हा शोध घेण्यात किती वेळ गेला हे त्याला समजले नाही. पण शेवटी जेव्हा ते लोक जवळ आले तेव्हा टारझन भानावर आला. त्याने दारांतून डोकावून पाहिले. पण अजून ते वेशीत आले नव्हते.

आता जास्त थांबण्यात अर्थ नाही असे जाणून टारझन त्या बाणांच्या राशीजवळ आला. बगलेत नेता येतील एवढे बाण त्याने उचलले आणि तो आपल्या झाडात लपून बसला. आता ते काळे वीर वेशीजवळ आले होते. चौघांच्या खांद्यावर कुलोंगाचे प्रेत होते. ते पुढे होते. त्यांच्यामागे बायका होत्या.

नंतर त्यानी ते प्रेत ज्या झोपडीत टारझन शिरला होता त्याच झोपडीजवळ आणून ठेवले आणि आंतील प्रकार पाहून ते घाबरले. काहीतरी भुताटकी आहे हे खरं. पण काय ? हे त्याना समजेना.

अजूनपर्यंत कुलोंगाचा बाप त्यांच्यातच होता. तो मुलाकरिता शोक करीत होता आणि संतापाने थरथरत पण होता. त्यातच ही आता भर पडली.

मुलाच्या झोपडीत हा विचित्र प्रकार. त्याच्या धर्मभोळ्या समजुतीमुळे त्याला एक विलक्षण धक्का बसला. हे कसे झाले ?

आणि इतक्यात कोणीतरी सांगत आले, की विष लावून जे बाण बाजूला ठेवले होते ते नाहीसे झाले होते. काय ही भुताटकी !

काही बायांना तर वाटले की हा देवाचा कोप आहे.

आणि टारझन हे सारे त्या पर्णफुलाच्छादित झाडात बसून पहात होता. त्याला मोठी मौज वाटत होती. पण आता त्याला भूकहि फार लागली होती. तेव्हा तो झाडाझाडांतून झेपा घेत निघाला. आपला नवीन धनुष्यबाण व भाला घेऊन तो करचाकच्या वस्तीकडे गेला. आपल्या त्या सवंगड्यांत जाताच आपण मोंगाच्या वस्तीत काय काय गमती केल्या हे त्यांना सांगून तो खूप हंसला.

●●●

## ६ हा

### वानरांचा राजा

**सकाळी** टारझन उठला तो ताजातवाना होऊनच. पण उठताक्षणीच त्यानं आपला धनुष्यबाण काढला व नेमबाजीला सुरवात केली. जवळ जवळ वीस बावीस बाण धनुष्याला लावून त्याने सोडले. पण नेमलेल्या जागी एकही बाण गेला नाही. कुलोंगाने बाण कसे मारले हे त्याने बारकाईने पाहिले होते. पण त्याला आपल्या लक्ष्यावर बाण मारता येत नव्हता. ही गोष्ट इतकी कठीण असेल असे त्याला वाटले नव्हते. पण तसे झाले खरे.

मग तो कंटाळला आणि आपल्या केबिनच्या दिशेने निघाला. तो एक वाघीण आपले भक्ष्य शोधण्यास हिंडत होती. तिची व टारझनची नजरानजर झाली. दोघेहि एकमेकाकडे रोखून पहात उभी राहिली. पण तिला मारावी, तिचे मांस खावे असे आज टारझनला वाटत नव्हते.

तेव्हा त्या वाघिणीकडे विशेष लक्ष न देता तो केबिनच्या दिशेने जाऊ लागला. वाघीण पण मग दुसरीकडे गेली, आणि झाडांच्या फांद्यावरून झेपा घेत घेत टारझन केबिनकडे पोहोचला.

केबिनजवळ जाताच टारझनने केबिनचे दार उघडले व आपल्या वडिलांच्या प्रेताच्या सापळा ओलांडून तो पलिकडे गेला. कपाट उघडले

व एक पुस्तक बाहेर काढले. फार चांगल्या बांधणीचे ते सुंदर पुस्तक होते. कव्हरावरची अक्षरे सोनेरी होती. ती चकचकीत अक्षरे पाहून टारझनला फार गंमत वाटली. किती तरी वेळ तो ते पुस्तक हाताळीत राहिला. मग त्याने ते उघडले. आंत अनेक चित्रे होती; पण काही चित्रांचा त्याला उलगडा झाला नाही; एका चित्राने मात्र त्याचे मन वेधून घेतले. ते चित्र एका सुंदर खेड्याचे होते. त्यांत सुंदर सुंदर घरे होती. आखीव रस्ते होते. मधून मधून फुलानी लवलेले वृक्ष होते. घरापुढे लहान लहान फुलझाडे होती. पलिकडे शेते होती, मळे होते आणि काही काही लोक—त्याच्या जातीचे लोक—इकडून तिकडे जात होते. टारझनला फार मौज वाटली पण लौकरच त्याने ते बुक मिटले व जागच्या जागी ठेवले आणि त्याचवेळी पुस्तकाच्या मागे कांहीतरी कठीण कठीण असे त्याच्या हाताला लागले. त्याने ते बाहेर काढले. ती एक सुंदर पेटी होती आणि किल्ली पेटीच्या कुलपातच होती.

टारझनने उलटसुलट किल्ली फिरवून ती पेटी उघडली. आत त्याला एक काळया कव्हराची डायरी सापडली. त्याने ती उघडून पाहिली पण त्यात काय लिहिले आहे ते त्याला कळेना. कारण ती वेगळ्याच अक्षरात लिहिली होती. टारझनने बराच प्रयत्न केला पण त्याला जमेना; मग त्याने ती तशीच पुन्हा त्या पेटीत ठेवली. त्या पेटीतच डायरी शेजारी एक सोन्याचे हिरे माणके जडवलेले पदक होते. त्या पदकाला सोन्याची साखळी होती. हिरे, मोती, माणके म्हणजे काय ? सोने म्हणजे काय ? हे टारझनला कुठे कळत होते. पण त्याने पाहिले होते की काळे लोक-मोंगा-गळयांत कसल्यातरी माळा घालतात. तसेच त्याने ते लॉकेट आपल्या गळ्यात घातले.

नंतर डायरीखाली त्याला एक फोटो सांपडला. तो फोटो एका फार सुंदर पुरुषाचा होता. त्याचा चेहरा हसनमुख होता. मनमोकळेपणाच्या

सर्व छटा त्या सुंदर चेहऱ्यावर विलसत होत्या. तो फोटो पाहून टारझनला फार आनंद झाला. कसली तरी एक आपुलकीची लहर त्याच्या अंगातून उसळून गेली आणि ती सुंदर छवी त्याच्या अंत:करणावर उमटून राहिली.

बराच वेळ त्या छवीकडे पाहून टारझनने ती जागच्याजागी ठेवली. पेटीला कुलूप लावले आणि पुस्तकांच्या रांगेच्यामागे पुन्हा त्याने ती पेटी ठेवली.

नंतर तो मोंगाच्या खेड्याच्या दिशेने निघाला. तिथून ते खेडे बरेच लांब होते. पण टारझनला जवळ काय नि लांब काय सारखेच! झाडा-झाडांतून झेपा घेत तो तिकडे पोहोचला तेव्हा संध्याकाळ झाली होती. स्वयंपाकाकरिता बायकांची गडबड उडाली होती. मुले हसत होती, रडत होती आणि पुरुष आरामात बसले होते.

आपल्या त्या नेहमीच्या झाडांत बसून टारझन ही सारी धांदल पाहात होता. आणि ती पूर्वीची म्हातारी बाणांना विष लावीत बसली होती.

त्या खेड्याकडे, त्या खेड्याच्या रचनेकडे पाहता पाहता टारझनला त्या पुस्तकात पाहिलेल्या खेड्याची आठवण झाली. ते रस्ते चांगले सरळ, तर हे वेडेवाकडे. ती घरे सुंदर, मोठी तर ह्या झोपड्या अगदी लहान व ओबडधोबड, ते स्वच्छ तर हे गलिच्छ, असा हा फरक टारझनला जाणवला आणि तो अस्वस्थ झाला.

टारझन त्यांचा तो गोंधळ पहात होता आणि ते बाण पळविण्याची संधि केव्हा मिळते हे पण पहात होता. पण ती म्हातारी काही तेथून दूर जाईना आणि इतकी माणसांची वर्दळ असताना त्याला बाण पळविता येत ना. तरी टारझनला मौज वाटेल अशा गोष्टींना तोटा नव्हता. चुलीवर भांड्यात काहीतरी शिजत होते. काही बायका

पिठाच्या भाकरी करीत होत्या. अर्थात् ते पीठ सुक्या केळ्यांचे आहे हे टारझनला माहित नव्हते. आणखीहि काही ती मुलें खात होती. ते पण भाकरीसारखे होते. पण काय ते टारझनला माहित नव्हते. तो फक्त पहात होता.

इतक्यांत कुठून तरी बरीचशी माणसे येत आहेत असे त्याला वाटले. ती कोण असावी? शत्रू की मित्र! पण ती आपलीच माणसे आहेत हे मोंगानी ओळखले आणि वेशीचे दरवाजे उघडले. शिकारी-करिता गेलेली त्यांची ती लहानशी टोळी परतली होती आणि आपल्या-बरोबर ते कुणाला तरी खेचून आणत होते. तो प्रतिकार करीत होता; पण त्याचे इतक्या सशस्त्र लोकांपुढे काय चालणार? पण माणूस हा जीवाकरिता धडपड करतोच. तशी तो करीत होता.

पण मोंगा लोक पशूपेक्षाहि क्रूर होते. त्याला खेचून आणीत असताना बायका पोरे त्याच्या अंगावर दगड व काटक्या मारीत होते. पुरुष अधून मधून त्याला भाल्याने टोचीत होते. आणि तो घायाळ होत होता. पण त्यांची ती मौज होती. टारझन संतापत होता; पण जंगलच्या कायद्याप्रमाणे त्याला संतापता येत नव्हते.

त्यापूर्वीच ती म्हातारी त्या गोंधळात सामील झाली होती. टारझनला आतां संधि मिळाली. त्याने बरेचसे बाण एकत्र केले. दोरीनें त्याचे जुडगे बांधले. आता तरी त्याने जावे की नाही? पण नाही. त्याला मौज करावीशी वाटली.

तो एका झोपडीत शिरला. कुलोंगाच्या झोपडी प्रमाणेच सर्व होते पण इथे मध्ये एक चूल होती आणि आणखी एक वस्तु होती. गंमत करण्या-करिता टारझनने ती उचलली. आणि आता तो झोपडीच्या बाहेर पडणार तोच त्याला चाहूल लागली. पलिकडून येणाऱ्या व्यक्तीची सावली दारात दिसली. आतां काय करायचे काही करता येण्या-

सारखे नव्हते म्हणून तो खोलीच्या एका कोपऱ्यात दडला आणि ती बाई काहीतरी शोधू लागली; पण तिला ते सापडेना. शेवटी तिला ते भांडे सापडले. त्या माणसाच्या मांसाचे तुकडे घेऊन त्या बायका ते शिजविण्यास फार उत्सुक झाल्या होत्या.

तिच्या मागोमाग टारझन बाहेर पडला. त्याने ते बाण गोळा केले; आणि तो झाडात लपून बसला.

हा वेळपर्यंत त्यांनी त्याला खांबाला बांधले होते. त्याच्या भोवती पुरुष व स्त्रिया नाचत होत्या. ते लोक नाचत असतानाच मध्ये एक डोक्याची कवटी येऊन पडली. ती उताणी पडली. जणू ते डोके डोळे वटारून त्यांचे ते कृत्य पहात होते. सारे लोक घाबरले मोंगाचा राजा पण घाबरला. अलिकडेच त्याचा एकुलता एक पुत्र कुलोंगा मारला गेला होता. तेव्हा त्याला वाटे देव आपणावर कोपले आहेत.

मग तो आपल्या झोपडीत गेला. इतर मोंगा वीरहि आपल्या झोपडीत गेले. टारझनने पाहिले. आता काही इथे मौज नाही तेव्हा तो पण आपल्या वसाहतीकडे निघून गेला. आणि आरामात झोपला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठला तेव्हा सूर्य नुकताच उगवला होता. खाण्याच्या शोधार्थ तो निघाला. झाडावरची फळे आणि काही लहान लहान प्राणी त्याला मिळाले. ते खाऊन तो झाडावरून खाली उतरला आणि त्याच्या जाण्याच्या मार्गातच ती सिंहीण उभी होती. तेव्हा टारझनने ठरवले, आज हिला मारायचीच !

त्याने धनुष्याला बाण लावला आणि त्या आपणावर उडी घेणाऱ्या सिंहणीवर सोडला. तिच्या कंबरेत तो बाण लागला व ती खाली कोसळली. तिने पण चटकन उठून तसाच टारझनवर हल्ला चढवला. त्याने पुन्हा सोडलेला बाण तिच्या कुशीत बसला. बराच वेळ तिने धडपड केली आणि पुन्हा तिने धडपडत येऊन टारझनवर हल्ला केला.

टारझनने तिसरा बाण सोडला पण यावेळी ते मोठे धूड त्याच्या अंगावर पडले. टारझन त्याखाली चेंगरला गेला पण ती सिंहीण आता मेली आहे हे त्याला समजले. त्याने तिच्या अंगाखालून हळुच आपले शरीर काढून घेतले व तिच्या अंगावर पाय ठेवून आपले विजयी आव्हान दिले. त्याच्या त्या विजयी आवाजाने सारे पशुपक्षी घाबरून पळू लागले.

दुसऱ्या दिवशी तो जागा झाला तेव्हा दुपार झाली होती. अंगाला आळोखे-पिळोखे देत तो उठला आणि काल मारलेली सिंहिण जिकडे ठेवली होती तिकडे गेला. पण तिथे राहिले होते काय ? हाडे नि कातडे. टारझन संतापला पण उपयोग काय ? पण इतक्यात बरे झाले की त्याला एक हरिण दिसले. हरणाचे मांस म्हणजे टारझनचे अत्यंत आवडते. एकाच बाणाने त्याने ते हरिण मारले. पाच-दहा पावले ते हरिण तडफडत गेले आणि जमिनीवर कोसळले. टारझनने त्याच्या मांसावर यथेच्छ फराळ केला.

हरिण खाऊन व त्या सिंहिणीचे कातडे घेऊन तो आपल्या वस्तीत गेला. त्याचे बरेच सवंगडी तिथे होते. त्याना तो म्हणाला.

'पहा ! मी मोठा शिकारी आहे. माझ्या इतका पराक्रमी नाही. मी जंगलचा राजा आहे.' सर्वांना ते पटले; पण त्याचा अनेक वर्षांचा द्वेष्टा करचाक संतापला. सर्व वानरांच्या मध्यावर उडी मारून तो म्हणाला. 'टारझन ऐक ! मी तुझ्यापेक्षां अधिक बलवान् आहे. या जंगलावर माझे स्वामित्व आहे.'

'पण तू वाघसिंहापुढून पळतोस.'

आणि ते खरे होते. टारझनखेरीज इतर मोठमोठे वानर वाघसिंहा-पुढून पळ काढीत. पण टारझन त्याना मारीत असे. पण हा करचाक टारझनपेक्षां फार धिप्पाड होता. उंचीने जास्त होता; पण भय म्हणजे

काय हे टारझनला माहित नव्हते. दोघे एकमेकांना भिडले तेव्हा टारझनचा सुरा मात्र त्याच्या कमरेला होता. धनुष्यबाण, भाला सर्व एका दूरच्या झाडावर राहिले होते.

आता त्याला एका सुऱ्याने व हातानेच लढायचे होते.

करचाकसारखी त्याची मान पकडण्याचा प्रयत्न करीत होता; पण ते त्याला जमत नव्हते. कारण टारझन फार चपळ होता.

झुंजता झुंजता टारझनने पाहिले, आपला काही याच्या दातांपुढे व नखांपुढे निभाव लागणार नाही. तेव्हा त्याने त्याच्या छातीत सुरा खुपसण्याचा प्रयत्न केला आणि सुऱ्याचा वार बसला तो छातीच्या खाली. तो सुरा पुन्हा काही त्याला त्या झटापटीत उपसून काढता येईना. तेव्हा तो हातानेच लढू लागला. पण करचाक सारखा त्याच्या मानेत आपले सुळे खुपसण्याचा प्रयत्न करीत होता. आणि नेच टारझनला त्याला करू द्यायचे नव्हते. शेवटी टारझनचे हात करचाकच्या गळ्याला भिडले. पोटातल्या जखमेमुळे तो हैराण झाला होता. आणि टारझन त्याचा गळा आवळण्याचा प्रयत्न करीत होता; पण केवढी त्याची मान !

शेवटी टारझनने त्याचा गळा दाबला व करचाक मरून जमिनीवर पडला आणि त्याच्या त्या अगडबंब शरीरावर पाय ठेवून टारझनने विजयाची आरोळी ठोकली. सर्वांची घाबरगुंडी उडाली. पशुपक्षी पळू लागले. वानर पळू लागले.

आणि याच वेळी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्येंहि लॉर्ड ग्रेस्टोक–टारझनचा काका–एका बिलावर बोलत होता. त्याचा आवाज किती गोड आणि मृदु होता.

टारझन आता त्या वानरांचा खराखुरा राजा झाला.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# अकरा

## माणसाची सारासार विचारशक्ति

टारझन, यंग लार्ड ग्रेस्टोक–पार्लमेंटात आपल्या देशाच्या राजकारणात भाग घेण्याऐवजी रानांतील वानराचा राजा झाला पण त्याला एक स्पर्धक होताच आणि तो म्हणजे टरकॉझ. त्याच्या सावत्र बापाचा मुलगा. त्याला राजा व्हायचे होते. पण ते कसे शक्य होते? तो शरीराने अवजड होता; पण टारझनचे सामर्थ्य वेगळे होते. तो बलवान् असून, कल्पक असून, त्याच्याजवळ शस्त्रे होती. तो अतिशय चपळ होता. शिवाय त्याचा तो सुरा! त्याला तर टरकॉझ फार भीत असे. अनेकांच्या छातीत त्याने तो सुरा त्याला खुपसताना पाहिले होते म्हणून टारझनचा राजेपणा त्याने शब्दाने मान्य केला. पण कृतीत? अंहं! तो त्याची अवज्ञा करी. त्याला विरोध करी. पण पुढचे पाऊल त्याला टाकता येत नसे.

टारझनचे राजेपण इतराना फार आवडत असे. त्याच्यामुळे त्याना मुबलक खाणे मिळे. ते पण अधिक श्रम न करता. अगदी अबादीआबाद होत असे.

कधी कधी तर टारझन त्याना रात्रीच्या वेळी त्या काळ्या वीरांच्या मळ्यात नेत असे. तेथे त्याना कोबी, मुळे, केळी मुबलक खावयास

मिळत. पण टारझन त्याना त्या वस्तूचा नाश करू देत नसे. 'खायचे तेवढे खा, बाकीचे राखून ठेवा.' ही बुद्धी मानवाशिवाय कोणाची असणार !

माकडाची बुद्धी म्हणजे खा, पी, नाश कर. सारे उध्वस्त कर.

पण या लुटारूपणामुळे त्या काळ्या लोकांना-मोंगाना फार त्रास होई. लुटारू कोण हे कळत नसे आणि त्या वाघसिंहाच्या प्रदेशांत रात्री पहारा करणे पण शक्य नव्हते. उगाच प्राणाहुती पडायची.

टारझनला मात्र हे राजेपण फार बाधक होऊ लागले. त्याचे स्वातंत्र्य जवळ जवळ नष्ट झाले. त्या वानरामध्ये नेहमी काहीना काही भांडणे होत. राजाशिवाय ती कोण सोडवणार ? त्यामुळे त्याला आपल्या केबिन-कडे पंधरा पंधरा दिवस जाता येत नसे. आणि त्याच्यासारख्या या बुद्धिवान् माणसाला, कल्पक माणसाला या भांडणतंट्याचा मोठा तिरस्कार वाटे.

एक दिवस धाका नांवाचा मोठा वानर त्याच्याकडे आला व त्याला सांगू लागला.

'मंघो-तो म्हातारा वानर ! त्याने माझी तरुण बायको पळविली आहे. ती त्याला परत द्यायला सांग.' टारझनने त्याला सांगितले.

'मंघो ! धाकाची बायको त्याला परत दे. जर ती परत जायला तयार असेल तर. नाही तर तुझी एखादी मुलगी धाकाला दे.' आणि टारझनच्या सांगण्याप्रमाणे धाकाची बायको आपल्या पतीकडे परत आली. तरुण पत्नी वृद्धाकडे कशी राहणार ?

नंतर तरुण ठाणा टारझनकडे आली. तिच्या कुशीत जखम झाली होती. कुशीतून रक्त वाहत होते. ती टारनला म्हणाली.

'पहा ! माता पति गंटो याने मला मारले. मला ही जखम केली. मला न्याय दे.'

टारझनने गंटोला बोलावले व विचारले. ' गंटो ! हे काय ?

' हे काय ? तिने माझ्याकरिता फळे आणली नाहीत. प्राणी मारून आणला नाही, आणि माझी पाठ खाजवली नाही.' गंटो रागाने म्हणाला.

' अस्सं ! ' टारझन हसून म्हणाला. मग ठाणाकडे वळून तो म्हणाला,

' ठाणा ! तुझ्या नवऱ्याचे काम तुला केले पाहिजे. '

अशा तऱ्हेने त्याने ती भांडणे मिटविली; पण या वेडेपणाचा त्याला कंटाळा आला होता.

अलिकडे बऱ्याच दिवसात तो त्या मोंगाच्या वस्तीत गेला नव्हता. त्याचे सर्व बाण संपले होते. नवे बाण पाहिजे होते. पण अलिकडे पूर्वीसारखे बाण मिळत नसत. मोंगा सावध झाले होते. आपले बाण ते झोपडीत लपवून ठेवीत होते. कधी कधी त्याला बाण मिळत; पण फारच थोडे ! त्याने त्याचे काम भागत नसे.

आता आणखी एक नवल घडत होते. मळ्यातील भाजी पण नाहीशी होत होती व बाण तर जातच होते. तेव्हा त्या मोंगाना वाटले की काहीतरी भुताटकी आहे किंवा हा देवाचा कोप आहे. तेव्हा त्यांनी ठरवले देवाला नैवद्य ठेवायचा म्हणजे देव प्रसन्न होईल किंवा भूत पिशाच्च असले तर त्याची तृप्ती होईल. आणि त्याप्रमाणे ते खाण्याचे ताट तेथे ठेवू लागले.

दुसऱ्या दिवशी टारझन आला तेव्हा ते खाण्याच्या वस्तूचे ताट पाहून त्याला नवल वाटले. ' हे काय ? याचा उपयोग काय ?'

पण अधिक विचार न करता त्याने ते खाद्यपदार्थ खाऊन टाकले. पण मांस खाणाऱ्या टारझनला कशी आवडणार ! त्या अन्नाची चव ?

पण दुसऱ्या दिवशी ते खाद्यपदार्थ देवाने म्हणा की पिशाच्चाने म्हणा खाल्लेले पाहाताच मोंगाची पाचावर धारण बसली. काय करावे हे

त्याना कळेना. आतापर्यंत देवाने किंवा पिशाच्चाने नैवेद्य खाल्लेला त्यानी ऐकला की पाहिला नव्हता.

तेव्हा सर्वांनी मिळून ठरवले. 'आता ही खेड्याची जागा बदलली पाहिजे.' नवे खेडे वसवले पाहिजे आणि त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

एक दिवस रात्री टारझन मोंगाच्या वस्तीत आला, पण त्याला एकहि बाण मिळेना. तेव्हा त्याने एक मोठी धाडसाची गोष्ट केली. एका झोपडीत तो शिरला. सारे गाढ झोपले होते आणि एका योद्धयाच्या शेजारी काही बाण होते. टारझनने ते हळुच उचलले आणि तो तेथून निसटला. पण हा धोका पतकरणे चांगले नाही, शहाणपणाचे नाही हे त्याच्या मानवी बुद्धीने त्याला सुचवले.

एक दिवस टारझन समुद्रात, त्या अमर्याद तळ्यात, त्याच्या आवडीचे मासे पकडीत होता. मासे पकडता पकडता एक वेदनापूर्ण आरोळी त्याच्या कानी पडली. कानोसा घेतांच तो समजला की ही आरोळी आपल्या कच्चाक वानरांपैकी कुणाची तरी आहे. तो धावत पळत निघाला आणि त्याला जे दृष्य दिसले ते भयंकरच.

टरकॉझ अगदी बेफाम झाला होता आणि एका वृद्धकपीच्या बायकोला मारीत होता. तिचे केस धरून तिचे डोके जमिनीवर आपटीत होता आणि ती मोठमोठ्याने आरोळ्या मारीत होती. टारझनने ते पाहिले. त्याचा संताप अनिवार झाला. त्याने बजावले,

'सोड तिला!'

'नाही सोडणार.'

टारझनजवळ त्याची शस्त्रास्त्रे नाहीत असे पाहून टरकॉझ म्हणाला. विरोध! आणि टारझनला!

टारझनने टरकॉझवर हल्ला चढवला. दोघे एकमेकांना भिडले. टरकॉझच्या मानाने टारझन अगदी नाजूक होता पण त्याचे स्नायु फार वळकट होते. त्याने एकदोनदा टरकॉझला लोळवले पण टरकॉझ पुन्हा उठला. तो टारझनपेक्षा अतिशय अवजड होता. म्हणून टारझनला त्याची मान पकडता पकडत नव्हती.

एकदां टारझनने सुरा चालवला; पण ती जखम तितकीशी मोठी नव्हती. पण टारझनचे एकमेव संरक्षणाचे साधन जो सुरा तो लांब फेकला गेला. आतां तर ह्या टारझन–यंग लॉर्ड ग्रेस्टोक–याच्या प्राणाशी गांठ होती.

वेळोवेळी त्याचे संरक्षणकरणाऱ्या त्याच्या बुद्धीने जर त्याला युक्ति सुच वली नसती तर टारझनचे नांव पुढे कुणाला ऐकू आले नसते आणि त्याच्याविषयीं या इतक्या गोष्टी कुणाला लिहिताहि आल्या नसत्या.

ती युक्ति म्हणजे अशी. टारझनने लढता लढता त्याला मागून तिळखा घातला आणि त्याची मान आपल्या नखांनी ओरबडायला व त्याला बुक्क्या मारायला सुरवात केली. टारझनची बुक्की म्हणजे लोखंडाचा घण. या आघातांनी टरकॉझ हैराण झाला इतक्यात टारझनने त्याचा गळा पकडला आणि गळा दाबायला सुरवात केली. टरकॉझला श्वासोच्छ्वाससुद्धा करता येईना. आता टरकॉझ मेला असता पण त्याला मारणे टारझनला बरे वाटेना. त्याच्या मरणाने वानरवंशाचे बळ कमी होईल असे त्याला वाटले म्हणून त्याची मान तशीच घट्ट पकडून ठेवून टारझनने त्याच्या कानाशी तोंड नेऊन विचारले म्हण, 'कागोडा....' म्हणजे मी शरण येतो. 'कागोडा' टरकॉश म्हणाला.

मग त्याला आपल्यापुढे घेऊन पण त्याची मान तशीच हातात ठेवून टारझन म्हणाला. 'आतां म्हण. मी कुणाला त्रास देणार नाहीं.'

'हूं!' टरकॉझ म्हणाला.

'मी कुणाच्या बायका–मुलांवर हात टाकणार नाही.'

'हं!' पुन्हा एकदा टारकोझने होकार दिला.

'हे तुम्हा सर्वांना मान्य आहे?' सर्व वानराकडे वळून टारझनने विचारले.

'हो!' सर्व एका सुरात म्हणाले.

मग टारझनने टरकोझला सोडले आणि सारी वानरे आपापल्या जागी बसली. 'आता तुम्हाला पटल असेल की टारझन हा सर्व शक्तीमान् आहे. सर्वांत बलवान् आहे. आणि सर्वांत मोठा शिकारी आहे. त्याच्या इतका मोठा कोणीच नाही.'

'हो' सर्व एक-मुखानें म्हणाले.

टारझन समुद्रकिनारी गेला, आणि जाण्यापूर्वी त्याने त्यांना बजावले, 'आता तुमची जबाबदारी तुमच्यावर. मी तुमच्यातला नाही. तुमच्या-सारखा नाही. माझे मार्ग, माझे वागणे तुमच्यासारखे नाही. मी मनुष्य आहे तुम्ही आता दुसरा राजा निवडा. मी तुमच्याकडे येणार नाही.'

आणि मग टारझन-यंग लॉर्ड ग्रेस्टोक-आपल्या जातीतल्या लोकांना शोधायला ती वानरांची वस्ती सोडून निघाला.

पण त्याला आपले जातभाई भेटले का?

●●●

अनुक्रम ३८२४
विभाग ११:११:
क्रमांक ३९८४
नों. दि. २८.५.६४

# बा रा

## त्याचे स्वतःचे जातभाई

**सकाळी** झोपेतून टारझन उठला तेंव्हां तो लंगडत होता. त्याच्या अंगावर बऱ्याच जखमा झाल्या होत्या. टरकॉझने आपल्या तीक्ष्ण नखांनी डाव्या डोळ्यापासून उजव्या डोळ्यावरील केसापर्यंत एक मासाचा लपका काढला होता. त्याला ताप येत होता. जखमांच्या वेदना होत होत्या. पण आपले खाणे शोधण्यास त्याला बाहेर जावे लागत होते. आता त्याच्या जखमा चाटण्यास, त्याला अन्नपाणी आणून देण्यास त्याची आई काला नव्हती.

पण पंधरा दिवसांनी टारझन चांगला बरा झाला. काही दिवसांनी त्याला पूर्वीसारखी शक्ति पण आली आणि त्याने विचार केला आता मोंगाच्या वस्तीत जावे.

आतां त्याला आपण पूर्णत्वाने माणूस आहो हे दाखवायचे होते. त्याला कपडे हवे होते. हातात, गळ्यात, पायात घालायला मोंगासारखे दागिने हवे पण ते कसे मिळणार ?

मग त्याने बेत केला. मोंगाच्या वस्तीत जाऊन कपडे आणायचे. संपलेले बाण आणायचे.

टारझन–लॉर्ड ग्रेस्टोक–रूपाने फार सुंदर होता आणि खरा वीर

शोभायचा. त्याचे काळे केस त्याच्या खांद्यावरून थोडे पाठीवर लोळत. पुढचे केस त्याने आपल्या सुऱ्याने कापले होते ते ग्रीक लोकांच्या सुंदर देवाप्रमाणे. त्याची सरळ, उंच, सुदृढ आकृति म्हणजे वीराचे प्रतीक होते. रुंद खांद्यावर असलेले त्याचे सुंदर मस्तक, त्याचे स्वच्छ पाणीदार डोळे, त्या डोळ्यात चमकणारे बुद्धीचे तेज पाहिले की दुसऱ्या व्यक्तीला मोह पडायचा. प्राचीन काळच्या लोकांच्या एखाद्या देवतेप्रमाणे भासायचा.

त्याने आपल्या सुऱ्याने निघतील तसे केस काढायला सुरवात केली. अगदी गुळगुळीत नव्हे पण सुऱ्याने बरेचसे केस निघत. त्याच्या गळ्यात लॉर्ड ग्रेस्टोकच्या पेटीत सांपडलेली हिरेजडित पदकाची साखळी होती. पण बाकीचे दागिने ? मग तो मोंगाच्या वस्तीत जायला निघाला.

बराच मार्ग चालून गेल्यावर समोरून येताना त्याला तीन मोंगा वीर दिसले. ते मजेने येत होते तोच त्यांना टारझन पांढरा देव दिसला. ते मागच्या मागे पळत सुटले. टारझन पण आता झाडांच्या फांद्यात शिरून त्यांचा पाठलाग करू लागला. ते प्राण वांचविण्याकरिता धावू लागले आणि टारझन फांद्याफांद्यातून झेपा घेऊ लागला. खेडे दिसू लागताच टारझनने आपली दोरी काढली आणि दोघे थोडे पुढे जाताच तिसऱ्याच्या गळ्यात त्याने तो फास टाकला आणि त्याला वर खेचून घेतले.

पळता पळता त्या दोघांनी सहज मागे वळून पाहिले तो काय नवल ? त्यांचा मित्र झाडांत ओढला जात होता आणि हातपाय झाडींत होता ते पाहून ते अतिशय वेगाने पळत सुटले आणि रडत-ओरडत कसेतरी वेशीत पोहोचले.

काय झाले म्हणून सारे लोक त्यांच्याभोवती जमले पण त्यांच्या

तोंडातून शब्द फुटत नव्हता, ते फक्त मिरांडा! मिरांडा! बोलत होते. जरा शांत झाल्यावर जे काही घडले ते त्यांनी सर्वांना सांगितले आणि मोंगाचा राजा विचारात पडला. खरं म्हणजे मोंगाचा राजा भूत-पिशाच्चावर किंवा देवदेवतावर विश्वास ठेवणारा नव्हता. त्याने विचारलं,

'अरे! नीट सांगा. त्याला सिंहाने खाल्ले काय? झाडांत त्याला कोण ओढून घेणार? 'पण ते सांगत,' 'तसे नाही. कोणीतरी त्याला झाडांत ओढून घेतले.'

इतक्या वेळांत ते बोंग्याचे प्रेत झाडावर ठेवून टारझन इथपर्यंत आला होता. आणि मजेने सर्व ऐकत होता; पण त्याला जे काही समजत होते ते केवळ खाणाखुणामुळे.

नंतर ते सारे थोडे पुढे गेले. आणि टारझन जेथे देवाचा नैवद्य ठेवीत असत तिथे आला. आज तिथे नैवेद्य तर होताच आणि जोडीला बाणांचा भारा बांधून ठेवलेला होता. ते पाहून टारझनला नवल वाटले; पण त्याला वाटले बरे झाले. आतां जीव धोक्यात घालायला नको.

आणि मोंग्यांनी ठरवले होते. हा देव नैवेद्य खातो, बाण पळवतो तेव्हा त्याला बाण पाहिजे असावेत. नैवेद्याच्या जोडीला बाण पण दिले की तो देव अधिक खूप होईल.

आणि देव खूप झाला खराच. त्याने नैवेद्य खाल्ला, बाणाचा भारा उचलला आणि त्याने झाडात झेप घेतली. मिरांडाला त्याने ज्या झाडावर ठेवले होते, तिथे तो आला. प्रथम त्याने मिरांडाचे सर्व कपडे काढून आपल्या अंगावर चढवले. त्याचे दागिने अंगावर घातले, पण सर्वांत त्याला आवडला तो हरीणाच्या कातड्याचा पट्टा.

त्या सर्व वस्तू काढून घेताच टारझनने मिरांडाचे प्रेत आणून वेशीतून आत टाकले आणि ते पाहताच सर्व मोंगा भयचकित झाले.

आणि आपल्या अंगावरचे सर्व कपडे शस्त्रास्त्रे पाहून शिलेदार टारझन फार खूष झाला.

आता त्याला वाटले करचाक वस्तीमध्ये जाऊन सर्वांना चकित करावे व सांगावे. पहा मी तुमच्याहून कसा वेगळा आहे. मी मनुष्य आहे.

पण पहिल्याने आता केबिनकडे जावे. बाणाचा भारा आत ठेवावा मग पुढे करचाकच्या वानरात जावे आणि तो केबिनकडे आला, तो त्याला वेगळेच दृश्य दिसले. त्याच्या केबिनचे दार उघड होते आणि आत शिरताच त्याला दिसले की त्याच्या वस्तु ज्या तो जागच्या जागी ठेवीत असे त्या जमिनीवर इथे तिथे पडल्या होत्या. त्याला संताप आला तो रागाने म्हणाला, 'कोण शिरला, माझ्या केबिनमध्ये?' मग त्याने आपला तो खजिना सुरक्षित आहे की नाही हे पाहिले आणि तो सुरक्षित होता.

इतक्यात त्याला बाहेर कसला तरी गलबला ऐकू आला. आणि त्याला जे दृश्य दिसले ते अगदी चमत्कारीक होते. समुद्रात जहाज उभे होते. जवळच दोन होड्या होत्या आणि काही माणसे होती. त्याच्यासारखी श्वेतवर्णीय माणसे जहाजातून उतरत होती. काही किनाऱ्यावर आली होती आणि जंगलाकडे पहात होती.

आता ही माणसे कदाचित् आपल्या केबिनमध्ये येतील असे पाहून टारझनने एक कागद घेतला आणि त्यावर पुढील नोटीस लिहिली.

> हे घर टारझनचे आहे. टारझन हा अनेक पशूंना, अनेक काळ्या वीरांना मारणारा योद्धा आहे. या वस्तु टारझनच्या आहेत. त्या मोडू तोडू नका. टारझनचा पहारा आहे हे विसरू नका.
>
> वानरराज टारझन

टारझनने ही नोटीस लिहिली व दारावर एका लाकडाच्या खिटीने अडकवली. नंतर तो झाडाच्या फांदीत दडून त्यांच्या हालचाली पाहू लागला.

किनाऱ्यावर उतरलेले लोक श्वेतवर्णीय होते; पण कुरुप व दिसायला राकट व भयंकर होते. त्यांचे आवाज पण राकट होते. जे दोघे सर्वांच्या पुढे किनाऱ्यावर आले होते ते हातवारे करीत काही तरी बोलत होते; पण ते काय बोलत होते हे टारझनला ऐकू येत नव्हते आणि ऐकू आले असते तरी समजले असते की नाही कोण जाणे ?

लौकरच ते कशावरून तरी भांडू लागले आणि त्यांच्यात जो उंदीर-तोंड्या होता त्याने त्याच्याशी भांडणारा जो उंच राक्षस माणूस त्याची पाठ फिरताच त्याला पिस्तुलाची गोळी घातली. बिचारा एकदम खाली पडला आणि त्याचा प्राण गेला. हा उंदीरतोंड्या फार भयंकर माणूस होता.

जे जहाज समुद्रांत आतां उभे होते ते व्यापारी जहाज होते आणि कप्तानाच्या ओळखीचे एक इंग्रज कुटुंब त्या जहाजाने प्रवास करीत होते. आफ्रिकेच्या जवळ जवळ येताच लाभाच्या आशेने त्या खलाशांनी एकत्र होऊन कप्तानाला मारले. जहाजावर हे बंडच झाले. हे होताच ते इंग्रज कुटुंब घाबरले. आणि आता काय होणार याचा विचार करू लागले.

त्या खलाशांना; पण भीति वाटू लागली. समजा वाजून एखादे जहाज जाताना या लोकांना दिसले आणि आपण कप्तानाला ठार केले असे त्यांना समजले तर ते दुसरे लोक आपणाला इंग्लंडला नेऊन फाशी देतील म्हणून त्यांनी ठरवले की या लोकांना इकडेच कुठे तरी किनाऱ्यावर उतरवायचे. म्हणून त्यांनी या निर्मनुष्य किनाऱ्यावर जहाज

थांबवले होते आणि खलाशी किनाऱ्यावर उतरून त्या जागेची पाहणी करीत होते.

उंदीरतोंड्याने त्या दुसऱ्या माणसाला गोळी घालताच झालेल्या आवाजाने आणि त्या माणसाला पाहून टारझनला फार नवल वाटले. बंदुकीची गोळी, बंदुक उडवणे हे त्याने कधीच पाहिले नव्हते. पण शत्रूला मारायची ही सोपी रीत आहे असे त्याला वाटल्याखेरीज राहिले नाही.

पुन्हा जहाजावर चढताच त्या उंदीरतोंड्याने इतर खलाशांना हुकूम केला. त्या इंग्रज कुटुंबाचे सामान त्या होडीत उतरवले गेले. मागून दुसऱ्या होडीत पाच माणसे उतरवली गेली. त्यात दोन स्त्रिया होत्या. एक निग्रो व एक इंग्लिश. ती भयानक दिसणारी निग्रो स्त्री त्या इंग्रज मुलीची दाई होती.

ती माणसे किनाऱ्यावर उतरताच उंदीरतोंड्यासह सारी माणसे त्या केबिनच्या जवळ आली आणि टारझनने दारावर लावलेली ती नोटीस पाहून ते थक्क झाले. एका तासापूर्वी ही नोटीस इथे नव्हती मग आता कशी आली ? कोणी लावली ? पण ते कोडे त्यांना उलगडले नाही. मग त्यांनी प्रो. पोर्टरला ती नोटीस वाचायला सांगितली! त्याने चष्मा डोळ्याना लावून ती वाचली आणि उद्गार काढले, ‘ विलक्षण, विलक्षण, फार विलक्षण ! ’

पण फार विलक्षण म्हणजे काय हे कुणालाच–म्हणजे त्या खलाशांना कळले नाही. बाकीची जाणती माणसे अजून किनाऱ्यावरच होती आणि प्रो. पोर्टरची बडबड चाललीच होती. ‘ विलक्षण, विलक्षण, फार विलक्षण ’ पण हे विलक्षण म्हणजे काय ? पण प्रो. पोर्टर हा स्वप्नाळु माणूस अधिक काही बोलेना.

तेव्हा उंदीरतोंड्या संतापला आणि त्याने ढकलत ढकलत प्रो. पोर्टरला केबिनजवळ नेले व म्हटले 'वाच आता!'

मग प्रो. पोर्टरने चष्मा लावून ती नोटीस मोठ्याने वाचली आणि नोटीशीतला मजकूर कळताच सारे थक्क झाले. या केबिनीचा मालक, हा टारझन कोण? आणि तो पहारा करीत आहे म्हणजे कुठे?

इतक्यात काय झाले कोण जाणे; पण त्या उंदीरतोंड्याने प्रो. पोर्टरला एक जोराचा धक्का दिला आणि विलियम जॉन क्लेटनने त्या उंदीरतोंड्याला धमकावून म्हटले. पुन्हा जर प्रो. पोर्टरशी बेआदबीने वागलास तर लक्षात ठेव. मी तुझ्या पिस्तुलाला भिणार नाही आणि मला माहित आहे कीं तू भेकड आहेस. माणसावर तू मागून पिस्तुल उडवतोस आणि उंदीरतोंड्याने पिस्तुलाचा हात मागे घेतला तरीहि क्लेटन त्याच्याकडे पाठ करून उभा राहिला. पण उंदीरतोंड्या स्वस्थच होता. मग त्याला इतर खलाशांचे भय वाटले की काय कोण जाणें?

पण नाही त्याने पिस्तुल रोखलेच आणि त्याच्या उजव्या खांद्यावर एक भाला येऊन आदळला. पिस्तुल त्याच्या हातातून दूर उडाले आणि तो जखमी झाला व त्या जखमेने विव्हळू लागला आणि क्लेटनने सर्वांची दृष्टी चुकवून ते पिस्तूल उचलून घेतले आणि आपल्या छातीकडच्या खिशात लपवले.

तो भाला टारझनने मारला होता. तो विषारी बाण मारणार होता पण पानांच्या दाटीमुळे त्याला तसे करता आले नाही आणि तो उंदीरतोंड्या मारायच्या ऐवजी जखमी झाला.

होडीतून आणलेले सामान त्या खलाशांनी केबिनजवळ आणून ठेवले आणि ते होडीकडे परत गेले. आणि मग सर्वचजण जहाजावर चढले पण या एवढया धांदलीत स्वप्नाळू प्रो. पोर्टर जंगलाच्या दिशेने गेले होते. त्यांच्या मागोमाग त्यांचा सेक्रेटरी मि. फिलांडरही

गेला होता. पण बराच वेळ ही गोष्ट कुणाच्या लक्षांत आली नाही. पण ते सर्व खलाशी बोटीवर जाताच क्लेटनच्या ते लक्षात आले आणि तो घाबरला.

याचवेळी केबिनजवळ असलेली एस्मेरेलडा, जेनची दाई तिचे सामान शोधून वेगळे काढीत होती. तेव्हा क्लेटन जेनजवळ जाऊन म्हणाला,

'तुझे वडील जंगलाच्या दिशेने गेले आहेत. मी त्यांना शोधायला जातो.'

'पण....'

'समजलो; पण माझ्याजवळ हा भाला आहे. आणि एका खलाशाचे पिस्तुल मी नजर चुकवून घेतले आहे, ते पण आहे. हे पहा! मी जातो. तू घाबरू नकोस. तुम्ही दोघी केबिनमध्ये जाऊन बसा.'

आणि तो निघून गेला. आणि एस्मेरेलडा केबिनमध्ये गेली. आणि किंकाळतच बाहेर आली. 'काय झाले ग? ओरडतेस का?' असे विचारीत जेन आत गेली आणि तिला ते पांढरे फटक हाडाचे दोन सापळे आढळले. पाळण्यातहि एक सापळा होता. आता जेनहि घाबरली पण तसेच धैर्य करून तिने एस्मिरेल्डाला आत घेतले आणि दाराला आडती लावली. आज वीस वर्षांनी त्या केबिनला ती आडती लागत होती. पण एस्मिरेल्डाचे रडणे, भीतीने कापणे चालूच होते. प्रेतांचे सापळे तिथे पडले होते. हा काय प्रकार आहे हे जेनला कळेना पण जे होते ते अति भयानक होते. आता तिला धीर द्यायला तेथे कोणीच नव्हते. आणि ती एस्मेरेल्डा अगदी लहानाहून लहान झाली होती. तिचे रडणे, भीतीने कापणे काही संपेना, तेव्हा जेन रागाने तिला म्हणाली, 'पुरे आता! ती हाडे काही तुला खाणार नाहीत. गप्प बस.'

प्रो. प्रोर्टरला आणि से. फिलांडर यांना शोधायला गेलेला क्लेटन अजून परत आला नव्हता. आणि रानटी पशूंच्या भीतीनें जेन केबिनचे दार लावून तिथेंच बसली होती. आणि बाहेर झाडाच्या दाट पालवीत आमचा टारझन जेनचा तो सुंदर चेहरा आठवीत होता. त्याला वाटले ' किती सुंदर चेहरा ! '

●●●

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३८०५
विभाग बा.वा.
क्रमांक ३९८७
नों. दि. २८.५.६५
वाचनालय शाखा

# ते रा

## जंगलात

**क्लेटनला** जंगलात जाऊन कितीतरी वेळ झाला होता. पण तो अजून आला नव्हता. अनोळखी जंगल. आता लौकरच रात्र पडेल जवळ फक्त एक भाला आहे. भाल्याने तो काय करणार? तेव्हा त्याला शोधायला टारझन निघाला.

थोड्या अंतरावर जाताच टारझनला क्लेटनच्या हाका ऐकू आल्या. तो पोर्टर व सि. फिलांडर याना हाका मारीत होता; पण कुठूनच प्रतिसाद मिळत नव्हता. क्लेटन पुढे पुढे जात होता. प्रो. पोर्टरला घेतल्याशिवाय गेले तर जेन पोर्टरला काय वाटेल? म्हणून तसाच तो हाका मारीत पुढे गेला आणि शेवटी घाम फुटीत एका झाडाशी टेकून बसून राहिला. टारझन त्याचा मागोवा घेत झाडावर जात होता. इतक्यात टारझनला शिटाची चाहूल लागली. शीटा तो वाघ अगदी जवळ आला होता; पण क्लेटन आरामात बसला होता. 'त्याला अजून वाघाची चाहूल लागत नाही म्हणजे काय? ही माणसे असतात तरी कशी!'

वाघ अगदी जवळ आला होता. आणि टारझनने त्याला एक बाण मारला. तो बाण त्याला वर्मी लागला. टारझनचे ते अचूक शरसंधान! शीटा धडपडत खाली पडला व मेला. पण यावेळी टारझनने खाली

उडी टाकली. त्याला पाहून क्लेटन अगदी चकित झाला. ‘ हा अर्धनग्न माणूस कोण असावा ? यानेच तर हा वाघ मारला नाही ना ? ’

टारझन पण क्लेटनकडे पहात काही वेळ स्वस्थ राहिला. त्याचे ते कपडे पाहून टारझन चकित झाला आणि त्याची ती भाला धरण्याची पद्धत पाहून समजला, भाला हे काय शस्त्र आहे हे अजून त्याला समजलेलं नाही.

प्रथम क्लेटन टारझनशी इंग्लिशमधून बोलू लागला पण टारझनला तो काय बोलतो हे मुळीच कळेना. तो काहीतरी वानरासारखा चित्कार करूं लागला. तेव्हा क्लेटनला वाटलं, ‘ हा काय वानरात वाढलेला आहे ? ’ आणि याची ती नोटीस वरील सही ‘ टारझन ऑफ एपस्. ’

‘ पण हा टारझन खचीत नाही. याला इंग्रजी येत नाही. त्या टारझनने ती नोटीस तर चक्क इंग्रजीत लिहिली आहे. मग कोण आहे हा ? ’

पण आतां तो कोण आहे याचा विचार करायला वेळ नव्हता. संध्याकाळ तर झाली होती. जेन, एस्मेरल्डा त्या केबिनमध्ये एकट्या होत्या. आता परत जावे झाले. वाघाला तर या माणसाने मारले आहे; पण आपण आभार मानायला गेलो तर याला काही समजत नाही. तेव्हा आता परतावे. ईश्वर करील तर ते दोघे वाचतील.

असे मनात म्हणून क्लेटन जाऊ लागला; पण कुठे ? मोंग्याच्या खेड्याच्या दिशेनें ! आपण वाट चुकलो हे त्याला कळलेच नव्हते आणि एखाद्या मोंग्याने याला पाहिले तर ! अति भयंकर ! अति भयंकर ! आणि इतक्यांत सिंहाची गर्जना टारझनच्या कानी आली. क्लेटन तर कोसळून खाली पडला. आपला कमरेचा सुरा काढून टारझनने त्या सिंहावर हल्ला चढवला आणि थोड्याच वेळांत त्याने त्या सिंहाला स्वर्गलोक दाखवला. आता कुठे क्लेटनने डोळे उघडले व तो उठून



टारझनने त्या सिंहावर हल्ला चढविला आणि थोड्याच वेळात त्याने त्या सिंहाला स्वर्गलोक दाखविला.

उभा राहिला. पण आता टारझनने क्लेटनला आश्चर्याचा धक्का बसेल अशी गोष्ट केली. आपल्या हातांतील सुऱ्याने त्याने सिंहाच्या मासाचे चार चांगले चांगले तुकडे काढले व तो ते रक्ताळलेले मांस मजेने खाऊ लागला. आणि क्लेटनला खुणांनी सांगू लागला, ' खाना ' पण क्लेटन ते कच्चे मास कसे खाणार ?

टारझनने पोटभर मास खातांच क्लेटनला खूण केली. माझ्यामागून ये. क्लेटनला खूण समजली; पण याच्यामागून जायचे कसे ? याने आणखी कुठे तरी भयानक जागी आपणाला नेले तर ?

तो आपल्यामागून येत नाही असे पाहताच टारझनने त्याचा कोट ओढला व त्याला आपल्याबरोबर चालवले आणि क्लेटन त्याच्याबरोबर चालू लागला; कारण दुसरा उपाय च नव्हता.

टारझनने पण पाहिले आता हा मुकाट्याने आपणाबरोबर येतो आहे. तेव्हा त्याने पण त्याचा हात सोडला आणि दोघे सरळ चालू लागले. आणि इकडे जंगलच्या राणीने जेनच्या म्हणजे टारझनच्या केबिनवर हल्ला चढवला होता.

केबिनमधील त्या ठेंगण्या बाकावर जेन व एस्मिरेल्डा एकमेकांच्या मिठीत बसल्या होत्या. एस्मिरेल्डाच्या हुंदक्यामुळेच सिंहिणीचे लक्ष तिथे गेले होते. केबिनजवळ येऊन ती दारावर धक्के देत होती. पंज्याने दारावर ओरखंडे काढीत होती आणि तो तो त्या अधिकाधिक भयभीत होत होत्या. एकदोनदा जेनने एस्मिरेल्डाला विनवले,

' ताई ! तुझे रडणे थांबव. नाहीतर आपण मरू.' आणि मरणाच्या भयाने तिने रडणे थांबवले.

इकडे ती सिंहीण दारावर धक्के देत होती. ओरखडे काढीत होती आणि आतील दोघींची भयाने गाळण उडत होती.

दारावर धक्के मारून ती सिंहीण कंटाळली आणि जेनला वाटले ती

गेली. पण ती गेली नव्हती. आता ती खिडकीकडे वळली होती आणि खिडकीची तावदाने मोडण्याचा प्रयत्न करीत होती; पण ती तावदाने फार बळकट होती. एकदा तिने आपला पंजा आत घालून पाहिला पण जमेना. पुन्हा ती दरवाजाकडे गेली. आणि दारावर धक्के देऊ लागली. ओरखडे काढू लागली आणि कंठाशी प्राण आलेली जेन स्वस्थ बसून राहिली आणि एस्मिरेल्डा पुन्हा बेशुद्ध पडली. आळी-पाळीने सिंहीण दाराकडे व खिडकीकडे येत जात होती. पण अजूनहि तिला यश मिळत नव्हते, पण आता खिडकीचे तावदान खिळखिळे होण्याचा मार्गाला लागले होते. तेव्हा जेनने विचार केला आता काही-तरी उपाय योजला पाहिजे. तिने मोठमोठ्याने हांका मारायला सुरवात केली.

'एस्मिरेल्डा, एस्मिरेल्डा! उठ, उठ!' कसे तरी एस्मिरेल्डाने डोळे उघडले. जेनने तिला हात धरून उठवले; पण मदत करायची सोडून ती लपायला जागा पाहू लागली. कपाटात शिरण्याचा ती प्रयत्न करू लागली. पण ते धूड कपाटात कसे शिरणार? आणि सिंहिणीचा पंजा आत आलेला पाहून ती पुन्हा बेशुद्ध पडली.

म्हणता म्हणता सिंहिणीचे डोके पण आंत आले आणि जेनने आपल्या छातीवर हात ठेवला आणि तिच्या हाताला क्लेटनने दिलेलं पिस्तुल लागले.

ते पिस्तुल घेऊन तिने सिंहिणीवर झाडले. सिंहीण खाली पडली पण ती मेली नाही. तिच्या फक्त उजव्या खांद्याला जखम झाली होती. आणि त्याच वेळी जेन बेशुद्ध होऊन पडली.

●●●

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. २८-५-६५

# चौदा

## अरण्यातील देव

जेनने स्वसंरक्षणार्थ जे पिस्तुल उडवले त्याचा आवाज क्लेटनने ऐकला आणि त्याची भीतीने तारांबळ उडाली. त्याने जेनजवळ पिस्तूल दिले होते ते त्याला आठवले. पण ते जेनने उडवले की एखाद्या क्रुर खलाशाने तिच्यावर हल्ला केला, त्याला काहीच कळेना आणि जेनला सोडवण्याची त्याची ताकद नव्हती. केबिन किती दूर आहे याचा त्याला अदमास नव्हता आणि त्याच्या पायात चालायची शक्ति पण उरली नव्हती.

नंतर त्याने टारझनकडे पाहिले. त्याच्यावर आवाजाचा काय परिणाम झाला आहे हे त्याला पहावयचे होते पण टारझन विचारात गढला होता. आणि मग त्याने चटकन निर्णय घेतला. तो धावत धावत निघाला; पण टारझनबरोबर, त्या अरण्यवासी देवाबरोबर तो मनुष्य–क्लेटन कसा चालणार ? क्लेटन दहापंधरा पावले चालला की पडत होता. धडपडत उठत होता. पुन्हा चालत होता आणि टारझन कुठे नाहीसा झाला होता. टारझन नाही हे पाहून तो भयभीत झाला आणि मोठमोठ्याने त्याला हाक मारू लागला. इतक्यांत झाडातून एक उडी त्याच्याजवळ पडली आणि क्लेटन थक्क झाला.

खाली येताच टारझनने त्याला खूण केली. 'माझ्या गळ्याला मिठी घाल' क्लेटन समजला आणि त्याच्या पाठीवर वसला. आणि टारझनने झाडावर झेप घेतली आणि तो फांद्यात शिरला आणि फांद्यावरून उड्या घेत घेत तो बरेच अंतर चालून गेला. क्लेटनला मात्र वाटत होते काय ही शक्ती ! काय हे वळ ! काय हे धैर्य ! त्याचे मन कौतुकाने भरून आले आणि टारझन चाललाच होता. त्याला वाटत होते, 'किती हा मंद वेग !' आणि क्लेटनला वाटत होते. 'किती हा जलद वेग !'

टारझन झाडांच्या फांद्यातून उड्या घेत असता क्लेटनने सहज खाली पाहिले तेव्हा त्याला आढळले की शंभर फूट उंचीवरून तरी तो जात असावा. आणि काळोखाची त्याला तमा नव्हती. जणू तो भरदुपारच्या वेळी जणू लंडनच्या रस्त्यातून जात होता. आणि पुढचे दृष्य पाहून टारझन थक्क झाला.

उतरता उतरताच टारझनच्या लक्षात सर्व परिस्थिती आली होती. आणि त्याने आणखी एक पिस्तुलाचा बार ऐकला. सिंहिणीच्या दातांना व नखांना बळी पडण्यापेक्षा हे मरण बरे असे शुद्धीवर आलेल्या जेनने ठरवले. आणि पहिली गोळी तिने एस्मिरेल्डाला घातली. आणि दुसरी आपण स्वतःवर घालणार तोच तिला दिसले की सिंहीणीचे धड बाहेर ओढले जात आहे. तिला नवल वाटले. आणि वाहेर चांदण्यात तिला दोन डोकी दिसली. तेव्हा तिने पिस्तुल बाजूला टाकले आणि काय होतेय हे पाहू लागली.

सिंहिणीचे धड हळुहळू बाहेर जात होते. टारझन केवळ शेपटीने तिला ओढीत होता. किती प्रचंड वळ असेल त्याच्या बाहूत ? त्याला मदत करायला आलेल्या क्लेटनला तो खुणानी सुचवीत होता. हे माझे

बाण घे आणि खुपस. हा माझा सुरा घे आणि मार. पण क्लेटनला काहीच समजत नव्हते.

अनेक प्रयत्न करून टारझनने सिंहिणीला बाहेर काढली. ती पण थकली होती. कारण तिला जखम झाली होती. पण आता ती त्याच्या-वर उलटली असती. पण खारीच्या चपळाईने त्याने तिच्या पाठीवर उडी घेतली आणि तिची मान आवळायला सुरवात केली; पण किती कठीण काम ते !

तिची मान आवळून ती मरेपर्यंत सहज दोनचार मिनिटे लागली. आणि मोठ्याने गुरगुरत तिने प्राण सोडला. आणि तिच्या मृत शरीरावर पाय ठेवून चंद्राकडे तोंड वळवून टारझनने आपली विजयी गर्जना केली. दोन मिनिटे सारे विश्व हादरले. क्लेटन जेनला म्हणाला,

'आता दार उघड, तुला वाचवणाऱ्या वीराचे आभार मान.' पण जेन केबिनच्या बाहेर जायला तयार नव्हती. इतकी ती घाबरली होती.

क्लेटन म्हणाला, 'चल बाहेर. मी तुला नेतो.'

पण जेव्हा ती क्लेटनबरोबर बाहेर गेली तेव्हा टारझन तेथे नव्हता. सिंहिणीचे शरीर मात्र पडले होते.

आणि मग जेन क्लेटनला म्हणाली. 'आपण या वीराकरिता प्रार्थना करू.'

'देव या विजयी वीराचे संरक्षण करो. सदा त्याला यशस्वी करो, आमेन.'

आणि त्याच वेळी क्लेटन व एस्मिरेल्डा म्हणाली 'आमेन.'

जेनने मागे पाहिले एस्मिरेल्डा जिवंत होती. तिच्या गोळीला बळी पडली नव्हती. म्हणूनहि तिने देवाचे आभार मानले. आणि मग तिला इतका अवर्णनीय आनंद झाला की त्या ठेंगण्या बाकावर बसून ती खदखदा हसली.

●●●

# पं ध रा

## अतिशय विलक्षण

प्रो. पोर्टर आणि फिलँडर केबिनमधून निघाले ते किनाऱ्या-किनाऱ्यानेच चालले होते पण आपण कुठे चालली आहो याचे त्यांना भान नव्हते. आणि केबिनकडे येण्याची त्यांना घाई पण नव्हती. आणि ते केबिनमध्ये परत जर आले असते तर ते वादविवाद कोणी केले असते ?

हे जंगल आहे. हे अतिशय भयंकर असणार हे त्या विद्वानाना कोणी सांगायला का पाहिजे होते ? पण ही तत्वज्ञानी शास्त्रीय प्रवृत्तीची माणसे फार लहरी आणि स्वप्नाळू असतात. खरे जग ते विसरून जातात. वर्तमानकालापेक्षा हजार वर्षांपूर्वी काय झाले याची त्याना काळजी. याच स्वप्नांत ते रंगलेले असतात. आता ते वाद करीत होते; पण कशावर ! आपण पूर्वेकडे आहो की दक्षिणे-कडे ? व तो समोर पसरलेला अॅटलांटिक महासागर किती खोल आहे ?

'पण आपणाला आपल्या केबिनकडे परत जायचे आहे ना ?' से. फिलँडरने विचारले.

'पण थांब ! आपण पूर्वेकडे आहोत की दक्षिणेकडे हे असून कुठे निश्चित झाले आहे ?'

'ते मग केबिनकडे गेल्यावर निश्चित करू.' से. फिलँडर म्हणाला.

'अंहं! शास्त्रीय चर्चेत सर्व निश्चित ठरले पाहिजे.' प्रो. पोर्टरने उत्तर दिले. 'आणि त्या मूर लोकाविषयी आपण म्हणत होतो. तो निकाल तरी अजून कुठे लागला आहे? ते जर त्यावेळी जिंकले असते तर?'

'पण जिंकलेत कुठे? जाऊ या आपण. दिवस उतरणीला लागला आहे.' से. फिलँडर म्हणाला.

'आणि ते स्पॅनिश लोक?'

आणि फिलँडरला वाटले काहीतरी सणसणीत उत्तर द्यावे; पण या विद्वान् प्रोफेसराला आपण काय बोलणार?

आणि हे त्यांचे वादविवाद चालले असताना वरील झाडाच्या पालवीत बसून टारझन त्या मूर्खांची बडबड ऐकत होता. क्लेटनला केबिनकडे पोहोचवल्यावर तो त्या दोन वृद्धांच्या शोधार्थ निघाला होता. ते कितीतरी दूर गेले होते. पण सुदैवाने किनाऱ्यावर होते, म्हणून बरे झाले. नाहीतर एखाद्या हिंस्र श्वापदाने त्यांचा कधीच चट्टामट्टा केला असता; पण आतासुद्धा काही कमी धास्ती होती असे नाही. पण हे मूर्ख सारखे बडबडत आहेत. पण ते काय बोलत होते हे टारझनला कळत नव्हते.

इतक्यात एक सिंह त्या बाजूने येताना टारझनला दिसला. टारझनला त्या सिंहाची चाहूल लागली पण प्रो. पोर्टर व से. फिलँडर यांच्या ध्यानीमनी ती गोष्ट आली नव्हती. जेव्हा तो सिंह वीसबावीस पावलावर आला तेव्हा फिलँडरने सिंहाला पाहिले आणि त्याची घाबरगुंडी उडाली. आता काय करावे? पोर्टरला सूचना कशी द्यावी हे त्याला कळत नव्हते. त्याची वाचाच बंद झाली होती. पण तो

एकाद्या झाडाचा आश्रय शोधित होता. पण प्रो. पोर्टरला त्याची जाणीव नव्हती. ते आपल्याच धुंदीत काहीतरी बडबडत चालले होते.

सिंह अगदी पांच पावलावर आला. फिलँडरने सिंह पाहिल्यापासून त्याचा हाच क्रम चालला होता. मध्ये मागे पहायचे आणि पुढे जायचे पण त्याला कळत होते की मृत्यु काही आता टळत नाही. पण सिंह पांच पावलावर येताच तो प्रो. पोर्टरला पण दिसला. यावेळी फिलँडर झाडावर चढण्याच्या बेताने एका झाडाजवळ गेला. आणि पालवींतून एक हात बाहेर येऊन त्याने फिलँडरला वर ओढून घेतले व एका फांदीवर बसवले. इतक्यात प्रोफेसर पण तिथे आले आणि टारझनने त्यांना पण वर उचलले. आपण कसे वर उचलले गेलो याची त्याना कल्पना होईना.

ते फक्त म्हणाले, 'फार विलक्षण ! फार विलक्षण !'

सिंह आता संतापला होता; कारण दोन शिकारी त्याच्या हातून सुटल्या होत्या. आणि फार विलक्षण म्हणजे टारझनची कृति. अगदी जीवावर बेतेपर्यंत त्याने त्या दोघाना झाडावर घेतले नव्हते, कारण टारझनला माहित होते की तो सिंह उपाशी नाही, तेव्हा तो एकदम त्यांच्यावर हल्ला करणार नाही. जनावराची ही रीत त्याला माहित होती. म्हणून त्या मूर्खांना त्याने बराच वेळ तसेच सोडून दिले होते.

सिंह मात्र आता झाडाखाली जोरजोराने फेऱ्या घालीत होता आणि प्रो. प्रोर्टर म्हणत होते, 'फार विलक्षण ! फार विलक्षण ! हे लोक पशूंना पशुसंग्रहालयातून सोडतात तरी कसे ? मला एक पशुसंग्रहालयाला अर्ज केला पाहिजे. काय करतात हे डायरेक्टर ? फिलँडर मला आठवण कर केबिनमध्ये परत गेल्यावर. अर्ज केला पाहिजे.' से. फिलँडर हे ऐकून कपाळाला हात लावून बसले. अजूनहि हा माणूस शुद्धीवर येत नाही. फारच विलक्षण !

सिंह अजूनहि फिरत होता. टारझनला वाटले आता काही हा जात नाही. आता याला घालवले पाहिजे.

आणि त्याने आपली ती विजयदर्शक अशी मोठी गर्जना केली. सारे रान हादरले. सिंह जीव घेऊन पळाला आणि प्रो. पोर्टर आणि से. फिलँडर झाडावरून खाली कोसळले. केवढा भयंकर अपघात! फार भयंकर! प्रो. स्वतःशी पुटपुटत होते.

त्यांना वाटले आपले शरीर आता पूर्ण निकामी झाले. हात मोडले, पाय मोडले, पाठीचा कणा मोडला, कंबर मोडली, आता उठायचे कसे? केवढ्या उंचावरून पडलो आपण. से. फिलँडरला पण तसेच वाटत होते. पण प्रोफेसर प्रयत्न करू लागले. त्यानी आपला एक हात उचलला तो शाबूत होता. 'फार विलक्षण!' दुसरा हात उचलला तो पण शाबूत होता. मान उचलली ती पण शाबूत–'फार विलक्षण! फार विलक्षण' मग त्यांनी पाय हलवले. उठून वसले. बसता आले. 'पण हे आहे तरी काय? इतक्या उंचावरून पडलो; पण सारे व्यवस्थित. सारे सुरक्षित. नवल! फार नवल!'

आणि फिलँडरकडे वळून ते म्हणाले, 'उठ उठ! आळशासारखा लोळतोस काय?'

प्रोफेसराचे हे म्हणणे ऐकून से. फिलँडर पण उठण्याचा प्रयत्न करू लागले. आणि लागलीच ते उठूनहि बसले. त्यांची पण सारी हाडे शाबूत होती. 'फार विलक्षण! फार विलक्षण!' ते पण पुटपुटले आणि टारझनला वाटले हे मूर्ख काय पुटपुटतात कोण जाणे?

टारझनने त्याना खूण केली 'माझ्या मागून या.'

पण ते उभेच राहिले तेव्हा त्यांचे कोट पकडून टारझन केबिनच्या दिशेने निघाला. थोड्या वेळाने त्याने त्यांचे हात सोडले आणि तो पुढे चालू लागला. पण थोड्या वेळाने त्याने मागे वळून पाहिले तो ते

मूर्ख तिथेंच उभे. काय करावे हे टारझनला कळेना. तेव्हा त्याने एक वेगळाच उपाय योजला.

त्याने आपल्या दोरीचा फास से. फिलँडरच्या मानेभोवती घातला. दुसरे टोक प्रोफेसरच्या मानेभोवती गुंडाळले आणि टारझन चालू लागला.

आणि पोर्टर बरळू लागले, 'काय हा याचा न्याय! माणसाच्या, सुधारलेल्या माणसाच्या मानेभोवती हा दोरीचा फांस घालतो आणि त्याना पशुप्रमाणे, नेतो. 'विलक्षण! फार विलक्षण!'

थोड्याच वेळात केबिन दिसू लागली आणि टारझनने त्यांच्या गळ्याभोवतालची दोरी काढली आणि खुणेने त्याना दाखवले, 'ती पहा केबिन. तुमचे वस्तिस्थान!'

केबिन पाहून त्याना फार आनंद झाला. आता ते मागे वळून टारझनचे आभार मानणार; पण टारझन होताच कुठे? तो कधीच निघून गेला होता.

मग ते धावत पळत केबिनकडे आले. त्यांना पाहून सर्वांना आनंद झाला आणि मग टारझनने त्याना सिंहापासून कसे वाचवले, गुरासारखे कसे आणले हे सांगून पोर्टर पुन्हा म्हणाले, 'फार विलक्षण! फार विलक्षण!

●●●

अनुक्रम ...
विभाग ...
क्रमांक ...
नों. दि. २८.५.५५

# सोळा

## सापळ्याची खड्ड्यात रवानगी

**प्रोफेसर** व से. फिलँडर परतून येताच केबिन साफ कर-ण्याचे काम त्यांनी हाती घेतले. आज वीस वर्षे सारे जिथेच्या तिथेच पडले होते. प्रथम त्यांचे लक्ष त्या प्रेताच्या सापळ्याकडे गेले. ती हाडे पांढरी सफेत होती आणि त्या हाडावरून प्रो. पोर्टरने ठरवले ही हाडे एका उच्च दर्जाच्या युरोपियन माणसाची आहेत. दुसरा सापळा एका नाजूक स्त्रीचा होता. आणि पाळण्यात जो लहान प्रेताचा सापळा होता तो मानवी प्रेताचा नसावा असे त्याना वाटले.

बाहेर क्लेटन आणि फिलँडर यांनी केबिनच्याजवळ थोड्या अंतरावर तीन खड्डे खणले. नंतर त्यांनी ते सापळे बाहेर आणले आणि आता तो पुरुषाचा सापळा खड्ड्यात ठेवणार तो त्याच्या अनामिकेत त्याना एक अंगठी सापडली. ती पाहताच क्लेटन आश्चर्याने उद्गारला, ' अरे ! ही तर आमच्या घराण्याची सिग्नेट रिंग–निशाणीची आंगठी ! ग्रेस्टोक घराण्याचे मानचिन्ह ! पण हे इथे कसे ? आमच काका तर बोटीत बुडून मेले असे ऐकले होते ! मग ही आंगठी इथे कशी ?'

तेव्हा जेनने एकदोन पुस्तके उघडून पाहिली. एकावर नांव होते

 

ग्रेस्टोक आणि एकावर नाव होते 'जॉन क्लेटन.' ती नावे पाहूनहि त्यांना नवल वाटले आणि मग त्यांची खात्री झाली लॉर्ड ग्रेस्टोक यांची ही केबिन. ते याच किनाऱ्याला लागले असावे. काय हा योगायोग! आज त्यांची प्रेते आमच्या हातून, आमच्याकडून, त्यांच्या कुटूंबियांच्या हातून पुरली जाणार होती.

मग लॉर्ड ग्रेस्टोक यांच्या अनेक गोष्टी सांगून तो म्हणाला,

आमची आई सांगायची लेडी ॲलेस फार सुंदर स्त्री होती. तशीच फार गुणवान् आणि धैर्यवान् स्त्री होती. ती ही लेडी ॲलिस! काय हे तिच्या नशिबी आले मग त्यांनी ते सांपळे खड्डयांत ठेवले. प्रो. पोर्टरनी प्रेतविधीचे मंत्र म्हटले. नंतर त्यानी त्या प्रेतावर माती टाकून ते केबिनकडे परतले आणि खाण्यापिण्याच्या तयारीस लागले.

इकडे टारझनने एका झाडावर बसून तो सर्व विधि पाहिला आणि तो मनाशी म्हणाला 'काय हे मूर्ख लोक! ही निव्वळ हाडे! ती कशाला जमिनीत लपवतात?'

'त्यांच्यावर काय मांस आहे तर ती कोणी चोरून नेणार!'

हे अशाप्रकारचे विचार करीत असता टारझनची नजर जेनच्या त्या सुंदर चेहऱ्यावर खिळून राहिली होती. ती तिथून दूर करावी असे त्याला वाटत नव्हते.

पण ते सारे आत निघून जाताच त्याचा निरुपाय झाला. आणि इतक्यात त्याची नजर त्या जहाजाकडे गेली. शिड उभारून ते निघण्याच्या तयारीत होते.

तेव्हा टारझन चटकन त्या समुद्र किनाऱ्याकडे गेला. ते जहाज म्हणजे त्याच्या कौतुकाचा विषय झाले होते. आणि इकडे प्रो. पोर्टर पण जहाजाकडे पहात होते. त्यांना वाटले होते जाताना ते खलाशी

आपणाला भेटतील आणि आपण त्यांना ती आपली पेटी देण्याची विनंती करू. तसे ते जेनला म्हणाले, तेव्हा ती म्हणाली

'बाबा कशाला त्या पेटीची आशा तुम्ही करता? आपणाला काही उणे पडणार नाही. ज्यांनी आपणाला आत्मसंरक्षणाकरिता थोडा दारुगोळा दिला नाही ते का आपणाला तो ऐवज देणार?'

आता या मंडळीची हकिकत अशी होती. प्रो. पोर्टर आपली ही सारी मंडळी बरोबर घेऊन कांगोच्या खोऱ्यात काही संशोधनाकरिता निघाले होते. वाटेत त्या रानटी खलाशांनी संपत्तीच्या लोभाने कप्तानाला मारले. सर्व ऑफिसर्सना मारले आणि समाधानाची गोष्ट ही की या मंडळीना मनुष्य वस्तीपासून दूर असलेल्या या किनाऱ्यावर सोडले. जर त्यानाहि ठार मारले असते तर ते निशस्त्र लोक त्यांचे काय करणार होते?

त्यांच्यामध्ये स्पाईक नावाचा जो खलाशी होता तो फार दुष्ट होता. ज्याला आपण उंदीरतोंड्या म्हटले तोच! आता त्याने किंग नांवाच्या पुढारी खलाशाला मारले आणि ही ॲरो नावाची बोट आपल्या ताब्यात घेतली होती; आणि आता तो अरेराव बनला होता. पण हँडल नांवाचा खलाशी फार शहाणा होता. त्याने इतराना समजावले.

'थांबा! इंग्लंडात गेलो की त्याला पाहून घेऊ. आता आपणाला एकजुटीने काम केले पाहिजे. जे माहितगार खलाशी व अधिकारी होते ते मारले गेले आहेत. तेव्हा थांबा, वाट पहा!' तेव्हा सर्वांनी त्या उंदीरतोंड्याकडे दुर्लक्ष केले; आणि बोट सोडायच्या तयारीला ते लागले. इतक्यात पलीकडे क्षितीजावर त्याना धुराची रेषा दिसू लागली.

'म्हणजे! हें दुसरे एकादे जहाज की काय?' आणि ते आपल्याजवळ आले तर!: तर त्यांना ही आपली धनाची पेटी दिसणार! ती आपणाकडे कशी आली हे ते विचारणार, तेव्हा ही पेटी आपण

किनाऱ्यावर कुठेतरी पुरून ठेवू पण ती पुरताना केबिनमधील लोकांना दिसणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

ह्या वेळपर्यंत ते काय करतात हे टारझन पहात होता. ती धुराची रेषा पण त्याने पाहिली. आज किती तरी नव्या नव्या गोष्टी त्याने पाहिल्या होत्या. आणखी पाहणार होता. किनाऱ्यावरील त्या झाडात तो लपून बसला होता. त्याच दिशेने होडीतून उतरवलेली पेटी घेऊन चार खलाशी येत होते. पेटीच्या वजनाने ते घामाघूम झाले होते.

पेटी खाली ठेवताच त्यानी खड्डा खणावयास सुरवात केली; पण स्पाईक उंदीरतोंड्या त्यांना मदत करीना तेव्हा ते चिडले, कारण तो हुकूम करीत होता.

'ए! तू कुदळ घे. अरे! तू फावडे घे.'

'आणि तू काय करणार?'

'हुकूम! मी जहाजाचा कप्तान आहे.'

'अस्स! तुला पण कुदळ, फावडे घेऊन खणले पाहिजे. म्हणे कप्तान! कोणी रे तुला कप्तान केले?'

'केले कोणीतरी. लौकर खाडा खणा!'

'बरे, खणतो हं!'

आणि हॅटने उचलेली कुदळ काही न बोलता उंदीरतोंड्याच्या डोक्यात घातली. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. स्पाईक पडला; पण त्याच्याकडे कुणीच लक्ष दिले नाही. गेली एकदांची पीडा असे म्हणत सर्वजण एकजुटीने खड्डा खणावयास लागले.

बराच खड्डा खणून होताच त्यानी ती पेटी आत घातली. वर उंदीरतोंड्याचे प्रेत ठेवले. पण वर माती लोटण्यापूर्वी त्यांनी त्याचे खिसे तपासून पाहिले. आणि जे काही मिळाले ते एका खलाशाने खिशांत

घातले. मग त्या खड्डयात माती लोटून पायाने ती माती सारखी करून ते जहाजावर चढले आणि जहाज चालू लागले.

मात्र झाडाच्या फांद्यात बसलेला टारझन म्हणत होता.

'किती हे लोक रानटी अन् क्रूर ! आपल्याच जातभाईला एवढया तेवढया कारणवरून मारतात!' ते जहाज दूर जाताच टारझन आपल्या लपलेल्या जागेतून बाहेर पडला. दुसरे जहाजहि एव्हांना दुरूनच निघून गेले होते. पण ते पाहून टारझनला नवल वाटत होते. कशी ही जहाज पाण्यावर चालतात ?

मग झाडावरून उतरून टारझन जिथे पेटी पुरली होती तिथे गेला. त्यालाहि पहायचे होते आपणाला काही मिळते का ? आणि खरोखर तिथे त्याला एक कुदळ सापडली. हे नवे शस्त्र पाहून त्याला फार आनंद झाला; कारण त्या शस्त्राचा प्रताप त्याने पाहिला होता.

मग तो विचार करीत बसला. हे आहे काय ? केबिनमधल्या लोकांनी ती हाडे पुरली. या लोकांनी ही पेटी पुरली. ह्या काय महत्त्वाच्या वस्तू आहेत ? हे असेच काहीतरी असावे. आणि काही वेळ थांबून त्याने तो खड्डा उकरावयास सुरवात केली. ती माती भुसभुशीत असल्यामुळे आणि खड्डा आताच बुजविला असल्यामुळे त्याने तो खड्डा सहजासहजी उकरला आणि ती पेटी बाहेर काढली. टारझनला ती पेटी अगदी हलकी वाटली. ती आणायला चार माणसे का लागली हे त्याला कळेना.

पेटी बाहेर काढताच त्याने ते उंदीरतोंड्याचे प्रेत पुन्हा आत टाकले व खड्डा बुझवला.

'आणि आता असेच करायचे !' असे म्हणून तो पेटी खांद्यावर घेऊन त्याची डमडम नाचाची जी जागा होती त्या जागी झाडाच्या

फांद्यातून झेपा घेत घेत आला; पण पेटी घेऊन यायचे म्हणजे त्याला फार वेळ लागला.

थोडी विश्रांति घेऊन त्याने ती पेटी उघडण्याचा प्रयत्न केला पण ती उघडेनाच. तेव्हा त्याने ठरवले ही पेटी आता इथेच गाडून ठेवायची.

त्याने खड्डा खणण्यास आरंभ केला तेव्हा त्याला कळले हे काम कठीण आहे. पण एकदां हाती घेतलेले काम टारझन कधीच अर्ध्यावर सोडीत नसे मग शेंडी तुटो की पारंबी तुटो.

टारझनने खड्डा खणून त्यात ती पेटी ठेवली. वर माती लोटली. ती निटनेटकी केली आणि तो पुन्हा केबिनजवळ आला. आत दिवसासारखा प्रकाश होता.

'हे कसे काय ? यानी हा उजेड कोठून आणला ? बाकी ही मानवजात म्हणजे डोकेबाज खरी. पण त्याला कुठे ठाऊक होते की हे सारे कर्तृत्व त्याच्याच वडिलांचे होते.'

वीस वर्षांपूर्वीचा एक बंद तेलाचा डबा त्या केबिनमध्ये होता. व्यवस्थित असे दोन दिवे होते आणि तेच आता क्लेटनने लावले होते.

मग टारझनने आत केबिनमध्ये डोकावून पाहिले. केबिनचे आता दोन भाग केले होते. पुढच्या भागात ते वृद्ध झोपले होते आणि एका कंदिलाशी बसून टारझनचे एक पुस्तक क्लेटन वाचीत होता. ह्या दिव्यांची चित्रे टारझनने आपल्या एका पुस्तकात पाहिली होती पण त्यांचा प्रत्यक्ष उजेड असा आजच त्याने पाहिला; आणि तो थक्क झाला.

नंतर तो दुसऱ्या खिडकीकडे वळला. तिथे त्याच्या टेबलावर बसून जेन काहीतरी लिहित होती. ती काय लिहीत असावी याची त्याला कल्पना होईना. पण त्या सुंदर चेहऱ्याकडे पहात तो तसाच उभा

राहिला. तिला पाहताच आपल्या मनात कसला तरी आनंद, कसली तरी भावना निर्माण होते आहे. पण ते काय? हे त्याला कळत नव्हते.

इतक्यात दिवा मालवून जेन आपल्या गवती बिछान्यावर पडली. एस्मिरेल्डा, ती निग्रो स्त्री, पलिकडेच पडली. ती आधीच घोरत होती. नंतर जेनला पण झोप लागली.

जेनला झोप लागताच टारझनने हात आत घालून ते पत्र हळुच उचलले आणि त्यांची घडी करून त्याने ते आपल्या कमरबंदात खोचले. तो आपल्या माच्यावर आला आणि झोपला.

सकाळी त्याने ते पत्र काढले आणि वाचण्याचा प्रयत्न केला पण त्याला ते वाचता येईना. पण टारझन तो! त्याला अशक्य हा शब्द माहीत नव्हता. दोन तास मेहेनत करताच त्याला ते पत्र वाचता येऊ लागले.

पत्र पुढीलप्रमाणें होते. तिने ते आपल्या एका मैत्रिणीला लिहिले होते.

आफ्रिकेचा पश्चिम किनारा
आफ्रिका

प्रियतम हेजेल,

हे पत्र तुला लिहित आहे ते तुला मिळणार नाही. कारण आम्ही एका अगदी जंगली प्रदेशात येऊन पडलो आहोत पण दोन कारणा-करिता मी हे पत्र लिहित आहे. एकलेपणा जावा म्हणून आणि आम्ही येथेच मेलो, आमची सुटका झाली नाही तर कुणाला तरी हे पत्र मिळेल आणि आमची हकिकत कळेल.

माझ्या बाबांना संशोधनाची आवड आहे. कोणत्याहि विषयात संशोधन करायचे म्हणजे त्यांचा पाय पुढे असतो.

कोणी तरी त्यांना एका पिता-पुत्राची गोष्ट सांगितली. कांगोच्या खोऱ्यात सोने बरेच आहे अशी त्या पित्याला बातमी लागली होती. पण त्याच्या हातून ती गोष्ट सिद्धीस जाणे शक्य नव्हते. पण बरीच वर्षे झाली तरी त्याचा तो ध्यास कमी झाला नव्हता.

शेवटी ही गोष्ट त्याने पत्राने आपल्या मुलाला कळवली. त्या पत्रात त्या खजिन्याचा त्याने अगदी बारकाईने इतिहास लिहिला होता. जागा, जागेचा नकाशा सारे काही त्याने मुलाला लिहिले होते आणि त्या पत्रात नकाशा पण घातला होता.

पुढे त्याचे काय झाले हे कोणाला माहित नाही. पण काही वर्षांनी ते पत्र आणि नकाशा एका माणसाच्या हाती लागला. त्याने एक जुने पुस्तक आणले. त्याच्या कव्हरात ते पत्र होते. मागून कळले की त्या गृहस्थाचा मुलगा एका पुस्तकाच्या दुकानात नोकरीला होता. त्यानेच ते पत्र चुकून त्या पुस्तकात ठेवले असावे.

काही असो, माझ्या वडिलांनी कित्येक हजार डॉलर्स देऊन ते पत्र घेतले पण नकाशा मिळाला नव्हता तेव्हा रॉबर्ट केनलर नावाच्या माणसाचे कर्ज काढून त्यांनी तो नकाशा मिळविला. किती पैसे काढले ठाऊक आहे तुला? दहा हजार डॉलर्स. आणि तारण त्याने घेतले नाही. कदाचित् पैशाच्या मोबदल्यात तो माझी मागणी करील! पण सांगू तुला, त्याला पाहिले की मला भयंकर चीड येते.

आमच्याबरोबर जॉन क्लेटन नावाचा तरुण आला आहे. एका सरदाराचा तो पुत्र आहे. मला तो आवडतो पण हे इंग्रज सरदार आम्हा अमेरिकनांना तुच्छ मानणारे असतात. आणि माझे माझ्या प्रिय अमेरिकेवर किती प्रेम आहे हे तुला ठाऊक आहेच. पण आजच या गोष्टी कशाला?

पण माझ्या वडिलांची कमाल हो! त्यांनी तो नकाशा पुन्हा तयार

केला. ते बेट केपव्हर्ड बेटांपैकीच होते. आम्ही तिथे गेलो. ती खजिन्याची मजबूतपणे बांधलेली पेटी बाबांना सापडली. आम्ही पुन्हा अमेरिकेला, आपल्या बालटीमूरला यायला निघालो.

आणि तिसऱ्याच दिवशी पेटीच्या लोभाने बोटीवरील खलाशांनी बंड केले. सारे आफिसर्स मारले. आणि आम्हाला न मारता या निर्जन बेटावर सोडले आहे. त्यांच्यापैकी किंग नावाचा जो खलाशी होता तो थोडा बरा होता; पण स्पाईक नावाच्या उंदीरतोंड्याने त्याला मारले आणि तो खजिना घेऊन ते गेले. आम्ही एका निर्जन वाघासिंहांनी भरलेल्या अरण्यात पडलो आहोत.

पण देवदयेने आम्हाला त्या जंगलात राहाणारा एक माणूस भेटला आहे. तो आमचा मित्र बनला आहे. मि. क्लेटनला त्याने दोनदा वाघासिंहाच्या तोंडून वाचवलेय. बाबांना व मि. फिलँडरना एकदा सिंहाच्या तोंडातून वाचवून आणून पोहोचवलेय. नाहीतर त्या रानांत त्यांचे काय झाले असते ?

आणि मला आणि एस्मिरेल्डालाही सिंहिणीच्या तोंडातून वाचवले. असा आहे हा शूर वीर. आणखी काय सांगू तुला. फारसे खाण्याचे पदार्थ त्यांनी आमच्याकरिता ठेवलेच नाहीत आणि बंदुक किंवा पिस्तुलातील काडतुसे नसल्यामुळे पशुपक्षी मारणे पण शक्य नाही. पिस्तुलात सुद्धा तीनच गोळ्या आहेत. तेव्हा खाण्याचे हालच. से. फिलँडर म्हणतात इथे कंदमुळे, फळे, द्राक्षे, केळी आहेत. त्यावर आपले चालेल आणि समुद्रात मासे पण आहेत.

आणि कळले का आम्ही ज्या केबिनमध्ये राहतो त्या केबिनचा एक मालक आहे. पण आम्ही त्याला पाहिलेले नाही. त्याची ती मौजेची नोटीस मात्र वाचली.

'ही केबिन टारझनची आहे. आतील वस्तु व्यवस्थित ठेवा. टारझन पहारा करीत आहे.' आणि खाली सही आहे. टारझन ऑफ द एप. काय याचा अर्थ. पण आम्ही कुणीच त्याला पाहिलेले नाहीं. आमच्या स्वाधीन केबिन करून तो कुठें राहतो कोण जाणे ?

तुझी जेन पोर्टर.

ते पत्र वाचून टारझन विचारांत पडला.

म्हणजे ! मी कोण हे त्यांना ठाऊकच नाही. पण ते त्यांना कळले पाहिंजे आणि जेनच्या सहीखाली त्याने सही केली. टारझन ऑफ दी एप.

दोन तीन दिवस झाले. जेनचे पत्र हरवले होते. तिने पुष्कळ शोधले पण तिला ते मिळत नव्हते पण आज एकाएकी ते मिळाले आणि तिने खालची सही पाहिली आणि तिचे अंग शहारले. तिला भय वाटले आणि तिने ते पत्र क्लेटनला दाखवून म्हटले मला त्याची भीति वाटते. त्याचा माझ्यावर सतत पहारा असावा.

'घाबरण्याचे कारण नाही मिस् पोर्टर, तो आपला मित्र आहे. रोज तो आपणासाठीं शिकार आणून दाराशी ठेवतो. कधी हरिण, तर कधी डुक्कर तर कधी मोंगाच्या खेड्यांतले शिजलेले अन्न ! कधी केळ्यांच्या पोळ्या. इतका तो आपणासाठी करतो. त्याला भिण्याचे कारण काय ?'

आणि टारझन स्वतःशी ठरवीत होता. एक दिवस दुपारीं त्यांच्या केबिनमध्ये जायचे त्यांना भेटायचे पण अजून ते त्याला जमलें नव्हते.

पण एक मात्र खरे. त्या मंडळीकरिता शिकार करण्यात त्या सुंदर मुलीला खुष करण्यात त्याला सुख वाटत होते.

अलिकडे ही माणसे मात्र जंगलात दूर दूर जाऊन फळे शोधित. एक दिवस प्रोफेसर, फिलँडर आणि सेसिल क्लेटन असेच जंगलात गेले होते. एकाच जागी बसून, कंटाळलेली जेन एस्मिरेल्डाला घेऊन

रानात फळेमुळे शोधायला बाहेर पडली होती. टारझनचे संरक्षण असल्यामुळे ही मंडळी रानात आता दूरवर जाऊं लागली होती.

आणि याचवेळी टारझन केबिनच्या दाराशी आला; पण केबिन बंद होती. त्यांना भेटायचेच म्हणून टारझन दाराशी उभा राहिला. त्याने बरीच वाट पाहिली. तो अतिशय कंटाळला पण परतून जाण्याची कल्पना त्याच्या त्या प्रेमवेड्या मनाला पटेना. तिच्याकडे पाहण्यास, तिच्याशी बोलण्यास, तिच्या हाताला स्पर्श करण्यास त्याचा जीव आसुसला होता. आणि ती परत येत नव्हती !

मग टारझनने एक कागद घेतला आणि सुंदर अक्षरात तिला एक पत्र लिहित बसला.

प्रिय जेन,

तुला भेटायला मी आलो होतो. तुझ्याबरोबर बोलावे, तुझ्याबरोबर हसावे, खेळावे, असे मला फार वाटते. एका घरात, माझ्या या चिमुकल्या घरात आपण दोघांनी रहावे. एकत्र जीवन घालवावे असे मला फार वाटते. मी तुझ्यावर प्रेम करतो, जेन तू पण माझ्यावर प्रेम करशील ना ?

टारझन ऑफ दी एप.

सही करून त्याने त्या पत्राची घडी केली आणि तो जेनची वाट पाहू लागला; पण जेन आली नाही.

मग त्याच्या मनात आले हे पत्र इथेच कुठे ठेवून जावे काय ? की तिच्या हातात देण्याकरितां थांबावे ? पण निश्चित काही ठरेना.

टारझनने लिहिलेले हे पहिले प्रेमपत्र होते.

इतक्यात टारझनच्या कानी कसली तरी चाहूल आली. अगदी दुरून ! एखाद्या वानराची तर ही चाहूल नव्हे ! आणि तिच्या पाठोपाठ एका स्त्रीची किंकाळी. जेनची काय ? आणि या कल्पनेचा स्पर्श त्याच्या

प्रेमळ मनाला होताच तो तीरासारखा निघाला. त्याचे ते प्रेमपत्र तिथेच कुठे तरी पडले.

टारझनप्रमाणे क्लेटनने पण ती किंकाळी ऐकली होती. झपाट्याने तो केबिनकडे परत आला. पण केबिन बंद होती.

'ही गेली तरी कुठे?' तो तसाच निघाला आणि परतून येणारे प्रो. पोर्टर आणि फिलँडर त्याला भेटले. त्यांना तो म्हणाला,

'तुम्ही आता केबिनमध्ये जा. ती परतून आली तर कुणीतरी तिथे पाहिजे. मी तिला शोधतो.' आणि तो तीरासारखा निघाला.

तो बराच लांब गेला. जेनला हाका मारीत गेला. पण त्याच्या एकाही हाकेला साद मिळाली नाही आणि जरा पुढे जाताच जमिनीवर उताणी पडलेली एस्मिरेल्डा त्याला दिसली. जवळ जाऊन त्याने तिला हलवले. तिच्या छातीला कान लावला ती मेली नव्हती. तो तिच्या कानांत मोठ्याने ओरडला. 'एस्मिरेल्डा! एस्मिरेल्डा!'

एस्मिरेल्डाने डोळे उघडले.

'जागी हो! मी क्लेटन आहे.'

ती जागी झाली आणि क्लेटनला पाहून म्हणाली, 'डॉ. गॅब्रिएल, गॅब्रिएल!'

'सांग सांग! एस्मिरेल्डा सांग! जेन कुठे आहे?'

बावरलेली ती अडाणी बाई काय सांगणार? तिच्या बडबडीत मोठ्या वानराचा काहीतरी संबंध होता. निशस्त्र क्लेटन त्या रानटी प्रदेशात काय करणार? एस्मिरेल्डाला घेऊन तो परतला.

जेनला एका वानराने पळवली हे ऐकून म्हातारा खालीच कोसळला. फिलँडरने सावरले म्हणून बरे.

माझी लाडकी जेन गेली; आता मी जगणार नाही. जीवनातला माझा तोच एक आधार होता. माझा आनंद होता. तिच्याकरिताच मी

जगलो आहे. ती मेली. गोरिल्याच्या हातून ती कशी सुटणार? कशी जीवंत राहणार? सकाळ उजाडताच मी तिच्या शोधाला निघणार!

'मी पण येणार!' क्लेटन म्हणाला.

'तू कशाला येणार? माझी ती मुलगी आहे. मी एकटाच जाणार. तिला शोधणार. ती मिळाली नाही तर तिच्या मार्गाने जाणार. रानात आम्ही दोघे शेजारी शेजारी झोपणार. तिच्या आईने तिला माझ्या स्वाधीन केली आहे. तिला कळेल की मी माझ्या छोट्या जेनला शेवट-पर्यंत सोडले नाही. आम्ही उन्हात, पावसात थंडीत एकत्र असू. तीच झाडे, पाने, फुले आमच्यावर सावली धरतील. एकच पाऊस आमच्या-वर पडेल.'

ते ऐकून सर्वांच्या डोळ्यांना पाणी आले. त्यांना पटले की प्रोफेसर आता लेकीच्या शोधाला बाहेर पडले की परतणार नाहीत. तेव्हा क्लेटन म्हणाला, 'प्रोफेसर मी पण येणार. जेथे जेन व तुम्ही तेथे मी!'

चमकून प्रोफेसरांनीं त्याच्याकडे पाहिले. आणि आज प्रथमच त्यांना कळले की या इंग्रज तरुणाचे माझ्या जेनवर प्रेम आहे.

से. फिलँडर म्हणाला, 'प्रो. पोर्टर मी पण येणार. ते माझे कर्तव्य आहे. बरे आता रात्र आहे! केवढा अंधार दाटलाय! आपण सकाळी न्याहारी करून निघू.'

'आता थोडी झोप मिळेल तर पाहू.'

# स त रा

**टारझनच्या** मागून टरकॉझ वानराचा राजा झाला; पण राजाचे गुण त्याच्या अंगी नव्हते. तो अतिशय शिरजोर होता. क्रूर आणि मत्सरी होता. सर्वांना तो नकोसा झाला होता. काय करावे हे त्यांना कळत नव्हते. काही दुबळे व म्हातारे आपली टोळी सोडून दूर जंगलात निघून गेले होते; पण शिरजोराचे राज्य फार दिवस टिकत नाही.

त्यांच्यामध्ये एक बुद्धिमान वानर होता. त्याला टारझनने जाताना सांगितलेले शब्द आठवले. राजा जर अत्याचारी असला, प्रजेचे नीट पालन करीत नसला, फार बलवान् असला तर चार पाच जणांनी त्याचा प्रतिकार करावा. त्याला धडा शिकवावा.'

ह्या गोष्टीची आठवण त्या वानराने इतर चार पांच वानरांना करून दिली. त्यांना पण ते पटले आणि टरकॉश येताच त्याच्यावर एकजुटीने हल्ला करण्याचे त्यांनी ठरवले. दुपारी कुठूनसा अरेरावी करीत टरकॉझ आला. आणि या चौघांनी त्याच्यावर हल्ला चढवला. टरकॉझचे त्या चौघा बलवान् वानरांपुढे काय चालणार! अरेरावी माणसे काय की पशु काय स्वभावत: भितरी असतात. टरकॉझ तसाच होता. तो तेथून

पळून गेला. पुन्हा परत न येण्याकरिता.

पण तो अतिशय संतापला होता. आपला राग कुणावर तरी काढावा असे त्याला वाटत होते; पण काढणार कुणावर ? तसाच तो झाडां-झाडांवरून झेपा घेत केबिनच्या रस्त्याला लागला आणि बरोबर एका झाडाखाली त्याला ती काळी एस्मिरेल्डा आणि गोरी जेन दिसली.

मग काय त्याने झाडावरून जी उडी मारली ती जेनच्या शेजारी !

जेनने त्या आक्राळविक्राळ वानराला पाहाताच भयाने किंकाळी फोडली आणि एस्मिरेल्डा बेशुद्ध पडली; पण हे तिचे नेहमीचेच होते.

टरकॉझला प्रथम वाटले तिचा तो नाजूक गळा फोडावा आणि तिचे ते सुंदर रक्त प्यावं; पण मागून त्याने आपला बेत फिरवला. त्याच्या सर्व बायका त्याच्या वसाहतीत मागे राहिल्या होत्या. त्याला बायको हवी होती.

'आ ! हीच माझी पहिली बायको.' तो मनांत म्हणाला आणि झाडावरून उड्या घेत पळू लागला.

त्याच्या खरखरीत अंगाचा स्पर्श तिला होत होता.त्याच्या अंगाचा वास' तोंडाचा घाणेरडा वास याने तिला शिसारी आली होती; पण उपाय नव्हता. त्याचे ते भयंकर पिवळे दात, लालबुंद डोळे तिला अगदी नकोसे झाले होते. आतांच प्राण जाईल तर बरे असे तिला वाटत होते, पण मरण काय कुणाच्या हाती असते. आणि टरकॉझचा प्रवास चाललाच होता.

सकाळ झाली. तिघांनी जेनला शोधावयास जाण्याची तयारी केली आणि इतक्यात क्लेटनच्या कानी बंदुकीचा आवाज ( Gun shot ) आला. धावत धावत तो बाहेर आला, तो समुद्रात त्याला दोन जहाजे दिसली. पळत पळत तो किनाऱ्यावर गेला. सारेजण त्याच्या मागे धावले. जहाजे किनाऱ्यापासून दूर होती. क्लेटनने आपला पांढरा शर्ट काढून हवेत उडवला. एस्मिरेल्डाने आपला तांबडा फ्रॉक हवेत उडवला. पण

कुणाचेच तिथे लक्ष गेले नाही. दोनही जहाजे तोंड वळवून जाण्याच्या तयारीत होती. तोच क्लेटनने धावत जाऊन जहाजाला निशाणी दाखवण्याकरिता त्याने गवत-बिवत घालून जो सुक्या लाकडांचा ढीग घातला होता त्याला दहाबारा ठिकाणी आग लावून दिली आणि धुराचा लोट हवेत उंच जाऊ लागला. सुदैवाने तो धूर एका ऑफिसरला दिसला. त्याने एकदम जहाज थांबविण्याची सूचना दिली आणि आपली दुर्बिण डोळ्यांना लावली. तोच त्याला किनाऱ्यावरील ही माणसे दिसली. लागलीच एक होडी समुद्रात सोडण्यात आली. आणि तो अधिकारी आणि एक दोन खलाशी किनाऱ्यावर आले. अधिकाऱ्याने क्लेटनला पहाताच विचारले.

' मि. क्लेटन ! आणि इथे ? '

मग आपली थोडी हकिकत सांगून तो म्हणाला, हे ' प्रोफेसर आर्किमिडिज डी. पोर्टर आणि त्यांचे सेक्रेटरी मि. फिलँडर दोघेहि मोठे संशोधक आहेत. मी यांच्या बरोबरच आलो. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे यांची मुलगी जेन पोर्टर जंगलांत काल हरवली आहे. जीवंत की मेली काही कळत नाही. कारण हिंस्र पशूंनीं भरलेले हे जंगल आम्ही निशस्त्र ! रात्रीच्या अंधारांत काय करणार ? पण आम्ही आताच तिच्या शोधाला निघणार होतो.'

' हे ऐकून मला फार वाईट वाटले. मी क्लेटन, प्रोफेसर, आम्ही तुम्हाला वाटेल ती मदत करू. आमच्याकडे माणसे आहेत. दारुगोळा आहे. तुम्ही काळजी करू नका.'

आणि तो बोटीवर परतून गेला. आणि जहाजाचा अधिकारी (कमांडर) याला त्याने सर्व हकिकत सांगितली. आपले काही अधिकारी घेऊन कमांडर किनाऱ्यावर आला.

ओळख समारंभ आटोपताच कमांडर म्हणाले,

'प्रो. पोर्टर मी तुमची मुलगी शोधून काढीन.'

कमांडरने सांगताच वीस फ्रेंच तरुण पुढे सरसावले. त्यात दोन अधिकारी पण होते. लेफ्टनंट डी. अरनॉट आणि लेफ्टनंट कारपेन्टर. दारुगोळा, खाद्यपदार्थ व इतर शस्त्रे आणण्याकरिता जहाजावर होड्या पाठविण्यात आल्या. प्रत्येकाच्या जवळ त्याचे पिस्तुल होतेच.

अर्ध्या तासांत ते सारे सिद्ध होऊन जेन पोर्टरला शोधण्याच्या मोहिमेवर निघाले.

प्रो. प्रोर्टर व से. फिलँडरला त्यांनी बरोबर घेतले नाही. मदती-ऐवजी त्यांचा त्यांना त्रासच फार झाला असता.

केबिन सोडून टारझन निघाला. चोहोबाजूला त्याने नजर टाकली व काहीतरी निश्चय करून एका मार्गाने तो निघाला. थोडा मार्ग आक्रमताच त्याला वाटेत पडलेली एस्मिरेल्डा दिसली. ती जीवंत आहे अशी खातरी होताच तो पुढे निघाला. जाताना तो नाकाने वास घेत जात होता. झाडाझुडपांकडे निरखून पहात होता. पाहतां पाहातां त्याला कळले 'चोर इथून गेला' मग तो त्याच्या मार्गावर निघाला.

वासाचा अंदाज घेत, पावलाचा अंदाज घेत, त्याने एका झाडावर उडी मारली. तिथे थोडे खरपटले होते. पहिल्या पावलाची ती खूण होती. टारझनला बारकाईने पाहिले की पंजाची खूण कोणती पावले कोणत्या बाजूला वळली आहेत हे सारे सारे कळे. अशा तऱ्हेने अंदाज घेत तो पुढे पुढे जात होता. आणि तो एका जागी आला. शत्रु कोणत्या बाजूला वळला हे त्याला कळेना पण वरच्या फांदीवर एक किडा चिरडला गेलेला त्याला आढळला. 'हं! इथूनच गेलाय हा चोर!' आणि टारझन त्या मार्गाने जाऊ लागला. आता तो जवळजवळ दोन मैल आला होता. पण शत्रु कुठेच दिसेना. टारझनला वाटले 'कुठे

गेला हा?' आणि वासावरून त्याला कळले 'सांपडला, जवळच कुठेतरी आहे. आता पहातो.'

आणि टारझन अगदी वेगाने निघाला आणि थोड्याच वेळात त्याने त्याला गाठले. तो टरकॉझ होता. आणि त्याच्या खांद्यावर जेन पोर्टर होती. टारझनचे डोळे ते दृश्य पाहून खदिरांगारासारखे लाल झाले.

'हं! तू काय तो!' त्याने वानरी भाषेत विचारले.

'होय! पण तुझ्याशी लढण्यात मला आनंद वाटेल.'

'पूर्वीच्या लढाया विसरलास असे दिसते?' टारझन खवळून म्हणाला.

आणि ते दोघे काय गुरगुरतात हे जेनला मुळीच कळले नाही.

पण टरकॉझला फार आनंद झाला. टारझन हा बिन केसांचा वानर आहे. ही पण बिनकेसांची वानरी आहे. दोघेजण एका जातीचे. तेव्हा टारझनची मैत्रिण (MATE) असावी आणि तिला चोरून आणणे म्हणजे केवढा पुरुषार्थ. आणि यामुळे टारझनचा इतक्या दिवसाचा सूड पण उगवल्यासारखे होईल.

तिला बाजूला सारून टारकॉझ त्याच्या अंगावर धावला. टारझनने पण पवित्रा घेतला. आणि एका मोठ्या झाडाला टेकून जेन ते युद्ध पाहू लागली. पण तिचे मन भीतीने कापत होते.

ते जेव्हा एकमेकांना भिडले तेव्हा जेनची भीतीने गाळण उडाली. टरकॉझ टारझनच्या गळ्यांत आपले तीक्ष्ण सुळे खुपसण्याचा प्रयत्न करीत होता आणि टारझन तितक्याच चपळाईने त्याचा प्रतिकार करून त्याला मारीत होता. आणि हे पाहिले की तिचा उर अभिमानाने, कौतुकाने भरून येत होता.

बराच वेळ झुंजल्यावर हाताने काम होईना असे पाहताच टारझनने आपला पितृदत्त विजयी सुरा काढला. आणि पहिला घाव घातला तो त्याच्या खांद्यावर, दुसरा घाव छातीवर पडला. रक्ताच्या धारा वाहू



टारझनने आपला पितृदत्त विजयी सुरा काढला आणि पहिला घाव घातला.

लागल्या आणि आणखी चार घाव बसताच टरकॉझ कोसळून खाली पडला. त्याच्या अंगावर पाय देऊन टारझन उभा राहिला पण त्याने आपली ती विजयी गर्जना चटकन आवरली. आणि तो जेनकडे वळला. पूर्वीच्या एखाद्या राजकन्येने किंवा वीर रमणीने जसे आपल्या वीराचे स्वागत केले असते तसेच तिने केले. हात पुढे करून ती पुढे सरली. आणि प्राचीन वीराप्रमाणें टारझनने तिला आपल्या बाहुपाशांत धरून तिच्या थरथरत्या ओठावर अनेकवार आपले ओठ टेकले.

आणि मग जेनला काय वाटले कोण जाणे ? रागाने तिने टारझनला मागे ढकलले तिला हा त्याचा अतिक्रम वाटला काय ? पण अशा वेळीं प्राचीन वीराने जे केले असते तेच त्याने केले. त्याने तिला युद्धात जिंकली होती. आता ती त्याची होती. पुन्हा त्याने तिला आपल्याजवळ ओढले आणि त्याच्या रुंद छातीवर तिने आपल्या नाजूक मुठीने बुक्के मारले. टारझन मात्र थोडासा हंसला. तिची वृत्ति त्याला ओळखता आलीच नाही. पण त्या भानगडींत तो पडलाच नाहीं.

प्रथम त्याने असा विचार केला होता की तिला सोडविताच तिला केबिनमध्यें तिच्या माणसांत सोडायची पण आता त्याने तो बेत बदलला.

त्याला थोडा रागहि आला होता. तिला आपल्या छातीशीं घट्ट धरून तो झटपट विरुद्ध दिशेला निघाला. कायद्याने ही आपली असता हिला काय म्हणून सोडायची ? आणि आता त्याच्या बहुपाशात असताना तिला फार आनंद वाटत होता. तोच एक आपला संरक्षक आहे असे तिला वाटले. हेच का प्रेम ? आणि तसे असेल तर तिच्या मनात टारझनबद्दल प्रेम निर्माण झाले होते. तिला आपल्या छातीशी एका हाताने धरून तो फांद्यावरून झेपा घेत असता ती हळुच त्याच्या त्या सुंदर चेहऱ्याकडे पहात होती. त्याला बिलगत होती मधुनच स्मित

करीत होती आणि याच वेळी त्याच्या त्या सुंदर चेहऱ्यावर आनंदाचे स्मित चमकत होते.

काही वेळाने वानरांचे जिथे डमडम नृत्य होते, जिथे ते मातीचे नगारे होते तिथे त्या एकांत जागी तो आला. ही जागा एकांतच नव्हे; पण सुरक्षित होती. छोट्या छोट्या टेकड्यांनी वेढलेली होती. आणि मोठ्या दाट वृक्षांनी, वेलीच्या जाळ्यांनी आच्छादलेली होती. पण या एकांतातहि जेनला टारझनचे भय वाटले नाही. त्याने तिला खाली ठेवताच तिच्या डोळ्यात पाहिले. तो हंसला आणि तिने खाली मान घातली.

ती एका नगाऱ्याच्या काठावर बसली. टारझन पण तिच्या शेजारी बसला. तिने त्याच्या गळ्यातल्या हिरेजडित पदकाकडे पाहिले. त्याने ते काढून तिच्या हाती दिले. तिने ते हातांत घेऊन नीट निरखून पाहिले तेव्हा तिला कळले की ते उघडतां येईल. आणि तिने क्लिप दाबून ते उघडले. पदकाच्या दोन फुलांत दोघांचे लहान लहान फोटो होते. एक स्त्री व एक पुरुष! दोघेहि अत्यंत देखणी होती. तिला नवल वाटले आणि ती मनांत म्हणाली, ‘ हे फोटो, हे पदक याच्या-कडे कसे? हे याला रानात मिळाले की काय?’

टारझनहिं त्या फोटोकडे नवलाने पहात होता. हे आपले जन्मदाते आईबाप आहेत याची त्याला किंचित्‌हि कल्पना नव्हती. काला त्याची आई होती. बाप कोण हे ठाऊक नव्हते आणि कळणे शक्यहि नव्हते पण काला कितीहि विद्रुप असली तरी त्याच्या प्रेमळ दृष्टीला ती सुंदरच दिसायची. तिनेहि त्याला फार प्रेमाने वाढवले होते.

इतक्यात त्याने ती आपली बाणांची पिशवी रिकामी केली आणि तिच्या तळाशी असलेली एक पेटी काढली. त्या पेटीतला फोटो त्याने बाहेर काढला व तिच्या हाती दिला. तो फोटो एका सुंदर

पुरुषाचा होता. तो उणापुरा उंच होता. त्याच्या तोंडावर हास्य विलसत होते आणि थोड्या वेळाने तिला वाटले, दोघांच्यात म्हणजे टारझन व तो फोटो यात थोडे साम्य आहे. हे कसे याचा तिला उलगडा होईना. नंतर तिने तो फोटो त्याला परत दिला आणि त्याने तो काळजीपूर्वक आपल्या पिशवीत ठेवला.

आणि नंतर झाडाच्या फांदीत उडी मारून तो कुठेतरी निघून गेला. तिला त्या एकांत जागी ठेवून, तिला एकटीला ठेवून निघून गेला. भीतीने तिची तारांवळ उडाली. आणि तिला वाटले त्या लांब सुळ्यांना आपण बळी पडलो असतो तरी बरे झाले असते. आता हा परत न आला तर? आणि भीत भीत तिने सभोवार पाहिले. आणि देवाची मनोभावाने प्रार्थना केली.

बराच वेळ झाला पण टारझन अद्यापि आला नव्हता. आणि युगेच्या युग जात आहेत असे जेनला वाटले होते. प्रत्येक झाडा-झुडुपात हिंस्र पशु लपून बसले आहेत. एकदम ते आपणावर हल्ला करतील आणि याचवेळी मागच्या झुडुपात खसखस झाली आणि तिने उठून दचकून मागे पाहिले. मरणाला तोंड द्यायला ती सिद्ध झाली होती. आणि फळामुळाने ज्याचे हात भरले आहेत तो टारझन तिला दिसला.

जेन पोर्टरची झोकांडी गेली आणि ती खाली पडलीच असती पण टारझनने हातातील फळे खाली टाकून तिला आपल्या बाहुपाशात पकडली. ती बेशुद्ध पडली नाही. पण त्याला घट्ट बिलगली–एखाद्या घाबरलेल्या हरिणीप्रमाणे.

त्याने पण तिला आपल्या हृदयाशी घट्ट धरली आणि तिच्या केसावर हात फिरवू लागला. तिच्या केसाची चुंबने घेतली आणि तिला किती तरी दिलासा मिळाल्याप्रमाणे वाटले.

आपल्या भावनांची चांचणी ती करू शकत नव्हती. तसा तिने प्रयत्नहि केला नाही; पण त्याच्या बळकट बाहुपाशात तिला समाधान वाटत होते. निरतिशय सुख वाटत होते.

आणि अगदी मंद स्मित करीत तिने त्याला बाजूला ढकलल्यासारखे केले आणि मग अर्धवट हंसत लाजाळु कटाक्ष त्याच्याकडे फेकीत तिने आपल्या पायाजवळच्या फळाकडे बोट दाखविले. ती रसाळ सुंदर फळे त्याने तिच्यासाठीच आणली होती. तो तिच्या शेजारी बसताच ती पुन्हा हसली. त्याने ती फळे पुढे ओढली व त्यातील चांगली चांगली फळे निवडून तो सुरीने कापून तिला देऊ लागला आणि खाता खाता तिने सुचवले ' तू पण खा. '

थोड्या वेळाने तो पुन्हां कुठे तरी निघून गेला; पण आता तिला भय वाटले नाही. तो पुन्हा येणार असा विश्वास तिला वाटत होता. आणि त्याप्रमाणे तो आला. यावेळी त्याच्या हातात झाडाच्या लहान लहान फांद्या, मऊसर गवत व हत्तीचे कान नावाची काही मोठी पाने होती आणि पूर्वीसारखाच तो तिच्या मागच्या बाजूने आला पण ती आता घाबरली नाही.

नंतर त्याने एक फांद्याचा आडोसा तयार केला. छोटी झोपडीच म्हणा ना. आणि फांद्या त्यावर मऊ मऊ गवत व हत्तीची पाने पसरून एक बिछाना तयार केला.

अंधार पडू लागताच त्यांनी उरलेली फळे पुन्हा खाल्ली आणि त्याने खुणेने सुचवले 'आंत जा' पण ती तशीच उभी राहिली.

तिच्या तोंडाकडे पाहताच टारझन समजला आणि मॅनातला सुरा काढून त्याने तिच्यापुढे केला. तिने तो आपल्या हातात घेतला आणि ती त्या निवाऱ्यात शिरली.

झोपडीबाहेर टारझन गवतावर पडला आणि लौकरच झोपी गेला.

जेनला मात्र झोप येत नव्हती. तिला तो दुपारचा प्रसंग आठवला आणि तो एका तरुण पुरुषाचा फोटो पण आठवला. मागे त्याच्यावर नाव होते लॉर्ड ग्रेस्टोक पण हा फोटो याच्याजवळ कसा ? आणि याने तो इतका जपून का ठेवला आहे? आणि त्याच्यात म्हणजे टारझनमध्ये आणि त्या फोटोमध्ये इतके साम्य कसे ?

नंतर तिने ठरवले लॉर्ड ग्रेस्टोकचा आणि याचा काही संबंध नाही. त्याला तो फोटो केबिनमध्ये सापडला असावा तसेच हे पदक. त्याच्याशी पण त्याचा संबंध नाही. साम्य आहे ही उगाच आमची कल्पना.

हा निर्णय घेताच तिला पण गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेन उठली. तिने झोपडीच्या बाहेर पाहिले पण टारझन तिथे नव्हता. तो कुठे तरी गेला होता; पण थोड्याच वेळात तो फळे घेऊन परतला. दोघांनीहि एकमेकांना पाहताच दोघांचे चेहरे हास्याने उजळले.

फळे खाऊन होताच जेनने आपल्या गळ्यातले लॉकेट काढले आणि ती ते त्याला परत देऊ लागली पण तिचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन त्याने सुचवले, 'अहं परत देऊ नकोस' आणि तिच्या हातातले लॉकेट घेऊन त्याने ते तिच्या गळ्यात घातले. तिने गुडघे टेकून त्याला वंदन केले. त्याने पण तिच्यापुढे गुडघे टेकून तिच्या हाताचे चुंबन घेतले. जणू काय त्याच्या वंशजाचे रक्त उसळून येऊन त्याने ती कृति केली होती.

आता काय करायचे हे तिला कळेना. तो आपणाला केबिनमध्ये पोहोचवणार की इथेच ठेवणार ? पण त्याने खुणेने तिला आपल्या मागे बोलावले आणि एका हाताने तिला उचलून त्याने झाडात झेप घेतली आणि तिने आपले दोन्ही हात त्याच्या गळ्याभोवती टाकले. झाडा-

झाडावरून तो उड्या घेत होता पण तिच्या शरीराचा स्पर्श त्याला सुखवीत होता. हा क्षण सरूच नये असे त्याला वाटत होते आणि तिला पण तसेच वाटत होते. त्याकरिता वाटेत दोनदा ते फळे खावयास थांबले. एकदा एक तास नदीच्या काठी पाणी प्यावयास थांबले. तिच्या सहवासा-करिता टारझन हा वेळ काढीत होता. पण शेवटी संध्या-काळच्या वेळी ते केबिनजवळ येऊन पोहोचले; जेन त्याला केबिनमध्ये बोलावीत होती आणि तो नाकारीत होता.

लांब वाढलेल्या गवतांत ते दोघे उभे होते. टारझनने तिला घेतले पण चुंबन घ्यावे की काय हे त्याला कळेना. त्याने तिच्याकडे पाहिले आणि त्याच्या गळ्यांत हात टाकून ती म्हणाली, 'मी तुझ्यावर प्रेम करते. आणि तिने त्याचे दीर्घ चुंबन घेतले. टारझनने पण तसेच केले आणि तो झोपडीत दिसेनासा झाला.

जेन मोठ्या कष्टाने केबिनकडे वळली. प्रथम तिला पाहिले ते से. फिलॉंडरने नंतर प्रोफेसर व एस्मिरेल्डा यांनी.

सर्वांनी तिच्यावर प्रश्नांचा भडिमार केला पण त्यांच्याइतक्या प्रश्नांना ती उत्तरे कशी देणार?

आणि मग टारझनवर स्तुति सुमनांचा वर्षाव करीत त्यांना घडली होती तशी तिने हकिगत सांगितली. पण तिच्या दृष्टीने तो टारझन केबिनचा मालक नव्हता. तर वनांतला देव होता. तिचा वनदेव होता.

● ● ●

# अठरा

## अत्याचारी खेडे

**जेनच्या** शोधाला निघालेल्या टोळीने दाट अरण्यांत जाऊन झुडूप न् झुडूप, वेलीची प्रत्येक जाळी शोधली पण जेनचे प्रेतसुद्धा त्यांना सापडले नाहीं. हिंस्र पशु, नरमांसभक्षक माणसे यांच्या प्रदेशात आणखी काय घडणार?

नंतर त्यांना त्या रानात एक मोकळा मार्ग सांपडला. त्या मार्गाने ते वीसजण निघाले. डी अरनॉट सर्वांच्या पुढें होता. बाकीचे शंभर यार्डावर मागे होते. आणि कल्पना नसताना दहाबारा काळ्या वीरांनी (मोंगा) डी. अरनॉटला वेढले. त्याला पिस्तूल झाडायलाहि वेळ मिळाला नाहीं. डी. अरनॉटने आपल्या अनुचरांना हाक मारली ती त्यांनी ऐकली पण; पण त्याला मदत करायला ते त्या जागीं वेळेवर पोहोचू शकले नाहीत; आणि जेव्हा ते आले तेव्हा त्यांच्यावर बाणांचा वर्षाव झाला. मग त्या टोळीने पण त्यांच्यावर गोळयांचा वर्षाव केला. पण गोरे लोक फार थोडे होते. त्यांतले सहा मारले गेले आणि काही जखमी झाले.

आणि याच वेळी गोळीबारापुढे आपले काही चालत नाहीं असे पाहून काळे लांब कुठे तरी दडले. त्यांची पण बरीच माणसे मृत्युमुखी पडली होती.

ले. कारपेंटरने विचार केला. आता परतीच्या मार्गाला लागावे उद्या अधिक माणसे घेऊन यावे.

त्याने आपल्या टोळीला मागे फिरण्याची आज्ञा दिली. पण ते फार थकले होते. उपाशी होते. बरोबर सहा मुडदे होते. काही जखमी पण होते आणि संध्याकाळ पण झाली होती. तेव्हा त्याने कँप ठोकण्याचा हुकूम दिला. कँप ठोकेपर्यंत रात्र झाली. मग मध्ये विस्तव पेटवून सभो-वती पहारा ठेवून काहीजण झोपले; पण ती झोप कसली? ले- कारपेंटर मात्र डी. अरनॉटकरितां हळहळत होता. त्याला झोप लाग. लीच नाही.

त्या काळ्या लोकांनी खेचत खेचत डी. आरनॉटला खेड्यात नेले आणि मोठ्याने हाकाटी घातली. सर्व स्त्रियांनी ओळखले आज आपणाला मेजवानी आहे. साऱ्या धावत धावत त्यांच्या दिशेने आल्या. आणि डी. अरनॉटसारख्या सुदृढ कैद्याला पाहून खूष झाल्या. आज बऱ्याच दिवसांनी त्यांना गोरा कैदी मिळाला होता.

आणि लागलेच त्या अत्याचारी बायकामुलांनी डी. अरनॉटला दग-डांनी आणि काटक्यांनी मारण्यास सुरवात केली. सिंह पिंजऱ्यांत सापडला होता.

अंधार पडला आणि त्यांनी डी. ॲरनॉटला खेड्याच्या मध्यभागी असलेल्या एका खांबाला बांधले. त्याच्या अंगावरचे कपडे ओरबडून काढले. काहीनी त्याला भाले टोचले आणि बायका आपली भांडी आणण्यास गेल्या. काहीनी चुली पेटवल्या. इतक्यात मागे राहिलेले सारे मोंगा आले. आणि मग थोड्या वेळाने त्या नृत्याला सुरवात झाली. (death dance) ते सारे नाचत होते. त्याला भाल्यांनी टोचीत होते. किती अमानुष प्रकार! पण डी. अरनॉट हुं की चूं करीत नव्हता.

त्याला मरणप्राय वेदना होत होत्या. पण तोंड घट्ट मिटून तो सोशीत होता; कारण तो फ्रेंच शिपाई होता.

ज्यावेळी टारझनने जेनला केबिनजवळ सोडले त्याचवेळी बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज त्याने ऐकला, आणि तो तीरासारखा निघाला. संकटात सापडलेल्याला मदत करणे हे जणू त्याचे ब्रीद होते. आणि आता ज्यांना तो वाचवित होता, मदत करीत होता, ती त्याच्याच जातीची गोरी माणसे होती.

आवाजाचा रोख त्याने ओळखला होता. झाडातून झेपा घेत घेत तो अरनॉटच्या टोळीने जिथे रात्रीकरिता कॅंप घातला होता तिथे गेला. जिथे शेकोटी पटली होती तिथे तो थांबला नाही. मोंगा लोक सापडलेल्या माणसाचा कसा बळी घेतात हे त्याने पाहिले होते. म्हणून तो झपाट्याने मोंगाच्या खेड्याकडे निघाला होता. वेळेवर पोहोचलो तर फायदा आणि तो वेगाने निघाला.

खेड्याजवळ येताच त्याच्या ठरलेल्या झाडातून त्याला दिसले की कैदी खांबाला बांधला गेला आहे. रक्तबंबाळ झाला आहे; पण अजून तो मेला आहे की काय हे त्याला कळेना; कारण कैद्याने डोळे घट्ट मिटून घेतले होते आणि ते तीक्ष्ण भाले त्याच्या अंगाला टोचले जात होते. एवढ्या गर्दीतून याला कसे सोडवायचे? पण टारझनकडे युक्त्यांना तोटा नव्हता. कैद्याला मारण्याची रीत पण त्याला माहित होती. कैद्याला ठार मारण्यापूर्वी ते त्याचे कान कापतात. कान तर शाबुत होते.

तेव्हा टारझनने आपली लांब दोरी काढली आणि तिचा फास जो माणूस सर्वात पुढे होता आणि कैद्याचा कान कापणार होता त्याच्यावर उडवला. सरसरत फास त्याच्यापर्यंत पोहोचला आणि हळुहळु तो त्या झाडाकडे ओढला जाऊ लागला आणि सर्व मोंग्यात हाहाःकार

उडाला. काय झाले! कसे झाले? कुणालाच ती दोरी दिसली नव्हती. आणि सारे आपापल्या झोपड्यात जाऊन दडून बसले.

टारझनने झाडात ओढून घेतलेल्या माणसाचे प्रेत दोरी काढून घेऊन जमिनीवर फेकले. आणि पळत पळत आपला सुरा सरसावून तो त्या कैद्याजवळ आला. याच वेळी कैद्याने डोळे उघडले आणि तो त्या अर्ध-नग्न माणसाकडे सताड डोळे उघडून पाहूं लागला. आता हा या सुऱ्याने आपणाला मारणार काय?

आणि त्याच वेळी टारझनने त्याचे बंद कापले. त्याला मुक्त केले आणि त्याला खांद्यावर घेतले. इतकेच अरनॉटला कळले. पुढे तो बेशुद्ध झाला. टारझन पण अरनॉटला खांद्यावर टाकून झाडातून झेपा घेत घेत जंगलात गेला.

× × ×

ले. कारपेंटरचा कँप सकाळीच जागा झाला आणि दुपारच्या सुमारास ते केबिनजवळ पोहोचले. जिच्याकरिता त्यांनी जिवाचे रान केले होते, जिच्याकरिता त्यांनी अरनॉटचा जणू बळी दिला होता ती जेन पोर्टर केबिनच्या दारात उभी होती. ती दिसताच क्लेटन ओरडला, 'जेन' आजपर्यंत त्याने तिला जेन अशी हाक कधीच मारली नव्हती. त्याची ती हाक ऐकताच प्रो. पोर्टर पुढे धावले. जेनने त्यांच्या गळ्याला मिठी मारली आणि बापलेकीने हुंदके देण्यास सुरवात केली. पण ते हुंदके आनंदाचे होते.

जिच्या शोधाकरिता आपण गेलो ती सुरक्षित आहे हे पाहून ले. कारपेंटरला आनंद झाला पण तो आनंद दुःखमिश्रीत होता.

टोळीतल्या माणसाबरोबर थोडे बोलून क्लेटन केबिनकडे परतला. आणि जेनला अनेक प्रश्न विचारू लागला.

'इतक्या प्रश्नांची उत्तरे मला एकदम कशी देता येतील?' तिने हसून विचारले.

'बरे! हळुहळू सांग.' तो पण हसून म्हणाला.

नंतर सारी हकिकत जशी घडली तशी सांगून ती म्हणाली, 'खरा शूर पुरुष, स्वार्थत्यागी पुरुष, खरा सभ्य गृहस्थ.'

'त्याला, त्या रानवट्याला सभ्य गृहस्थ म्हणतेस मिस पोर्टर? कच्चे मांस खाणारा, रक्ताचे हात अंगाला पुसणारा, अर्धनग्नावस्थेत राहणारा?' क्लेटन म्हणाला.

'पण तो त्याच्या परिस्थितीचा दोष आहे मि. क्लेटन." ती रागाने म्हणाली, 'सभ्य म्हणून आपणांत वावरणारे किती लोक सभ्य असतात? किती लोक इतरांच्या भावनांकडे लक्ष देत असतात? सभ्य माणसाचे कपडे घातले की माणूस सभ्य होतो काय?'

टारझनची हकिकत सांगताना त्याचे शौर्यधैर्यादि गुणांचा उल्लेख करताना तिचा चेहरा तेजाने कसा उजळत होता! तिचे ते पाणीदार डोळे कसे चकाकत होते. हे पाहून क्लेटनला नवल वाटले. आजपर्यंत तिचा चेहरा आनंदाने इतका उजळलेला त्याने कधीच पाहिला नव्हता. अगदी त्याच्याशी बोलतांना पण! आणि आता तर ती टारझनला दोष देताच रागावली. म्हणजे आहे तरी काय? त्या जंगल्यावर तिचे प्रेम जडलेय की काय? आणि मग त्याचा मत्सर जागा झाला.

आणि जेन सहज म्हणाली, 'आता तो कुठें असेल कोण जाणे?'

'कुठे असेल म्हणजे? त्या नरभक्षकांनी अरनॉटला मारलं तिथे गेला असेल तो! आज काळ्यांची मेजवानी असेल आणि हा नरभक्षक तिथे गेला असेल.'

'मि. क्लेटन! तो रानटी असेल; पण नरभक्षक खचीत नाही. तसे

असते तर तुम्ही इतके जण त्याच्या हाती सापडलात तेव्हांच त्याने तुमचा चट्टामट्टा केला असता.'

जरी हे सारे खरे होते. आणि क्लेटनने ते काल मान्य केले होते; तरी मत्सराला डोळे नसतात. मत्सराला सर्पाचे डोळे म्हणतात. कारण आता क्लेटन मत्सराने पेटला होता. टारझनवर म्हणजे तिच्या अरण्यवासी देवावर तो वाटेल ते आरोप करीत होता.

तो आत जाताच क्लेटनने एक चिठी लिहून त्याची क्षमा मागितली पण जेन घुश्शातच होती.

दुसऱ्या दिवशी ले. कारपेंटर शंभर माणसे आणि बरेच साहित्य घेऊन डी. अरनॉटच्या शोधास निघाला. क्लेटन पण त्यांच्याबरोबर गेला. आज ते मोठ्या मार्गाने गेले. तो मार्ग सरळ होता. मार्गात झाडे-झुडपे नव्हती. म्हणून ते त्या खेड्याजवळ लौकर पोहोचले.

खेडे दिसताच ते थांबले. आपल्या लोकांच्या ले. कारपेंटरने तीन तुकड्या केल्या त्याला त्या खेड्यावर हल्ला करायचा होता. ते सरळ वेशीतून आंत शिरले.

मोंगाची पळापळ सुरू झाली. काही त्यांच्या गोळ्यांना बळी पडले. काही पळाले. त्यांच्या बायका मुलांना मात्र त्यांनी हात लावला नाही.

नंतर ले. कारपेंटरच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी प्रत्येक झोपडी शोधली. खेड्याचा कोनाकोपरा शोधला. पण अखेर अरनॉट त्यांना मिळालाच नाही. मोठ्या दुःखाने ते तेथून निघाले.

ले. कारपेंटरला फार दुःख झाले. कारण ते लहानपणापासूनचे मित्र होते. त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. डी. अरनॉट एक अतिशय प्रेमळ सभ्य गृहस्थ होता.

दुपारची वेळ होती. जेन टारझनची—अर्थात तो टारझन आहे याची तिला कल्पना नव्हती—त्या अरण्यवासी देवाची आठवण करीत बसली

होती. त्याच्यावर तिचे निरातिशय प्रेम जडले होते. पण त्याची राहणी? त्याचे खाणेपिणे? त्याची भाषा? माणसाची भाषा त्याला समजत नव्हती. तो ती बोलू शकत नव्हता. पण काय झाले? तो बुद्धिमान आहे. तो सारे सारे शिकेल. अगदी थोड्या काळात! आता चैन पडेना म्हणून ती बाहेर आली तोच गवतात पडलेला एक कागद तिला दिसला. तो तिने उचलून वाचला व ती हसली, 'हा तिसरा लव्हर' हा टारझन असा लपून छपून का राहतो? केबिन तर त्याचीच आहे. सारे विचित्र! पण त्याला काय ठाऊक की मी माझे प्रेम पूर्वीच एकाला दिले आहे.

आणि त्याच वेळी ले. कारपेंटरची पार्टी परतली आहे हे तिने एका गोळीच्या आवाजाने ओळखले पण ते रिक्त हाताने परत आले होते. जातांना ले. कारपेंटरने सांगितले होते,

'एक बार झाला तर आम्ही अयशस्वी झालो असे समजा. दोन झाले तर आम्ही यशस्वी झालो असे समजा.'

आता एकच बार झाला होता. म्हणून जेनला फार दुःख झाले.

●●●

अनुक्रम ३८...
विभाग ...
क्रमांक ३१९६
नों. दि. २८.५.६५

# ए को णि स

## माणसाचा भाऊ

जेव्हा डी. अरनॉट शुद्धीवर आला तेव्हा त्याला आढळले की तो त्रिकोणी आकाराच्या एका झोपडींत आहे. आजुबाजूला सर्व हिरवळें आहे आणि एका बाजूला जंगलाची दाट भिंत आहे. पण जवळपास कोणीच नाही.

आता तो शुद्धीवर आला होता; पण त्याला काहीच आठवत नव्हते. जवळ जवळ तो अर्धवट बेशुद्धच होता; पण त्याचे अंग, त्याचे डोके, त्याच्या जखमा फार दुखत होत्या. त्याला फार वेदना होत होत्या. एकदा वाटे डोके हलवावे पण डोके हलवले की कुठून तरी डोक्यात एक सणक मारून जाई. त्याचा जीव हैराण होई मग त्याने तो प्रयत्न सोडून दिला आणि त्याला चटकन झोप लागली.

ती झोप किती वेळ लागली कोण जाणे? पण तो जागा झाला तेव्हा संध्याकाळ झाली होती. त्याला पाणी पाहिजे होते; पण जवळ कोणीच नव्हते. त्याच वेळी त्याची नजर त्याच्या पायथ्याशी गेली. तिथे कोणीतरी एकजण बसला होता आणि त्याची पाठ अरनॉटकडे होती. ॲरनॉटने त्याच्याकडे पाहिले तेव्हा त्याला कळले की ती पाठ एका गोऱ्या माणसाची होती. उन्हाने ती पाठ तांबूस झाली होती तरी

ती गोऱ्या माणसाची एका फ्रेंच किंवा इंग्रज माणसाची होती.

अगदी हळु आवाजात अरनॉटने त्याला हाक मारली आणि आंत येताच टारझनने त्याच्या कपाळावर आपला थंड हात ठेवला त्याच्या जखमा तपासल्या आणि तो तेथून निघून गेला.

डी. अरनॉटला वाटले ! 'कुठे गेला हा ?'

पण लौकरच तो परतला तेव्हां त्याच्या हातात बरीचशी फळे आणि पाण्याचा तुंबा (लोटा) होता अरनॉटला त्याने काही फळे खाऊ घातली, पाणी पाजले आणि उरलेल्या पाण्याने त्याच्या जखमा साफ स्वच्छ केल्या. तो बोलत नव्हता; पण अरनॉटची व्यवस्था व्यवस्थित करीत होता. अरनॉटला वाटले अशी नर्स मिळायला भाग्य पाहिजे. पण 'हा कोण ? कुठून आला ? आणि हा या अरण्यांत आला कसा ?'

पण ही तर्काच्या पलिकडची गोष्ट होती.

नंतर दोनतीन दिवस काय झाले कोण जाणे ! टारझन त्याला कुठेच दिसत नसे. केवळ रानांतल्या माशा, पक्षी आणि वेगवेगळे आवाज त्याला सोबत करीत होते.

पण फळे आणि पाणी आणून ठेवलेले असे आणि जवळपास कुठें तरी टारझन असायचा. पण अरनॉटला ते ठाऊक नसायचे.

आणि दोन चार दिवसांनीं अरनॉटला अतिशय ताप आला. तो शुद्धीवर पण नव्हता. तेव्हा मात्र टारझन त्याच्याजवळ बसून असे. त्याच्या कपाळाला थंड पाणी चोळी. हाताला थंड पाणी लावी. अशी त्याने त्याची सेवा केली. चार दिवसांनी अरनॉट शुद्धीवर आला; पण हातपाय उचलण्याची पण त्याला ताकत नव्हती. टारझन त्याचे डोके वर उचलून त्याला पाणी पाजी. त्याच्याजवळ बसे आणि अरनॉट त्याच्याकडे पडल्या पडल्या पहात असे. त्याने एक निर्णय

आपल्या मनाशी घेतला इतका सुंदर चेहरा यापूर्वी आपण कधीच पाहिलेला नव्हता.

पंधरा दिवसाने अरनॉट टारझनच्या मदतीने उठूं लागला. पण त्याला धड चालता येत नसे. टारझनच्या आधाराने तो चाले.

एक दिवस अरनॉटला वाटले आपणाला याचे नुसते आभार तरी मानता येतील का? उपकाराची फेड होणे शक्य नाही. याने मला जीवदान दिले आहे. काय करावे?

मग अरनॉट इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश आणि थोडेसे निग्रोच्या भाषेत पण बोलला. पण प्रत्येक वेळी तो मान हलवी 'नाही! नाही!'

काय करावे असा अरनॉटला प्रश्न पडला.

आणि टारझन उठून कुठेसा गेला आणि तो परत आला तेव्हा त्याच्याजवळ पातळ झाडाच्या साली, मऊ मऊ पाने आणि एक पेन्सिल होती.

ते सर्व साहित्य पाहून अरनॉटला नवल वाटले. आणि टारझनने एका पानावर सुवाच्च इंग्रजी अक्षरात लिहिले.

'I am iarzan of the Ape. Who are you? Can you read this language?'

नवलाने त्या सुंदर अक्षराकडे पहात दुसऱ्या पानावर अरनॉटने लिहिले.

होय! मला ही भाषा येते. बोलता पण येते. माझे नांव डी. अरनॉट पण पहिल्याने मला तुझे आभार मानू दे. आपण या भाषेत बोलू शकू.

टारझनने ते वाचले आणि मला ही भाषा बोलता येत नाही असे लिहिले.

पुन्हा अरनॉटने लिहिले Mon Dieu! तू इंग्रज आहेस मग तुला ही भाषा बोलता येऊ नये.

आणि नंतर अरनॉटला वाटले 'हा मुका आणि बहिरा असावा.'

आणि मग अरनॉटने त्या कागदावर पुन्हां एक संदेश लिहिला.

मी पॉल अरनॉट आहे. फ्रान्सच्या नाविक दलातला एक अधिकारी आहे. तू माझा जीव वांचवला आहेस. माझे जे आहे ते तुझेच आहे. पण तू इंग्लिश लिहितोस पण तुला बोलतां का येत नाही ?

आणि टारझनच्या लिहिण्याने अरनॉटला अधिक आश्चर्यात टाकले.

मला फक्त ज्या वानरात मी वाढलो त्यांची भाषा बोलता येते. हत्तीची सिंहाची आणि दुसरे काही जंगलातले प्राणी यांची भाषा बोलता येते. माणसांची भाषा मी कधीच बोललो नाही. एकदांच मी जेन पोर्टरबरोबर बोललो पण ते पण खुणांनी. आज तुझ्याबरोबर लिहिण्याच्या भाषेत बोललो.

कुणाही माणसाबरोबर न बोललेला माणूस छान इंग्लिश लिहितो हे नवल नाही काय ?

मग त्याला जेन पोर्टरबरोबर बोललो या वाक्याची आठवण झाली कीती तीच अमेरिकन मुलगी. जिला शोधायला आपण सारेजण बाहेर पडलो.

नंतर ते दोघेजण आपले म्हणणे झाडाच्या सालीवर लिहून एकमेकाशी बोलले 'आता जेन पोर्टर कुठे आहे ?' अरनॉट.

'आता ती आपल्या मंडळीत सुरक्षित आहे. मीच तिला तिच्या मंडळीत नेऊन सोडले.'

'मी आता तुझ्याकरिता काय करू ? सांगशील ?'

'मला माणसांची भाषा शिकवा म्हणजे झाले. म्हणजे बोलायला शिकवा.'

'बरे तसे मी करीन; पण तू माझे एक काम करशील का ?'

'करीन सांगा.'

'मी एक पत्र तुला देतो. ते माझ्या मंडळीला जहाजावर नेऊन दे. म्हणजे ते येतील आणि मला येथून घेऊन जातील.' अरनॉट.

'पण तशी जरूरी नाही. मीच तुम्हाला स्वतः केबिनमध्ये नेऊन ठेवीन.' टारझन.

'तू मला नेशील. इतक्या लांब मला? तर अजून नीट चालता येत नाही मग कसे?' अरनॉट.

'उद्याच नेतो. पहा तर खरे!' टारझन.

डी. अरनॉटला आजारी पडून आता एक महिना झाला होता. आपल्या मंडळीना भेटण्यास तो फार उत्सुक झाला होता. मी जिवंत आहे हे पाहून त्यांना किती आनंद होईल? आणि टारझन पण आनंदला होता; कारण त्याची लाडकी जेन त्याला उद्या पुन्हा दिसणार होती.

× × ×

दुसऱ्या दिवशी फळे खाऊन झोपडींतून ते बाहेर पडले आणि एका मोठ्या झाडाजवळ येताच टारझनने डी. अरनॉटला खांद्यावर घेतले आणि हंसत हंसत झाडातून झेपा घेत चालू लागला. त्याचे ते सामर्थ्य पाहून अरनॉट थक्क झाला.

दुपारी ते केबिनजवळ येऊन पोहोचले आणि तेथील शांतता पाहून थक्क झाले. पण टारझनला वाटले कदाचित् ते सारे आत असतील आणि त्याच वेळी डी. अरनॉटची नजर समुद्राकडे गेली. दोन्ही जहाजे समुद्रात कुठेच नव्हती.

दोघांनाहि नवल वाटले आणि दुःखहि झाले. केवढ्या आशेने ते आले होते?

टारझन मात्र विचार करीत बाहेरच उभा होता. केबिनचे दार उघ-

डून अरनॉट आत गेला तेव्हा तेथे त्याला एक कॉट, दोन खुर्च्या खाण्याचे पॅक डबे, एक रायफल, स्वयंपाकाची भांडी वगैरे वस्तु आणि झोपण्याचे साहित्य आणि कपडे आढळले.

हे लोक गेले; पण परत येतील असे वाटते. नाही तर त्यांनी इतके सामान कशाला ठेवले असते. नक्कीच ते येणार आणि त्याने टारझनला हाक मारली पण बाहेर कोणीच नव्हते. अरटॉनला नवल वाटले आणि त्या वेळची त्याची घायाळ नजरहि आढळली पण त्याने इतके घायाळ व्हावे असे काय घडले होते ?

केबिनमध्ये येऊन प्रथम अरनॉटने केबिनचे दार लावले. ती भयाण शांतता पाहून त्या वीराला पण भय वाटले.

आपण आता येथे एकटे राहणार काय ? या वाघासिंहाच्या देशात ! माणसाचे तोंड पाहिल्यावांचून आणि ते भयंकर मोंगा–काळे लोक!

आणि टारझन जाताना विचार करीत होता आता यापुढे या केबिन-कडे परतायचे नाही. करचाक वानरांतच जाऊन रहायचे. पूर्वीचे जीवन सुरू करायचे. म्हणजे मी माणूस आहे हे विसरायचें ? अहं ! तो काळ वेगळा होता. मी माणूसकी विसरणार नाही, अशक्त अरनॉटला माझी जरूरी आहे. तो एकटा काय करणार ? माणूस ! संगतिप्रिय माणूस एक-टाच कसा राहणार ?

आणि हा विचार मनात येताच टारझन केबिनकडे वळला आणि त्याच वेळेला जॉन क्लेटनच्या टेबलावर असलेल्या दोन पत्रांपैकी एक उघडें पत्र अरनॉट वाचीत होता.

उघडे पत्र वाचण्यात कसला दोष ?

पत्र पुढीलप्रमाणे होतें

टारझन ऑफ एपस्,

तुम्ही आपली केबिन आम्हाला वापरायला दिली म्हणून आम्ही

तुमचे आभारी आहोत. पण जाण्यापूर्वी तुमची प्रत्यक्ष भेट होती तर बरे झाले असते. आम्ही तुमच्या कोणत्याच वस्तूंचा नाश केलेला नाही; पण तुम्हाला सुख व्हावे म्हणून काही अधिक वस्तु तेथे ठेवल्या आहेत.

ज्या गोऱ्या माणसाने आमचे सर्वांचे प्राण वाचवले, आमच्या अन्नपाण्याची सोय केली त्याला तुम्ही ओळखत असला तर आमच्या वतीने त्याचे आभार माना.

एका तासातच आम्ही आपल्या देशाला परतणार आहो. पण तुम्हा दोघांचे आम्ही आभार मानीत राहू. कारण आमच्यासारख्या परकीया-साठी तुम्ही फार केले आहे. परत न येण्याकरिताच आम्ही जात आहोत. योग असला तर कधीतरी आपली भेट होईल. कळावे,

सेसिल क्लेटन.

परत न येण्याकरिता हे शब्द उच्चारून अरनॉटने बिछान्यावर अंग फेकून उशीत तोंड खुपसले. एका तासाने त्याला कसला तरी आवाज ऐकू आला. आणि त्याने कान टवकारले. त्याला वाटले कुणीतरी हिंस्र श्वापद असावे.

केबिनचा बोल्ट हळुहळू सरकत होता. अरनॉटची पाचावर धारण बसली होती. जवळची बंदूक त्याने सज्ज केली. आणि दार उघडले जाताच त्याने गोळी झाडली.

●●●

# वी स

## हरवलेला खजिना

डी. अरनॉटला शोधून ती टोळी परत आली. दुर्दैवाने त्याचा शोध लागला नाही. त्याचे फाटलेले कपडे त्याच्या काही वस्तू तिथे त्यांना सापडल्या आणि त्यावरून त्यांची खातरी झाली की तो आता या जगात नाही मग उगाच इथे थांबायचे कशाला ?

' आपण उद्या इथून निघू ' कॅ. डफ्रेन म्हणाले.

ते ऐकून जेन घाबरली. आपल्या उपकारकर्त्याला न भेटता जायचे ? तिने कॅप्टनला काही दिवस थांबण्याची विनंति केली. ती म्हणाली,

' कॅप्टन ! ज्याने आम्हा सर्वांना जीवदान दिले आमची खाण्यापिण्याची व्यवस्था केली त्याला न सांगता न भेटता जायचे ? असे कृतघ्न व्हायचे ? '

' पण मिस् पोर्टर आता चार दिवस झाले. तो आला नाही. त्याला तुमची आठवण असती, तो आपणासारखा असता तर तो तुमच्या चौकशीला निश्चित आला असता. '

' कॅप्टन ! तो विसरणारा माणूस नाही आणि तो आमच्यासारखा,

अगदी आमच्यासारखा सुवृत्त गोरा माणूस आहे. काहीतरी कामात तो गुंतला असेल. कुणाला तरी मदत करण्यात गुंतला असेल. आणि माझी मनोदेवता मला सांगते की डी. अरनॉट जिवंत आहेत आणि त्याला मदत करण्यातच तो अरण्यवासी देव गुंतला आहे.'

'कॅप्टन ! तुम्हा सर्वांपेक्षा मी त्याला अधिक ओळखते. त्याने मला जन्माच्या कलंकातून वांचवल आहे. तो नसता तर मला पळवून नेणाऱ्या त्या गोरिल्याने माझी काय दशा केली असती ? संतीला प्राणापेक्षा शीलाचे मोल अधिक वाटते.'

'तुम्ही त्याला देव बनवलेत हे ठीक आहे, मिस् जेन पण तो डी. अरनॉटच्या सेवेत गुंतला आहे. अरनॉट जिवंत आहे हेच मला पटत नाही. मला जे समजले आहे त्यावरून मला वाटते तो गोरा असला तरी काळ्यांचा मित्र आहे. एवढ्या लोकांचे शत्रुत्व करून त्याचे चालणार नाही आणि काळ्या लोकांच्या ज्या काही मेजवान्या, मृत्युनृत्य होतात त्यांत तो गुंतला आहे.'

कॅप्टनचे 'मला जे समजले आहे.' ते शब्द ऐकताच जेनने चटकन क्लेटनकडे पाहिले व म्हटले,

'कॅप्टन ! तुम्ही त्याला ओळखत नाही. तसे असते तर तुम्ही असे बोलला नसता.'

'बरे ! बरे ! त्याचे समर्थन करणारी ही आधुनिक पोर्शिया असल्यावर माझे काय चालणार ? आणखी चार दिवस आपण थांबू.'

'कॅप्टन ! ती माझी एकुलती एक मुलगी असल्यामुळे लहानपणापासून तिला आपला शब्द खरा करण्याची सवय आहे. तिच्याप्रमाणे मला वागावे लागते.' प्रो. पोर्टर म्हणाले.

'हरकत नाही प्रोफेसर. मी तुमच्या सर्वांच्या सेवेला हजर आहे.' कॅप्टन हसत म्हणाले.

पण कॅप्टनचे बोलणे क्लेटनला आवडले नाही. आफ्रिका सोडायला तो एका पायावर तयार होता आणि मध्ये हे विघ्न आले.

इतक्यात एवढा वेळ त्यांचे बोलणे शांतपणे ऐकणारी एस्मिरेल्डा म्हणाली,

' तो देव जरी असला, आपला उपकारकर्ता असला तरी आपण जावे हेच चांगले. उगाच या संकटात राहण्यात कोणता अर्थ ? '

' एस्मिरेल्डा ! त्याने तुला कसे वाचवले हे विसरलीस काय? आज जिवंत तरी असतीस का ?

पण एस्मिरेल्डा म्हणते ते बरोबर आहे. रानातील ही रात्रीची वेळ; पशूंच्या भयंकर आरोळ्या यांनी प्राण जायची वेळ येते. शूर वीराला पण ते कठीण वाटते क्लेटन.

' खरे आहे. त्या दिवसाची ती रानांतली रात्र मला चांगली आठवते. पशूंच्या आरोळ्यापेक्षा ती भीषण शांतताच अधिक भयंकर वाटते. ' ले. कारपेंटर म्हणाले.

' मग तुम्ही आणि मि. क्लेटन यानी जहाजावर जाऊन झोपावे. उगाच त्रास नको. '

ते ऐकून क्लेटनचा मत्सर बळावला; पण करणार काय ? तिला त्याला दुखवता येते नव्हते.

फिलँडर पण तिच्याच बाजूने बोलले. ' जेनचे म्हणणे योग्य आहे. तो आमचा उपकारकर्ता आहे. '

' पण आता त्या खजिन्याचे काय ? तो आता माझ्या ताब्यात देता का ? ' प्रो. पोर्टर.

' आम्ही त्या जहाजाचा कसून शोध केला; पण तुमचा खजिना आम्हाला सापडला नाही. ' कप्तान म्हणाले.

' मग कुठे असेल तो ! बोटीवरच होता. ' प्रो. पोर्टर.

कदाचित् जाण्यापूर्वी त्यांनी तो कुठे तरी पुरून ठेवला असेल.' फिलँडर.

'तसेच असावे. आपण किनाऱ्यावर शोध करू व तो खजिना शोधून काढू.' कप्तान किनाऱ्यावर शोधीत असतना त्यांना ती खजिन्याची जागा सापडली. चार खलाशी लावून त्यानी ती उकरली पण स्पाईनच्या प्रेताशिवाय त्यात काहीही सापडले नाही; पण खाड्याच्या आकारवरून त्यांना कळले खजिना कुणातरी तेथून हलवला आहे. नाहीतर प्रेताला इतका मोठा खड्डा काय करायचा? पण तो कोणी पळवला असेल? कुणी तरी काळा तिथे लपून छपून असेल. आणि जहाज गेल्यावर त्यानेच तो उकरून नेला. उकरल्याच्या खुणा तर दिसतात आणि हे खजिन्याचे हरवणे जेनचे जीवन बेचिराख करणारे होते. पण जेनशिवाय याची कल्पना कुणाला असणार?

•••

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक

## ए क वी स

### जगाच्या मार्गावर

अरनॉटने जी बंदुकीची गोळी घातली तिने टारझन केबिनच्या दारांतच कोसळला. आता तो दुसरी गोळी सोडणार तोच तो कोणीतरी गोरा माणूस आहे असे त्याला दिसले आणि.... आणि तो त्याचा प्राणरक्षक टारझन होता. अरनॉट त्याच्याजवळ धावला. त्याने त्याचे मस्तक मांडीवर घेतले आणि छातीला कान लावला. तो छातीची मंद धुकधुक त्याला ऐकू आली. मग त्याने त्याची जखम तपासली. एक लहान जखम डोक्याला झाली होती. पण हाड वगैरे मोडले नव्हते.

अरनॉटने त्याला उचलून खाटेवर ठेवले आणि कापूस फडका घेऊन पाण्याने त्याची जखम स्वच्छ करून बांधली. कपाळाला पाण्याचा स्पर्श होताच टारझनने डोळे उघडले आणि अरनॉटकडे पाहून तो हसला.

'टारझन ! टारझन !' अरनॉट कळवळून म्हणाला.

'अरनॉट ! थोडे खरचटले आहे. तो गोरीला, तो करचाक, तो टरकॉझ यांच्याबरोबर लढतांना मला झालेल्या जखमा माझ्या मित्रा तू पाहिल्या नाहीस. त्या जखमानी महिना महिना मी जमिनीला

खिळलो होतो. करचाकने जवळजवळ माझा काटा काढायचाच बाकी ठेवले होते. हा व्रण!' आणि त्याने आपल्या कपाळाकडे बोट दाखवले, ' ह्यापुढें जखम म्हणजे काहीच नाही.'

मग तो शांतपणे खाटेवर पडताच अरनॉटने त्याची ती दोन पत्र त्याला दिली.

पहिले उघडे पत्र त्याने वाचले.

' टारझन ऑफ दी एप्स्.

क्लेटनच्या पत्राप्रमाणे मी पण तुमचे आभार मानते. आपण आपली केबिन आमच्या स्वाधीन केली पण आपणाला पाहण्याची संधि आम्हाला मिळाली नाही. कोण आहात आपण? ज्या अरण्यवासी देवाने मला वांचवले तसेच आहा काय? पण तो देव आपणाला भेटला तर माझ्या वतीने त्याचे आभार माना.

आपले प्रेमपत्र मी वाचले. मला ते गवतांत सापडले; पण माझे प्रेम मी आधीच एकाला दिले आहे. तेव्हा क्षमा करा. आपली भेट झाली नाही म्हणून खेद वाटतो. पण तुम्ही माझ्यावर कसे प्रेम करू लागलात? आपणाला भेटावेसे वाटते. जरूर जरूर अमेरिकेला बालाटमूर येथे या. नमस्कार.

जेन पोर्टर.'

टारझनने दुसरे पत्र पुढे घेतले. पण ते बंद पत्र कसे उघडावे हे त्याला समजेना. कदाचित् उघडताना ते फाटेल म्हणून अरनॉटने ते त्याला उघडून दिले.

' अरण्यात राहिल्यामुळे या वीस बावीस वर्षाच्या तरुणाला बंद पत्र उघडता येत नाही!'

टारझनने ते पत्र वाचताच तो अस्वस्थ झाला आणि खाली पाहात राहिला.

ते पत्र असे होते ‘मी तुमच्यावर प्रेम करते. किती करते ते कसे सांगणार. पण तुम्ही मला केबिनकडे परत पोचवताच परत कधी आलाच नाहीत. मी सात दिवस वाट पाहिली मग इतरांबरोबर मला जाणे भाग पडले. पण तुम्ही परतून आला असता तर मी तुमच्याबरोबर अरण्यातहि येऊन राहिले असते.

जेन पोर्टर ’

नंतर मान वर करून टारझन अरनॉटला म्हणाला,

‘ आपण उद्याच अमेरिकेला जाऊ. कुठे आहे ती अमेरिका ? ’

‘ उद्या अमेरिकेला जाऊ ? पण ती किती दूर आहे हे ठाऊक आहे का तुला ? ’

त्याला उत्तर न देता टारझन उठला आणि कपटांतून भुगोलाचे पुस्तक काढून त्याच्या पुढे ठेवीत तो म्हणाला,

‘ आता दाखव ती अमेरिका ! ’ तो नकाशा पुढे घेऊन अरनॉटला म्हणाला.

‘ हे सारे निळे दिसतेय ना हे सारे पाणी आणि हे इतर रंगित तुकडे ते जगातले अनेक देश, अनेक खंड आणि ही अमेरिका.’

‘ मग आपले खंड ? ’

‘ ही आफ्रिका. ’

‘ मग आपण आफ्रिकेत कुठेसे आहोत ? ’

‘ हे इथे ! ’ पेनसिलीने नकाशावर एक ठिपका काढीत अरनॉटने म्हटले.

‘ इथे ? मग अगदी जवळ आहे. एका वितीच्या अंतरावर.’

‘ माझ्या मित्रा ! ते फार फार दूर आहे. हजारो मैल दूर आहे.’ अरनॉट हंसत म्हणाला.

'पण गेलेच पाहिजे. मला आता इथे रहायचे नाही. मी फार कंटाळलोय.'

'मी तुझ्यापेक्षा या एकांताला अधिक कंटाळलोय. आपण आठ दिवसांनी निघू.'

'आठ दिवसांनी ?' टारझनच्या आवाजांत निराशा भरली होती.

× × ×

त्या आठ दिवसात अरनॉटने बोलून बोलून टारझनला बरेचसे बोलायला शिकविले. अरनॉट शिकवित होता आणि टारझन लौकर लौकर सारे आत्मसात करीत होता. अरनॉटला त्याच्या बुद्धीचे कौतुक वाटत होते.

'काही म्हण टारझन ! तू वानरीचा मुलगा नाहीस.'

'पण काला माझी आई होती. केसाळ वानरी होती. आकाराने, वजनाने माझ्यापेक्षा दुप्पट होती. आणि पांढरा वानर माझा बाप असावा. पण हे ती सांगे. मला माहित नाही.'

'पण तू वानर नाहीस. वानराचा एकहि गुण तुझ्यात नाही. आणि एक सांगू, मोठ्या घराण्यात जन्मलेला तू इंग्रज किंवा फ्रेंच आहेस. या केबिनमध्ये तुझ्या जन्माचा पत्ता लागेल असे काहीच का नाही ?'

'काही नाही. मी सारे शोधलेय. एकच पुस्तक आहे पण मला ते ते वाचता येत नाही.' आणि त्याच्या भाल्याच्या पिशवीत तळाशी असलेली डायरी त्याने त्याला दिली.

ती ज्या माणसाची डायरी होती त्याने ती वीस वर्षांपूर्वी फ्रेंच भाषेत लिहिली होती. दोनचार पाने वाचताच अरनॉट म्हणाला.

'ही डायरी जॉन क्लेटन, लॉर्ड ग्रेस्टोक यांची आहे. ते इंग्रज सरदार होते हेच तुझे वडील असावे.'

पण टारझनने मान हलविली. 'नाही!' त्या दोघांना गाडले तेव्हा त्यांच्याबरोबर एक मूलही गाडले हे तू विसरतोस.'

'विसरत नाही. ते माकडाचे पोर होते.'

लॉर्ड ग्रेस्टोकने जी आपली माहिती लिहिली आहे ती आपणास माहित आहे तेव्हा ती देण्याच कारण नाही; पण पुढें त्याने लिहिले आहे,

'आज माझा मुलगा सहा महिन्यांचा झाला आहे. किती सुंदर आणि गोंडस आहे तो! लेडी ॲलिसच्या, आपल्या आईच्या मांडीवर बसून तो हंसत आहे. मी लिहित आहे.

'मला वाटते हा माझा मुलगा फार बुद्धिमान निपजेल. आमच्या ग्रेस्टोन घराण्याचे नाव काढील. मी इतके शब्द उच्चारताच त्या छबकड्याने माझ्या हातातले पेन ओढले. त्याच्या बोटांना शाई लागली. ती त्याने माझ्या हातांतल्या डायरीवर उमटविली. माझ्या बोलण्यावर जणू त्याने शिक्का मोर्तब केलेय.'

'आणि ही पाहिलीस! त्याच्या हाताची ही चार बोटे! आणि हा आंगठा अर्धवट उठला आहे. यानेच सिद्ध होईल तू लॉर्ड ग्रेस्टोक आहेस. फ्रान्समध्ये गेल्यावर मी ते सिद्ध करीन. हा एक योगायोग आहे. टारझन! आतां उद्या आपण प्रवासाला निघणाच! दुसऱ्या दिवशी अरनॉटने सुधारलेल्या जगात जाण्याची तयारी केली. त्या केबिनमध्ये सापडलेले क्लेटन व फिलँडरचे कपडे त्यांनी कसे तरी पेहेरले. दोन बंदुका, दोन स्वयंपाकाची भांडी, दोन बिछाने, दोन ब्लँकेटस् घेतली व ते निघाले.

'ही भांडी कशाला? मांस शिजवून तुम्ही लोक मांसाची चव घालवता. कच्चे मांसच स्वादिष्ट लागते.'

'पण आता तुला कच्चे मांस खाऊन चालणार नाही. काटा आणि सुरी चमचा फेकून चालणार नाही. मी सांगून ठेवतो. मी तुला सुधारणेच्या शिखरावर पोंहोचवणार आहे. सभ्य गृहस्थ बनविणार आहे.' नंतर सुधारणेचें, प्रगतीचे महत्त्व त्याला अरनॉटने सांगितले.

'वा रे तुमची सुधारणा! सिंह ओरडला की तुम्ही बेशुद्ध होऊन पडता. म्हणे सुधारणा!'

'हे बघ! तू सुधारलेले जग पाहशील तेव्हा तुला कळेल सारे. शस्त्र नसले तर आम्ही सिंहाला भितो; पण एकटे असलो तर. दहा जण असलो तर सिंहाला आम्ही पळवून लावू.'

माणसाने सुधारणा केली, मोठेमोठे शोध लावले, शहरे वसवली, ती अनेकांच्या सहचार्याने. अनेकांची डोकी एकत्र येऊन. शत्रूचा प्रतिकार केला तो अनेकांच्या साहाय्याने. विकास, प्रगती हे एकट्या दुकट्याचे काम नाही. मी एकटाच असतो तर त्यावेळी मेलो असतो. जगलो तो तुझ्या सहाय्याने.

टारझनला त्याचे म्हणणे पटले. करचाक व टरकोझ त्यावेळी एक झाले असते तर आपण जिवंत राहिलो नसतो. ते एक झाले नाहीत म्हणून आपण जगलो. एकत्र येऊन लढण्याची पशूंत बुद्धीच्च नाही. म्हणून वाघ-सिंह रानात अनेक पशूंना मारतात. आणि ते तरी कुठे एकटेच राहतात? पण काळे लोक एकत्र राहतात. शेती करतात.

बुद्धिमान टारझनच्या डोक्यात आता या एक एक गोष्टी येऊ लागल्या.

'आणखी एक ऐक, पैशाशिवाय माणसाचे चालत नाही.'

'पैसा! म्हणजे काय?'

'पैसा!' त्याने थोडेसे त्याला समजावून सांगितले. पण टारझनला नीटसे कळले नाही.

'या जगांत पैशावाचून काही चालत नाही. काही मिळवायचे तर पैसा पाहिजे.'

'पण पैसा मिळणार कसा ?'

'काम करून ?'

'मग मी काम करीन.'

'पण तुला काम करण्याची जरूरी नाही. आपणा दोघांना पुरेल इतका पैसा माझ्याकडे आहे आपण एखाद्या शहरांत गेलो की मी माझा पैसा मागवीन.'

नंतर प्रवास करीत करीत एका शहराजवळ ते आले. दुरून घराची छपरे दिसत होती. आरंभाला त्यांना शेते आणि मळा दिसला. त्यांत काही निग्रोज काम करीत होते. त्यांना पाहतांच टारझनने आपले धनुष्य सरसावले. 'हं ! माणसाला मारायचे नाही.' अरनॉट.

'पण ती काळी माणसे आहेत.'

'काळी की गोरी ! पण ती शत्रु आहेत की मित्र आहेत हे कळायला पाहिजे. नंतर पुढची गोष्ट.'

इतक्यात एक दोन निग्रोंचे लक्ष त्यांच्याकडे गेले आणि ते टारझनला पाहून घाबरले आणि चित्कार करीत पळून गेले.

तो गोंगाट ऐकून दारातून एक गोरा माणूस बाहेर आला. त्याच्या हातात बंदूक होती. पण दोन गोरी माणसे पाहून तो बंदुक तशीच धरून थांबला. आणि अरनॉट त्याच्याकडे निघाला. पाठोपाठ टारझन होताच.

'मी फ्रेंच सैन्यांतला एक लेफ्टनन्ट आहे. माझे नांव डी. अरनॉट. हा माझा मुझियर टारझन.' त्यांचे हात हातात घेऊन तो मिशनरी म्हणाला, 'माझे नांव फादर कॉन्स्टनटाईन. मी इथे फ्रान्समधून आलो आहे.' त्यानंतर फादर कॉन्स्टनटाईनने त्याना आपल्या बंगल्यात

नेले. विशेष काही त्याला न सांगता आपण रानांत मार्ग चुकून तिथे एक महिना कसा काढला हे सांगून तो म्हणाला,

'तिथे आमचे कपडे पण फाटले. पण पहिली गोष्ट प्रथम फ्रेंच सरकारकडून रजा आणि माझ्या बँकेतून मला पैसे मागवले पाहिजेत.'

फादर कॉन्स्टनटाइनने त्यांची सर्व व्यवस्था केली. पण टारझनची ती सुंदर मूर्ति त्याच्या मनावर कोरली गेली होती.

अरनटॉटला रजा मिळताच आणि बँकेकडून त्याचे पैसे येताच ते पुढच्या शहराला जावयास निघाला. तिथे त्यांनी बोट ठरवून टारझनच्या खजिन्याच्या शोधाला जायचे होते. तिथे त्यांनी एका हॉटेलमध्ये मुक्काम केला. इतर बरेच प्रवासी तिथे होते. रात्री ते व्हरांड्यात बसले असता एक निग्रो दारू पिऊन धुंद होऊन रस्त्याने पुष्कळांना मारीत धावत आहे, असे समजले ते ऐकून सारे घाबरले. इतक्यात तो भला मोठा अवजड अंगाचा निग्रो सुरा घेऊन हॉटेलच्या व्हरांड्याच्या दिशेने आला. त्याला पहाताच सारे पळत सुटले; पण टारझन तसाच बसून राहिला.

इतक्यात तो निग्रो टारझनच्या अंगावर धावला आणि त्याला सुरा मारणार, तोंच टारझनने त्याचा हात धरून वरच्यावर पिळला. तेव्हा त्याची दारूची धुंदी उतरली. टारझनचे ते धैर्य पाहून खिडक्याआड दडून पाहणारे लोक थक्क झाले आणि तो निग्रो जातांच टारझनच्या भोंवती जमले. तो निग्रो वेदनांनी तळमळतच गेला होता.

त्यानंतर तीनचार दिवसानी बोलता बोलता वनराज सिंहाच्या गोष्टी निघाल्या. अनेकांनी आपले अनेक अनुभव सांगितले. टारझन मात्र गप्प होता.

तेव्हा एकाने म्हटले, 'मुझिअर टारझन ! तुम्ही काही बोलत नाही.' टारझनने आपल्या मित्राकडे पाहिले आणि म्हटले,

‘ सिंह भितरा असतोच असे नाही. काही शूर असतात, काही तिरसट असतात आणि काही भरल्या पोटी कुणावर हल्ला करीत नाहीत. ’

‘ पण सिंहाची शिकार करायची म्हणजे फार तयारी करावी लागते. महाभयंकर प्राणी ! ’

‘ महाभयंकर प्राणी तर खराच पण मी त्याला वाटेल तेव्हा मारीन.’ आणि जंगलाच्या बाजूने त्याच वेळी एक सिंहगर्जना ऐकू आली.

‘ कराल या सिंहाची शिकार? अशा रात्रीच्या वेळी ? ’

‘ अगदी सहज. ’

‘ मग पांच हजर फ्रँक्सची पैज. ’ एक गृहस्थ म्हणाला.

‘ जीवाशी गांठ आहे. काम भयंकर आहे. दहा हजार फ्रँक्स्.’ डी. अरनॉट म्हणाला. त्याने ते कबूल केले.

‘ बरे! आता तयारी काय करणार ? आणि आताच निघणार ? ’

‘ तयारी ! एक दोरी आणि सुरा. आणि आज रात्रीच जाणार ! ’

सारे थक्क झाले.

आणि रात्री साडे अकराला टारझन निघाला. एका झाडावर त्याने आपल्या अंगावरचे कपडे काढून ठेवले. तेव्हा त्याला किती आनंद झाला. त्याला वाटले आता पुन्हा शहरात जाऊच नये. पण लागलाच त्याला तो सुंदर चेहरा आठवला व त्याचा बेत फिरला. नंतर त्याने एका झाडावर झेप घेतली आणि फांद्यावरून झेपा घेत तो बराच लांब गेला आणि मग त्याला वाटले, ‘ छे ! छे ! ते शहरी जीवन मला झेपणार नाही. माझे स्वातंत्र्य ! त्याला तिथे बाध येतो आहे.’

इतक्यात त्याला नुमाचा वास आला. आणि झटकन त्याने त्या दिशेला तोंड वळवले आणि झाडावरून झेपा घेत तो मागे आला. तोपर्यंत नुमा ( सिंह ) त्या झाडखाली आला. टारझनने आपल्या दोरीचा

फास त्याच्या गळ्याभोवती टाकला व त्याला वर ओढून घेतले. दोन-तीन झोके मिळताच फास गच्च झाला. आणि टारझनने खाली उतरून आपला सुरा त्याच्या हृदयात चार वेळ खुपसताच नुमा मरून पडला.

टारझन जंगलात जाताच ज्यानी पैज मारायला लावली होती त्याला आणि इतरांना पण टारझनला जंगलात पाठविल्याबद्दल पश्चात्ताप वाटू लागला आणि काहीजण बंदुका घेऊन तयारीनिशी जंगलात जावयास निघाले. जंगलाच्या टोकाशी पोहोचताच ते विचार करू लागले, तो चटकन कोणीतरी त्यांच्याजवळ झाडातून उडी घेतली. सारे दचकले. पण सिंहाचे धुड खांद्यावर घेतलेला तो टारझन होता.

त्याला पाहून ते विस्मित झाले. आणि त्याने पैजेप्रमाणे सिंह पण मारून आणला होता. डी. अरनॉटला त्याच्याबद्दल सर्व माहिती असूनहि तो विस्मित झाला.

पैजेप्रमाणे टारझनला दहा हजार फ्रँक्स मिळाले. ज्या जागेत खाणे, पिणे, झोपणे, मौज करणे, प्रवास करणे या गोष्टी पैशावाचून होत नाहीत त्या जगांत टारझनने पहिल्याने पैसा मिळविला होता. अरनॉटने त्याला सांगितले. 'हे पैसे तू आपणाकडे ठेव.' पण टारझनने ते ऐकले नाही. पण ज्याच्याकडे पैसा नसतो त्याला जगांत मान नसतो हे टारझनला कळले होते.

दुसऱ्या दिवशी एक लहानशी बोट .ठरवून ते समुद्रकिनाऱ्याने त्याच्या केबिनकडे जायला निघाले. ती केबिन पाहतांच टारझनला फार आनंद वाटला. पुन्हा त्याला वाटले हे अरण्य सोडून जाऊ नये. स्वच्छंद जीवनाचा आनंद लुटीत इथेच रहावे पण तो सुंदर चेहरा आठवताच त्याचे सारे बेत बदलत.

तो केबिनमधून कुदळ घेऊन एकटाच त्या दूरच्या बंदिस्त जागेकडे गेला. आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ती खजिन्याची पेटी घेऊन केबिनकडे परतला.

'टारझन ! तुझ्यामुळे हा प्रो. पोर्टरचा खजिना वाचला. तुला धन्य-वाद माझ्या मित्रा.'

त्या शहरांत परतून येताच त्यांनी आपला मोर्चा फ्रान्सकडे वळवला. फरान्समध्ये पाऊल ठेवताच अरनॉट पॅरिसला जावयास निघाला; पण टारझन ऐकेना. त्याला अमेरिकेला जायचे होते.

'थांब टारझन ! पॅरिसमध्ये माझे फार महत्त्वाचे काम आहे. तुला आले पाहिजे.' आणि त्याला पॅरिसला जाणे भाग पडले.

सकाळच्याच वेळी अरनॉट टारझनला घेऊन पोलीस कमिशनरच्या ऑफिसात गेला. टारझनची ओळख करून देताच अरनॉटने विचारले,

कमिशनरसाहेब मला एक माहिती पाहिजे. बोटांचे जे ठसे असतात ते कालांतराने बदलतात का ? त्यावरून तो कोणत्या वंशातील, कोणत्या जातीतील आहे हे कळते का ? '

'या ठशाचा उपयोग गुन्हेगार शोधून काढण्यास आम्ही करतो, पण वंश जात कळेल की नाही कोण जाणे ? कदाचित् कळेलहि. गोऱ्या माणसापेक्षां निग्रोच्या बोटाचे ठसे साधे असतात. पशूंच्या बोटांचे ठसे विरळ आणि सरळ असतात.'

'मग आमच्या बोटांचे ठसे घ्याना.'

ते ऐकून त्या ऑफिसरला नवल वाटले; पण आपल्या मदतनिसाला बोलावून त्याने त्यांच्या बोटांचे आणि आंगठ्याचे ठसे घेतले.

नंतर आपल्या खिशांतील ती डायरी काढून ज्या पानावर त्या मुलाच्या हाताचे ठसे होते ते पान त्याला दाखवून अरनॉट म्हणाला,

'हे ठसे सहा महिन्याच्या मुलाचे आहेत. आमच्यापैकीं कुणाच्या ठशाशी ते जुळतात हे सांगाल का?'

बराच वेळ त्या ठशाकडे बारकाईने पाहून तो म्हणाला. 'मला तसे आज ते सांगता येणार नाही. आमचा एक्सपर्ट आला की मी त्याच्या कडून ते तपासून घेईन. आपण पंधरा दिवस थांबा.'

'पण आम्हाला अमेरिकेला जायचे आहे!'

'मग केबल पाठवून आम्ही तुम्हाला निकाल कळवू.'

'ह्या तुझ्या कसल्या भानगडी अरनॉट?' ते परतताच टारझन म्हणाला.

'तू लॉर्ड ग्रेस्टोक आहेस हे मला ठरवायचे आहे.'

'पण मी कालाचा मुलगा आहे. काला माझी आई होती.'

'काला तुझी आई नव्हती. तू तिचा दत्तक पुत्र आहेस.'

वाद घालण्यात अर्थ नाही असे पाहून टारझन गप्प बसला. आणि दुसऱ्या दिवशी तो अमेरिकेच्या बोटीत बसला.

●●●

अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.

# बा वी स

## पुन्हा तो राक्षस

सकाळचे दहा वाजले होते. प्रो. पोर्टरच्या दाराशी एक टॅक्सी उभी राहिली. टॅक्सीतून उतरून मि. कॅनरल पोर्टरच्या लायब्ररीकडे वळला.

'प्रोफेसर पोर्टर! मला आपणाशी बोलायचे आहे!' मि. कॅनरल.

'बोला.'

'मला आता हे लग्न लांबवायचे नाही. तेव्हा आपण चटकन परवानगी द्यावी.'

थोडा वेळ विचार करून प्रोफेसर मनात म्हणाले, 'सर्व दृष्टीने हा जेनला योग्य वर आहे; पण ती नाखूष आहे. त्याचे नाव ऐकताच तिच्या कपाळावर आठ्या उमटतात.' नंतर ते म्हणाले,

'तुम्ही जेनला भेटा. माझ्या शब्दाबाहेर ती जाणार नाही.'

'तुमचा इतका मला आधार आहे हेच अधिकात अधिक आहे.'

आणि त्याचवेळी कुणाची तरी चाहूल लागली; म्हणून ते दोघे त्या दिशेने पाहू लागले. तोच जेन दारात येऊन उभी राहिली. कॅनलरला पाहताच ती दचकली पण तिने तसे दाखवले नाही.'

'बाबा! टोबी आला आहे. आणखी सहा महिने त्याला या लायब्ररीची गरज आहे. विन्सकोन्सीनला ती इतक्यांत न्यायची नाही.'

'बरे ! बरे ! तसे तू टोबीला सांगून ये.'

'विन्सकॉनसीन?' जेन बाहेर जातांच कॅनलरने विचारले.

'होय ! ती जेनच्या आईने तिच्या नांवे केलेली लहानशी इष्टेट आहे. अजूनपर्यंत ती तिथें कधीच गेलेली नाही पण आतां जावे लागेल. येथे रहाणे पैशाच्या अडचणी–मुळे आम्हाला शक्य नाही. ती मिळक-तही आमची थोडी गरज भागेल इतकीच आहे. मि. क्लेटन आणि मि. फिलँडर घराची दुरुस्ती करण्याकरिता पुढे गेले आहेत. क्लेटनच सारे करणार आहे.'

'क्लेटन का? मला का कळवले नाही?'

'तुमचे पहिलेच कर्ज आहे. अधिक भर कशाला?'

इतक्यांत जेन परतून आली व म्हणाली 'बाबा टोबी बोलावतोय!' ते ऐकताच प्रोफेसर तेथून निघून गेले.

'मी आज का आलो आहे ते तू ओळखले असशीलच जेन.'

'मला ते ठाऊक आहे मि. कॅनलर.' ती थंडपणे म्हणाली.

'तुमचा उद्देश मी पहिल्यापासूनच ओळखला आहे. मि. कॅनलर! तुम्हाला कोणतेच तारण मिळालेले नाही. मिळाले नाही असे म्हणण्यापेक्षा तुम्ही ते घेतले नाही. तुमचे तारण मी आहे.' ती रागाने म्हणाली.

'ते कसेहि असो; पण उद्याच मी लग्नाचे लायसन्स घेऊन येतो.'

'आणखी काही दिवस लग्न करण्याची माझी इच्छा नाही.'

'बरे! तसे का होईना!' पण मनांत तो जळत होता.

'पंधरा दिवसांनी मी विन्सकोनसिनला येतो.'

'जशी आपली इच्छा!' आणि जेन तेथून निघून गेली.

दोन दिवसांनी ते विन्सकोनसिनला पोहोचले तेव्हा क्लेटन आपली स्वतःची कार घेऊन स्टेशनवर आला होता. त्या कारमधून त्या फार्म-हाऊसवर येताच जेन चकित झाली. झोपडीच्याऐवजी तिथे एक टुमदार बंगली दिसत होती.

'मि. क्लेटन ! हे काय ?' बंगलीकडे वोट दाखवून ती म्हणाली.

'तुझ्या वडिलांच्या सुखसोयीची ही व्यवस्था. पण तू त्यांच्या हे लक्षांत आणून देऊ नकोस. त्यांना त्या स्वप्नाळू माणसाला काहीच समजणार नाही पण तूं सांगितलेस तर....'

जेन हसली; पण मनात तिला धक्का बसला. टारझन तिच्या जीवनात आला नसता तर क्लेटनचे प्रेम तिने हंसत स्वीकारले असते पण तो तिच्या जीवनात आल्यापासून सारी उलथापालथ झाली होती. तो आपल्या आसपास आहे असच तिला नेहमी वाटायचे.

'पण तुमचे कर्ज आम्ही कसे फेडायचे ?'

'हे कर्ज नाही जेन ! तुझ्या वडिलांना सुखात ठेवावे म्हणून मी हे केलेय. माझ्यावर तू विश्वास ठेव.'

'माझा तुमच्यावर विश्वास आहे; पण तुमच्या इच्छेप्रमाणे मला वागता येणार नाही.'

'का ? तुझे कॅनलरवर प्रेम आहे ?'

'माझे कॅनलरवर मुळीच प्रेम नाही.' ती रागाने म्हणाली.

'मग काय ? त्याच्याकडे पुष्कळ पैसा आहे म्हणून.'

'नाही. पण माझं तुझ्यावर प्रेम नाही सेसिल, तुला माझे प्रेम पाहिजे कीं तिरस्कार. तुझा अवमान करीत मी रहावे ?'

ज्या कॅनलरमुळे हे सारे घडतेय असे त्याला वाटत होते.' त्या कॅनलरचा खून करावा असे त्याला वाटत होते. पण त्याने अधिक विचारले नाही आणि त्याच वेळी कॅनलर आपल्या मोठ्या मोटारकार मधून विन्सकोनासिनला आला.

त्याला पाहताच तिच्या छातीत धडकी भरली.

पण कॅनलरने हट्टच धरला की हे आता संपले पाहिजे. त्याची

अधिक वाट पहाण्याची इच्छा नव्हती. जेनला वेळ देण्यास तो तयार नव्हता. आणि शेवटी कंटाळून जेनने होकार दिला.

क्लेटन हे सारे पहात होता. त्याला वाटले आपण आता येथून जावे; पण त्याला असेही वाटले तिच्या संकटात आपण तिच्याजवळ असायला नको का, जरूर पडली तर.... ?'

आणि त्याच दिवशी कॅनलरने ते फार्म हाऊस सोडले.

हे लग्न कुणालाच पसंत नव्हते. आणि तिचा बाप तो शास्त्रज्ञ आपल्या शास्त्रीय चर्चेतच गुंग असायचा नेहमी.

दुसऱ्या दिवशी दुपारी सर्व झोपले असता जेन घराच्या बाजूच्या रानात फिरावयास गेली. तिला काही वेळ एकांतात घालवायचा होता.

दक्षिणेच्या त्या रानात त्यावेळी वणवा लागला होता. एक आठवडा तो तसाच होता. पण जेनला त्याची कल्पना नव्हती. आणि त्या दिवशी वारा सुटला व वणवा पसरू लागला. उत्तरेच्या बाजूचा मार्ग बंद होताच तिला वाटले आता पश्चिमेच्या बाजूने घर गाठावे. घरच्या लोकांना मात्र या वणव्याची कल्पना नव्हती.

आणि याचवेळी एक कार फार्महाऊसच्या दाराशी उभी राहिली व आतून एक मोठा काळ्या केसाचा धिप्पाड माणूस खाली उतरला. तो आत गेला. तेव्हा क्लेटन एका कोचावर झोपला होता. नंतर त्याने 'जेन ! जेन !' म्हणून हाका मारल्या; पण जेन होतीच कुठे?

तेव्हा त्याने क्लेटनला हलवून जागे केले. आपल्या समोर कुणीतरी एक परका माणूस उभा आहे हे त्याला दिसले. पण ओळख पटेना आणि तो माणूस तर नावाने हाका मारीत होता.

जेन बाहेर गेली आहे इतकेच त्याला माहित होते. इतक्यांत एस्मिरल्डा तिथे आली. तिला त्याने विचारले.

'एस्मिरेल्डा! जेन! पोर्टर कुठे आहे?' तिने जेन गेलेल्या रस्त्याकडे बोट दाखवले; पण हा माणूस कोण हे तिला कळेना!

मग टारझनने त्यांची वाट पाहिली नाही. तो पळत पळत रानांत गेला. आग आता तीन बाजूने पेटत होती आणि भांबावलेली जेन मार्ग शोधण्याचा प्रयत्न करीत करीत मार्ग सांपडेना तेव्हां तिने गुडघे टेकून प्रार्थना केली आणि देव पावला असेच म्हणायला पाहिजे.

'जेन! जेन पोर्टर!' ही हांक तिच्या कानी आली आणि ती जमिनी-वरून उचलली गेली. आणि मजबूत बाहूंचा विळखा तिच्या-भोवती पडला. ती जमिनीवरून उचलली गेली होती, त्यावेळी पूर्वीचा तो रानांतला प्रसंग तिच्यापुढे उभा राहिला. तिच्या मिटल्या डोळ्यापुढे तो प्रसंग साकार झाला आणि तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. पण....पण...तो इकडे कुठला यायला?

तिने हळुच डोळे उघडले, तेव्हा तिला त्याचे हसरे डोळे दिसले. ती त्याला बिलागली. आणि म्हणाली,'माझा वीर!'

'होय! तुझा, तुझाच मी! पण जंगलचा वीर! अति प्राचीन माणूस! माझ्या या जिवलग मैत्रिणीला भेटायला, तिच्यावर हक्क दाखवायला मी आलो आहे. पण जेन! माझी वाट न पहाता तूं आफ्रिका कशी सोडलीस?

तुझी वाट मी सात दिवस पाहिली ते थांबत ना? मग माझा नाईलाज झाला.' पण तू कुठे होतास?

'मी जखमी डी. अरनॉटची सेवा करीत होतो.' मग सारी हकिगत तिला सांगून तो म्हणाला, 'अरनॉटमुळेच माझे हे रूपांतर झाले. तुझे पत्र मला मिळाले. तुझा झालेला घोटाळा मला कळला. मी टारझन आणि तुझा अरण्यदेव एकच आणि माझ्यावर तुझे प्रेम आहे.'

तिने आपले तोंड हातात लपवले.



....आणि ती जमिनीवरून उचलली गेली.

'तू कॅनलरबरोबर का? लग्न करणार तुझे तर त्याच्यावर प्रेम नाही!'

'माझ्या वडिलांनी त्याचे कर्ज काढलेय. त्या कर्जाची फेड म्हणून....'

'मग मी त्याचा प्राण घेईन!' तो हळूच पुटपुटला.

'तुला तसे करता येणार नाही. हे सुधारलेले जग आहे. तुला फाशी जावे लागेल. टारझन! मला तू विसरणे हे दोघांच्याहि कल्याणाच आहे. तो विचारमग्न स्थितींतच फार जवळ आला आणि तिला घेऊन कारमध्ये बसला. कार दाराशी येताच सारे कारजवळ आले आणि क्लेटनने टारझनला ओळखले. सर्वांनी त्याचे कौतुक केले. आभार मानले. नाहीतर जेन वणव्यात मेली असती.

रानातला बलवान् तरुण एक सभ्य गृहस्थ बनला म्हणून त्यांना फार आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी चहापान संपवून ते पुढील हॉलमध्ये बसले असता कॅनलर एका प्रिस्टला घेऊन तिथे आला आणि प्रो. पोर्टरना म्हणाला,

'मी हे लायसन्स आणले आहे आणि हे उपाध्ये बुवाहि आणले आहेत. ते आता आमचे लग्न लावतील. जेन ऐकलेस का?'

'होय. ऐकले.'

नंतर त्याने तिचा हात धरून तिला उपाध्येबुवासमोर उभ केले.

ते पाहतांच टारझन खवळला आणि त्याने कॅनलरला दूर ढकलले.

कॅनलर पुन्हां पुढे येताच त्याने त्याच्या गळ्याला हात घातला. आता तो त्याचा गळा दाबणार तोच क्लेटन पुढे धांवला; त्याला पण त्याने मागे ढकलले, तेव्हा त्याच्या बाहुवर हात ठेवून जेन म्हणाली, 'त्याला सोडा टारझन.'

'त्याला सोडीन पण त्याने तुला मोकळ केले पाहिजे.'

घाबरलेल्या कॅनलरने ते कबूल केले तेव्हांच टारझनने त्याला सोडले.

एक क्षणही त्या जागी न थांबता कॅनलर आपल्या कारकडे गेला. भीतीने कापणारा पाद्री देखील त्याच्या मागे गेला.

आता त्यांना त्या आगीत रहावयाचे नव्हते. म्हणून सारे कारने निघाले. जेन क्लेटनच्या कारमध्ये होती.

आणि ती विचार करीत होती. टारझनचे आपणावर प्रेम आहे. त्याने दोनदा आपणाला जिंकले आहे. काय करावे? त्यांच्या संगतीत मी सुखी होईन का? माझ्या संस्कृतीत माणसाला अनेक बंधने आहेत. त्याचे आयुष्य म्हणजे जगतातले निर्बंध जीवन. कधी तरी तो आपले स्वतंत्र जीवन जगायला जाणार. कोण त्याला ताब्यांत ठेवू शकणार? ठेवले तर तो सुखी होईल का? आणि ज्या वातावरणात आपण वाढलो ती परिस्थिति कितीतरी वेगळी आहे. अशा गोंधळांत तिचे मन सांपडले असता क्लेटनने तिला विचारले,

'जेन! तू माझ्याशी लग्न करशील का?'

'होय!' तिने चटकन म्हटले आणि त्याच वेळी त्याची कार हॉटेलशी आली.

सर्व एकत्र जमल्यावर टारझनने खजिन्याची सारी हकिकत सांगून म्हटले, 'त्या खजिन्यात दोन लक्ष पन्नास हजार डॉलर्स आहेत. या पत्राप्रमाणे फ्रेंच सरकारच्या ताब्यातून आपण ते घ्यावे.'

ही टारझनने सांगितलेली बातमी ऐकून सर्वांना फार आनंद झाला. आता प्रो. पोर्टर कॅनलरच्या कर्जातून मुक्त होणार होते.

नंतर टारझनने जेनला एकीकडे भेटण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याप्रमाणे ती दोघे व्हरांड्यात आली. टारझनने तिला प्रश्न केला,

'तू माझ्याशी लग्न करशील?'

नंतर त्याच्यावरचे आपले प्रेम कबूल करून ती म्हणाली,

'मी वचन दिलेय. मला ते मोडता येत नाही.'

टारझनची मुद्रा घायाळ हरिणीप्रमाणे झाली. जेनने आपले तोंड हातानी झाकून घेतले. पण लवकरच टारझनने स्वतःला सावरले. जेन पण शांत झाली. 'तुम्ही शांतपणे वागून माझा भार हलका केला पाहिजे. आज रात्रीनंतर आपण केव्हाहि भेटणार नाही.'

स्टेशनवर रिफ्रेशमेंट रूममध्ये असतानाच टारझनच्या हाती एक तार पडली.

'अभिनंदन. तुम्ही लॉर्ड ग्रेस्टोक आहा हे सिद्ध झालेय.

'डी. अरनॉट'

तार टारझनच्या हातून गळून पडली. आता तो कोण होता हे त्याला काय करायचे होते. पण तो मनात आणता तर ते सारे त्याला क्लेटनपासून हिरावून घेता आले असते.

इतक्यात क्लेटन तेथे आला आणि म्हणाला,

'पण तुम्ही त्या जंगलात कसे गेलात? मला नवल वाटते.'

'मी त्या जंगलात जन्मलो. काला वानरीण माझी आई होती. मला त्या जंगलाचा अभिमान वाटतो.'

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा
वा. क्र. 91399 नों. दि.
011-91
अनुक्रम ३८७८
विभाग ...
क्रमांक ...
नों. दि. ...
IRBK-0111399
IRBK-0111399